ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४६ अंक ४ पाने ७६ नोव्हेंबर २०१८ मूल्य ३० रु.

विशेषांक



## स्वच्छता: कल्पनेतून प्रत्यक्षात

एक लोक चळवळ
अरुण जेटली

स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करू या
नितीन गडकरी

स्वच्छ व निरोगी भारतासाठी वचनबद्ध
धर्मेंद्र प्रधान

शहरी भागांतील स्वच्छता मोहीम
दुर्गा शंकर मिश्रा

महाराष्ट्राची ग्रामीण स्वच्छता - लोकचळवळीचे उत्तम उदाहरण
बबनराव लोणीकर

विशेष लेख
स्वच्छता क्रांती: सर्वव्यापक अंमलबजावणी
परमेश्वरन अय्यर

फोकस
स्वच्छ आणि निरोगी गावांसाठी
नरेंद्र सिंह तोमर

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने ७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ बी, ७०१ सी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४६ ❖ ❖ अंक ४ ❖ ❖ नोव्हेंबर २०१८ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| एक लोक चळवळ | अरुण जेटली | ५ |
| स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करू या | नितीन गडकरी | ९ |
| स्वच्छ व निरोगी भारतासाठी वचनबद्ध | धर्मेंद्र प्रधान | १२ |
| स्वच्छ आणि निरोगी गावांसाठी (फोकस) | नरेंद्र सिंह तोमर | १६ |
| शहरी भागांतील स्वच्छता मोहीम | दुर्गा शंकर मिश्रा | २१ |
| स्वच्छता हाच खरा धर्म | अक्षय राऊत | ३० |
| स्वच्छता क्रांती: सर्वव्यापक अंमलबजावणी (विशेष लेख) | परमेश्वरन अय्यर | ३५ |
| स्वच्छ भारत - निरोगी भारत | प्रिती सुदान | ४० |
| स्वच्छता : कल्पनेतून वास्तवाकडे | राकेश श्रीवास्तव | ४६ |
| स्वच्छ भारत अभियान आणि केंद्रिय विद्यालये | संतोष कुमार माल | ५० |
| भारतीय रेल्वेच्या स्वच्छतेत सुधारणा | आलोककुमार तिवारी | ५५ |
| महाराष्ट्राची ग्रामीण स्वच्छता - लोकचळवळीचे उत्तम उदाहरण | बबनराव लोणीकर | ६० |
| गांधीजी आणि स्वच्छता | सुदर्शन अय्यंगार | ६५ |
| गांधीजी, स्वच्छता आणि स्वराज्य | डी जॉन चेल्लादुराई | ७० |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# स्वच्छता जीवन जगण्याचा मार्ग

स्वच्छता किंवा साफसफाई ही संकल्पना प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. सकाळी उठल्यानंतर दात घासणे, जेवण करताना आणि जेवणानंतर हात धुण्यापर्यंत स्वच्छता हा आपल्या जीवनाचा दैनंदिन भाग आहे. स्वच्छतेची सवय असणारा माणूस साफसफाईपासून दूर जात नाही. याऊलट घाण असलेला परिसर स्वच्छ करण्यासाठी मेहनत घेतो. बहुतांश व्यक्ती आपले घर स्वच्छ ठेवतात, मात्र आजूबाजूचा परिसर घरातील कचरा रस्त्यावर टाकतात.सार्वजनिक ठिकाणी थुंकून आणि घाण करुन सभोवतलाचा परिसर अस्वच्छ करतात.

भारतातील अस्वच्छता पाहूनच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वच्छ हिंदूस्थानची हाक दिली. महात्मा गांधींसाठी स्वच्छता हीच भक्ती होती. स्वच्छता गांधींसाठी ही फक्त संकल्पना नव्हती तर जीवनशैली होती. गांधींजींनी स्वच्छतेबद्दल फक्त उपदेश केला नाही तर प्रत्यक्ष जीवनात आचरण केले आहे. गांधींजींच्या संकल्पनेत शारिरीक स्वच्छतेसोबतच आत्मा आणि मनाच्या स्वच्छेताचाही समावेश आहे. हागणदारीमुक्तीसोबतच भारतातील नागरिकांचे मन,शरीर आणि आत्मा स्वच्छ असावा असा आग्रह गांधींजींचा होता.

गेल्या काही वर्षापासून भारताचा आर्थिक विकासदर वाढत आहे. तरीही घाण आणि अस्वच्छता आर्थिक विकासात खोडा ठरत आहेत. अस्वच्छता ही भारताच्या आर्थिक विकासात मोठा अडसर ठरत आहे. कुपोषण, अकाली मृत्यू,अर्धवट शिक्षण आणि खराब राहणीमानामुळे उत्पादकता घटत आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार या कारणांमुळे भारताची जीडीपीमध्ये ६.४ टक्क्यांचे वार्षिक नुकसान होत आहे. स्वच्छतेचे हे महत्व जाणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये स्वच्छ भारत अभियानाची दिल्लीतील लाल किल्ल्यावरुन घोषणा केली . २०१९ मध्ये महात्मा गांधींजींच्या १५० व्या जंयतीला भारत स्वच्छ आणि हागणदारीमुक्त करुन आदरांजली वाहण्याचे आगळेवगेळे उद्दीष्ट या अभियानात ठेवण्यात आले आहे.

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाकडे स्वच्छता अभियानाची जबाबदारी आहे. मात्र, आता सरकारमधील विविध विभाग आणि देशातील विविध संस्था, नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटल्याने प्रत्येक जण स्वच्छता अभियानात सहभागी होत आहेत. राजकीय इच्छा , सरकारचे धोरण आणि लोकसहभागामुळे स्वच्छता अभियान लोकांची चळवळ झाली आहे. स्वच्छता पंधरवाडा, रॅली, गाव पातळीवरील मेळावे, मोठ्या प्रमाणात शौचालयांची उभारणी,कचऱ्याची विल्हेवाट,कचरामुक्त शहरांना नामांकन यामुळे देशभरात स्वच्छता अभियान यशस्वी ठरत आहे. विद्यार्थी, स्वच्छताग्रही, सरपंच, जिल्हाधिकारी, नागरी संघटना आणि माध्यमांनी `स्वच्छता हीच सेवा `हा संदेश जनसमान्यांपर्यंत पोहचवला आहे. अमिताभ बच्चन, सचिन तेंडूलकर या स्वच्छता दुतांनी शौचालय वापरण्यासाठी लोकांना प्रोत्साहित केले आहे.

आरोग्य मंत्रालय तसेच महिला आणि बालविकास मंत्रालय त्यांच्या विभागातही स्वच्छता अभियान राबवत आहेत. कायाकल्प, विश्वास अभियान, बाल स्वच्छता मिशन, शौचालय बांधणी, आंगणवाडींमध्ये स्वच्छ पाण्याचा पुरवठा यासारख्या योजनांच्या पुढाकाराने स्वच्छता अभियानाला वेग प्राप्त झाला आहे.

कोणताही बदल तरुणांच्या सहभागाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. मनुष्यबळ विकास मंत्रालयाने देशभरातील विविध महाविद्यालयातून तरुणांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाप्रमाणेच रेल्वे, पेट्रोलियम, गृहनिर्माण विभागानेही स्वच्छ अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. रेल्वे स्टेशन, पेट्रोल पंप, स्मार्ट शहरे आणि गावे स्वच्छता अभियानात मोलाची भूमिका बजावत आहेत. पाणी, पुरवठा, कचरा व्यवस्थापनाद्वारे स्वच्छता हे मिशन होत आहे, आणि या मिशनचे रुपांतर आता जीवन जगण्याचा मार्ग झाला आहे.

■■■

# एक लोक चळवळ

- अरुण जेटली




**स्वच्छ भारत अभियान ही योजना फार थोड्या कालावधीत एक यशस्वी लोकचळवळ बनली आहे. जेव्हा घोषित करण्यात आली त्यावेळी देशाच्या एकूण ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर केवळ ३९ टक्के होता. आज चार वर्षात हा स्तर ९१ टक्के एवढा आहे. हा अमूलाग्र बदल केवळ शासनाच्या आवाहनाला नागरिकांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादामुळे शक्य झाला आहे.**

सरकारी योजनांबाबत लोकांमध्ये नेहमीच संदिग्धता असते. याचे प्रमुख कारण असे की बरेचदा या योजनांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत किंवा बरेचदा या योजलेले मापदंड साध्य करण्यात या योजनांवर काम करणारी सरकारी यंत्रणा मागे पडते. तरिही, काही योजना यास अपवाद ठरून यशस्वी व लोकप्रिय ठरल्या आहेत. स्वच्छ भारत अभियान ही योजना फार थोड्या कालावधीत एक यशस्वी लोकचळवळ बनली आहे. जेव्हा ही योजना घोषित करण्यात आली त्यावेळी देशाच्या एकूण ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर केवळ ३९ टक्के होता. आज चार वर्षात हा स्तर ९१ टक्के एवढा आहे. हा अमूलाग्र बदल केवळ शासनाच्या आवाहनाला नागरिकांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादामुळे शक्य झाला आहे.

**स्वच्छ भारत अभियान**

भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात स्वच्छ भारत योजनेची घोषणा केली तेव्हा काहींना या योजनेच्या यशस्वीतेबाबत खात्री नव्हती त्यांच्या दृष्टीने ही योजना म्हणजे केवळ प्रसारमाध्यमातून झळकण्याची संधी वाटली होती. परंतु स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच अशी योजना असेल जी सरकारी यंत्रणांनी न राबवता सर्वसामान्यजनांनी अतिशय उत्साहाने पुढाकार घेत यशस्वीपणे राबवली. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही एक लोकचळवळ बनली.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वतंत्र भारतासाठी जनआंदोलन करण्याबरोबरच देशाच्या विकासात वैयक्तिक व सामाजिक स्वच्छतेवर प्रामुख्याने भर दिला होता. गांधीजींच्या या मुल्याचा खऱ्या अर्थाने अंगीकार करण्याच्या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये म्हणजे महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षापर्यंत संपूर्ण भारतात रुजलेली खुल्यावर शौच करण्याची वाईट प्रथा संपूर्णपणे बंद करण्याचे ध्येय ठेवले आहे. स्वच्छ भारत अभियानाला चार वर्षे पूर्ण होण्या बरोबर ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर ३९ टक्क्यांवरून ९२ टक्यांपर्यंत आला आहे. एवढ्या कमी कालावधीत या अभियानाला मिळालेले हे यश वाटते तितके सहज नव्हते. ग्रामीण भागातील लोकांना स्वयं स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक स्वच्छतेबाबतच्या संकल्पना सवयी व मानसिकता यामध्ये बदल घडवणे मोठे जिकरीचे काम होते. सातत्य, चिकाटी, व उत्साह कायम राखत परस्पर सहकार्यातून सर्व समाजाच्या सर्व स्तरातून स्वच्छतेचे हे अभियान निरंतरपणे राबवण्यात हळूहळू शक्य होत गेले.

या अभियानाचे आणखी एक वैशिष्ट असे की, लोकांनी राबवलेली ही चळवळ आज महिला अभियानात परावर्तित होत आहे. विशेषत: ग्रामीण भागातील महिला स्वच्छता अभियानात




स्वत:हून पुढाकार घेऊन आपल्या घरांबरोबरच राहत्या संपूर्ण परिसराची तसेच गावाची स्वच्छता अबाधित राहील आपल्या कुटुंबातील लोकांच्या दैनंदिन वागणुकीतून आरोग्यदायी स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणवण्यात महिलांनी महत्वाची भूमिका निभावली आहे.अभियानाच्या लाभार्थी बनण्याच्या पलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने महिलाच या अभियानाचे नेतृत्व करीत असल्याचे चित्र आज पाहावयास मिळते आहे. सामाजिक तसेच कौटुंबिक स्तरावर महिलांसाठी खाजगी शौचालय असावे अशी आग्रही मागणी करताना आत्मसन्मान जपण्याबरोबरच खुल्यावर शौचाला बसण्याची वाईट प्रथा बंद करण्यात महिलांचा सहभाग खूप महत्त्वाचा ठरलेला आहे. आज महिला बचत गटांच्या माध्यमातून गावोगावी शौचालय उभारण्याचे काम करून कुटुंबासाठी रोजगार मिळवत आहेत. एकाच वेळी आत्मभान जपत सामाजिक स्तरावरील स्वच्छतेचे जनभान जागृत करण्याबरोबरच ग्रामीण भागातील महिला स्वयंरोजगाराच्या संधीचा योग्य उपभोग घेत आहेत.

**अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रुपये ३००० वरुन आता प्रतिमाह रुपये ४५०० करण्यात आले आहे. तसेच अंगणवाडी लघु सेविकांना दिल्या जाणाऱ्या मासिक पगारात रुपये २२५० वरून प्रतिमास रुपये ३५०० एवढी वाढ करण्यात आली आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मासिक भत्त्यातही वाढ करण्यात आली असून त्यांना आता दर महिना रुपये पंधराशे ऐवजी रूपये २२५० एवढा भत्ता दिला जाईल.**

बंदिस्त शौचालयाच्या उपयोगामुळे वैयक्तिक तसेच सभोवतालच्या परिसराची आपोआपच स्वच्छता पाळली जाते, जी निरोगी आरोग्याच्या दृष्टीने चांगली पद्धत आहे. जागतिक तज्ज्ञांच्या विश्वासानुसार स्वच्छ भारत अभियानामुळे २०१९ पर्यंत तीन लाखाहून अधिक लोकांचे जीव वाचवणे शक्य आहे. विशेषत: राष्ट्रीय स्तरावर खुल्यावर शौच करण्याच्या पद्धतीवर प्रतिबंध घालण्यासाठी जी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे त्याचे परिणाम स्वरूप सार्वजनिक अस्वच्छतेमुळे उद्भवणाऱ्या जीवघेण्या आजारांपासून लाखो लोकांचे जीव वाचू शकतात. भारतातील किती तरी भागातील सार्वजनिक स्वच्छतागृहांना इज्जत घर म्हणून संबोधण्यात येते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंतच्या काळात पहिल्यांदाच देशभरामध्ये स्त्री पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये असावीत अशी मागणी समाजातील सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात केली जात आहे. केंद्र सरकारही या योजनेला यशस्वी बनवण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहे. शासनाला असा विश्वास आहे की, या योजनेच्या यशामुळे भारताच्या ग्रामीण जीवनाचा स्तर विशेषत: ग्रामीण महिलांची सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल.

ग्रामीण रस्ते, विद्युतीकरण, सर्वांसाठी घरे, शौचालये, स्वयंपाक गॅस पाईप जोडणी, शेतीसाठी बी बियाणे व कमी दरात योग्य प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता इत्यादींमुळे ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या जीवनमानात अमुलाग्र बदल दिसून येऊ लागला आहे. याबरोबर जेव्हा आयुष्मान भारत योजना पूर्णपणे राबवण्यात येईल तेव्हा या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्षी रुपये पाच लाख पर्यंत आरोग्यभत्ता उपलब्ध होईल. यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भारतातील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान सुधारण्यास हातभार लागेल.

**यशोगाथा:**

पंजाब सरकार लवकरच खुल्यावर शौच विरोधी मोहीम निरंतर चालू राहील यासाठी दोन भाषांत लोकजागृती पर मोबाईल ॲप कार्यान्वित करणार.

माझे गाव माझा अभिमान या कार्यक्रमाअंतर्गत खुल्यावर शौच विरोधी मोहिमेचा ग्रामीण भागात सर्व लोकांपर्यंत प्रसार व प्रचार करण्यासाठी मोबाईल ॲप सुरू करणारे पंजाब देशातील पहिले राज्य आहे. सर्वसामान्य जनांना समजू शकेल अशा पद्धतीने वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेबाबत सर्व माहिती तसेच स्वच्छतेचे महत्त्व याची माहिती या ॲपच्या माध्यमातून देण्यात आली आहे. खुल्यावर शौच करण्याची सामाजिक आरोग्य बिघडवणारी घाणेरडी सवय मुळापासून बंद पाडण्यासाठी घालून देण्यात आलेले सर्व निकष या ॲपमध्ये देण्यात आले आहे. या ॲपची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे:

खुल्यावर शौच करताना कोणी आढळल्यास त्यांच्याविरोधात तक्रार नोंदवण्याची सोय या ॲप मध्ये देण्यात आली आहे.

खुल्यावर शौच करणे कायमस्वरूपी बंद व्हावे यासाठी गावोगावी सार्वजनिक शौचालये यामध्ये स्त्री पुरुषांसाठी वेगवेगळी शौचालये उभारणे, तसेच घरोघरी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था उभी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे या सरकारी कामांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबतचा ताजा अहवाल या ॲपद्वारे मिळण्याची सोय करण्यात आली आहे.

'गाव माझा अभिमान' या कार्यक्रमाअंतर्गत सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत निरंतर दर्जात्मक सुधारणा व्हावी, या उद्देशाने गावागावांमध्ये विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. यामध्ये खुल्यावर शौच करणे विरोधी जनजागृतीपर माहिती फलक स्पर्धा, सकाळच्या वेळी गावोगावात खुल्यावर शौच विरोधात निगराणी मोहीम, स्वच्छता अभियान, गावोगावी साठणाऱ्या मलसाठ्याची योग्य विल्हेवाट, महिलांसाठी विशेष स्वच्छता मोहीम इ. प्रकारे जनजागृती जनचेतना उत्साहित करणाऱ्या कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. लोकांचा उत्साह टिकून राहावा, अधिकाधिक प्रमाणात या मोहिमेला लोकांचा सक्रिय व निरंतर पाठिंबा मिळत राहावा यासाठी स्पर्धांतील विजेत्या, उपविजेत्या तसेच उत्तेजनार्थ पदावरील गावांना योग्य बक्षिसे देऊन गौरवण्यात येते. या स्पर्धांचे आयोजन तालुका, जिल्हा तसेच राज्य स्तरावर केले जात असून त्या अनुषंगाने स्पर्धेचे व पारितोषिकाचे स्वरूप वाढवण्यात येते.

या बरोबरच सोशल मीडिया माध्यमातूनही लोकसंपर्क व लोकजागृती वाढवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

**ग्रामीण भागातील रोजगार भत्त्यात वाढ**

केंद्र सरकारने नुकतेच अंगणवाडी व आशा योजनेसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. अंगणवाडी सेविका राष्ट्रीय पोषक आहार योजना या कार्यक्रमाचा प्रमुख आधारस्तंभ आहेत. आज देशभरात अंदाजे १२.९ लाख अंगणवाडी सेविका आणि ११.६ लाख अंगणवाडी सहाय्यक कर्मचारी कार्यरत आहेत. केंद्र शासनाकडून या २९.९ लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांना लवकरच सुधारित नियमानुसार वेतन व इतर आर्थिक लाभ उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रुपये ३००० वरुन आता प्रतिमाह रुपये ४५०० करण्यात आले आहे. तसेच अंगणवाडी लघु सेविकांना दिल्या जाणाऱ्या मासिक पगारात रुपये २२५० वरून प्रतिमास रुपये ३५०० एवढी वाढ करण्यात आली आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मासिक भत्त्यातही वाढ करण्यात आली असून त्यांना आता दर महिना रुपये पंधराशे ऐवजी रूपये २२५० एवढा भत्ता दिला जाईल.

याशिवाय या कर्मचाऱ्यांना वेळोवेळी उत्तम कामगिरीसाठी प्रत्येक महिन्यात प्रत्येकी रुपये ५०० व रुपये २५० प्रोत्साहनपर रक्कमही देण्यात येईल. गर्भधारणा झालेल्या व बाळंत महिलांसाठी देण्यात येणाऱ्या सोईंमध्येही सुधारणा व वाढ करण्यात आली आहे. कुपोषित बालकांसाठी विशेष आहार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून देशभरातील अंगणवाडी कर्मचारी पगार वाढीची मागणी करीत होते. या आधीच्या शासनाने आर्थिक अंदाजपत्रकात अंगणवाडी सेविकांना नेहमीच दुर्लक्षित ठेवले होते. आताच्या शासनाने मात्र अंगणवाडी सेविकांचे येणाऱ्या काळातही ग्रामीण भारताच्या विकासातील योगदानाचे महत्त्व जाणून त्यांच्यासाठी जवळजवळ ५० टक्के वेतन वाढ जाहीर केली. केवळ आर्थिक लाभ देण्यापुरते मर्यादित न राहता अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अधिकाधिक

सोयी उपलब्ध करून देऊन त्यांच्या कामाचा दर्जा वाढेल या दृष्टीने शासन महत्त्वाची पावले उचलत आहे

**'स्वच्छ भारत मिशन' च्या प्रमुख उपलब्धी**

योजनेच्या घोषणेपासून चार वर्षांच्या कालावधीतच ग्रामीण भारतातील स्वच्छतेचा स्तर ९० टक्क्यांपर्यंत पोहोचला. २०१४ पासून आतापर्यंत देशाच्या ग्रामीण भागात जवळजवळ ८.२ करोड शौचालये उभारण्यात आली आहेत. तसेच देशातील ४.२ लाख गावे ४३४ जिल्हे, १९ राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांत खुल्या शौच करण्यावर पूर्णपणे प्रतिबंध घालण्यात आला आहे.

**स्वच्छता अभियानातून साध्य झालेले परिणाम**

★ आर्थिक परिणाम- संयुक्त राष्ट्रांच्या २०१७ च्या एका अभ्यासानुसार भारतात खुल्यावर शौच प्रतिबंधित गावांतील प्रत्येक कुटुंब वर्षाकाठी जवळजवळ पन्नास हजार रुपयांची बचत करण्यात यशस्वी ठरत आहे. कारण स्वच्छतेच्या चांगल्या सवयींतून मलमूत्र सांडपाणी व घाणीतून फैलणाऱ्या संसर्गजन्य रोगांवरील वैद्यकीय खर्च व अनेकांचे प्राण वाचवणे सहज शक्य बनले आहे.

★ जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर वाढू लागल्यामुळे २०१९ पर्यंत जवळजवळ तीन लाख लोकांचा जीव वाचवण्यात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत यश मिळणार आहे.

बिल आणि मेलिंडा गेट्स फाउंडेशन तर्फे २०१७ यावर्षी करण्यात आलेल्या अभ्यासानुसार भारतात एकूण ४६ टक्के डायरियाग्रस्त लहान मुले ही खुल्यावर शौच करण्याची सवय असलेल्या परिसरात आढळून आली आहेत.

★ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी द्वारा प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालानुसार २०१७-१८ या वर्षामध्ये खुल्यावर शौच करणे बंद करण्यात आल्यामुळे ग्रामीण महिलांच्या घरगुती स्वच्छता लहान मुलांची काळजी यासाठी दिवसभरात लागणाऱ्या एकूण वेळेपैकी दहा टक्के वेळेची बचत झाली आहे. परिणामी कौटुंबिक उत्पन्नात हातभार लावणाऱ्या रोजगार कामांमध्ये महिलांच्या संख्येमध्ये १.५% वाढ झाली आहे.

■■■

*लेखक केंद्रीय अर्थमंत्री आहेत.*

*ई मेल: fmo@nic.in*




**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

संकल्प

# स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करू या

- नितीन गडकरी




**स्वच्छतेच्या समस्येत नद्यांची स्वच्छता करणे हे मोठे आव्हान आहे. नद्यांची अविरलता, व निर्मलता जपणे व तिचा प्रवाह प्रदूषणविरहित करणे फार महत्वाचे आहे. गेली अनेक वर्षे साचत आलेला हा प्रश्न आहे. आधीच्या सरकारांनीही यासाठी कार्यक्रम राबवले पण गंगेचे प्रदूषण सुरूच आहे. गंगेच्या किनाऱ्यावर वसलेल्या ९७ शहरातून निर्माण होणारे २९५३ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जाते.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारतासाठी आवाहन केले. हे काम मोठे कठीण आहे याची जाणीव त्यांना त्यावेळीही होती. देशातील सांडपाणी व्यवस्था ही अपुरी होती, लाखो लोक उघड्यावर शौचास बसत असत, प्रभावी कचरा व्यवस्थापन तर दूरच, स्वच्छतेला समाजात खूप कमी महत्व होते, अशी ही सगळी स्थिती भयानक म्हणावी अशीच होती. देशातील १२५ कोटी लोकांना सांडपाणी व्यवस्थापनाची पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आव्हान होते. लोकांमध्ये स्वच्छतेचे महत्व रूजवणे व त्यांच्यात वर्तनात्मक बदल घडवून आणणे कठीण होते. पण आरोग्यसंपन्न भारताचे महात्मा गांधींचे स्वप्न पूर्ण करणे हे सरकारचे सर्वात महत्वाचे वचन आहे. त्यादृष्टीने सरकारने केलेल्या उपाययोजनांचा परिणाम दिसू लागला आहे. पंतप्रधानांच्या नव भारताच्या संकल्पनेशी स्वच्छ भारताची नाळ जोडण्यात आली. गेल्या चार वर्षात सातत्याने स्वच्छ भारतासाठी सरकारने काम केले. त्यासाठी स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला. स्वच्छतेबाबत सततच्या जागरूकता अभियानामुळे लोकांना जीवनात स्वच्छतेचे महत्व पटले.

जलसंधारण, बंदरे विकास व गंगा स्वच्छता, रस्ते वाहतूक मंत्री म्हणून यात मोठी भूमिका पार पाडण्याची संधी मला मिळाली. स्वच्छतेच्या समस्येत नद्यांची स्वच्छता करणे हे मोठे आव्हान आहे. नद्यांची अविरलता, व निर्मलता जपणे व तिचा प्रवाह प्रदूषणविरहित करणे फार महत्वाचे आहे. गेली अनेक वर्षे साचत आलेला हा प्रश्न आहे. आधीच्या सरकारांनीही यासाठी कार्यक्रम राबवले पण गंगेचे प्रदूषण सुरूच आहे. गंगेच्या किनाऱ्यावर वसलेल्या ९७ शहरातून निर्माण होणारे २९५३ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जाते. गंगेच्या किनारी असलेल्या सर्व गावातील सांडपाणी प्रक्रिया सुविधा अपुऱ्या आहेत. अनेक यंत्रणा बंद आहेत कारण त्यांची निगा दुरूस्ती झालेली नाही. या शहरांमध्ये प्रदूषण व कचरा वाढत असल्याने गंगेची समस्याही बिकट होत आहे. औद्योगिक स्त्रोतातील प्रदूषित पाणी, शहरांचा घनकचरा, कृषी कचरा, हागणदारीची घाण प्रदूषित त्रिभुज नद्या व नाले या नदीत येऊन मिळतात. त्यामुळे नदीत मोठ्या प्रमाणात प्रदूषके येतात.नदी स्वच्छ करण्यासाठी पायाभूत सुविधा लागतात. त्यामुळे गंगेला प्रदूषणापासून वाचवता येईल, याशिवाय प्रदूषणाचे स्त्रोतही रोखावे लागतील. यासाठी शाश्वत प्रयत्नांची गरज आहे. समन्वित व सातत्यपूर्ण प्रयत्नांसाठी केंद्र, राज्य, खासगी संस्था व लोकांचा सहभाग गंगा शुद्धीकरणात आवश्यक आहे.

यापूर्वीच्या सरकारांनी गंगा स्वच्छतेचे प्रयत्न केले होते पण त्याला यश आले नाही. त्यामुळे सध्याच्या सरकारने नमामी गंगे हा कार्यक्रम २०१५ मध्ये जाहीर केला. त्यातून

योग्य दिशेने मार्गक्रमण सुरू आहे. पहिल्यांदाच यासाठी स्वतंत्र मंत्रालय सुरू करण्यात आले. नमामी गंगे या कार्यक्रमासाठी २०१५ मध्ये २० हजार कोटींचा योजनाखर्च मंजूर केला होता. राष्ट्रीय गंगाशुद्धीकरण कार्यक्रम हा पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अनुसार हाती घेतला आहे. त्यामुळे २०१६ मध्ये त्यात जास्त अधिकार मिळाले. राज्य व जिल्हा गंगा समित्या २०१७ मध्ये स्थापन करण्यात आल्या. २०१५-२०२० या काळासाठी २० हजार कोटींची तरतूद केली आहे. ती गंगा शुद्धीकरणाच्या इतिहासातील मोठी तरतूद असून २२२३८ कोटी रूपयांचे २४० प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया पायाभूत सुविधा, घाट, स्मशानभूमी, नदी तट विकास, नदी पृष्ठभाग स्वच्छता, संस्थात्मक विकास जैवविविधता व संवर्धन, वनीकरण,ग्रामीण सांडपाणी व मैलापाणी प्रक्रिया यांचा समावेश आहे. यातील ६४ प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम सुरू आहे. गंगेच्या तटावरील एकूण ९७ शहरांची निवड केली आहे तेथे २०३५ पर्यंत ३६०३ दशलक्ष एमएलडी सांडपाणी निर्माण होणार आहे. सध्या सांडपाणी प्रक्रिया क्षमता १६५१ एमएलडी आहे व ती या कार्यक्रमात वाढवली जाणार आहे. ९७ शहरांपैकी १० शहरे सर्वात प्रदूषित असून त्यात हरिद्वार, कानपूर, अलाहाबाद, फारूखाबाद, वाराणसी, पाटणा, भागलपूर, कोलकाता, हावडा यांचा समावेश आहे. ते सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प - एसटीपी मध्ये समाविष्ट आहेत.

हायब्रिड अन्युइटी मोड व वन सिटी वन ऑपरेशन या संकल्पना यात राबवल्या असून एक खासगी चालक या सर्व एसटीपीची निगा राखण्याचे काम करील. मथुरा येथे एसटीपी प्रकल्प वेगळा आहे. तो हायब्रिड अन्युइटी मोडचा असून एक शहर एक संचालक कंपनी असे त्याचे स्वरूप आहे. तीच खासगी कंपनी ३० एमएलडीचा नवा प्रकल्प उभारेल, तीन जुन्या एसटीपीत सुधारणा करेल, ज्यांची क्षमता ३८ एमएलडी आहे. एसटीपीची निगा व दुरूस्ती हीच कंपनी करेल, मथुरा येथील आयओसीएल शुद्धीकरण कारखाना त्यांचे सांडपाणी खरेदी करून त्याचा फेर वापर करेल. हे सांडपाणी त्यांना ८ रूपये ७० पैसे दराने विकले जाईल. त्यातून आयओसीएल वापरत असलेले यमुनेचे दोन कोटी लिटर पाणी वाचेल व ते इतर कामासाठी वापरता येईल, याशिवाय यमुनेप्रमाणेच गंगा त्रिभुज प्रदेशात १६ प्रकल्प हाती घेतले असून त्यात सोनिपत, पानिपत, दिल्ली, मथुरा, वृंदावन , रामगंगा (मोरादाबाद, उत्तर प्रदेश), शरयू ( अयोध्या उत्तर प्रदेश), कोसी (नौगाशिया, बिहार) यांचा समावेश आहे. हे प्रकल्प एकूण १३५३ एमएलडी सांडपाणी प्रक्रिया क्षमतेचे असून त्यासाठी ३०२८ कोटी रूपये खर्च येणार आहे. आणखी प्रकल्प सुरू केले जात असून त्यात नदीच्या त्रिभुज प्रदेशातील ६८ शहरांचा समावेश आहे.

**घाट, स्मशानभूमी व नदी स्वच्छतेसाठी अनेक खासगी कंपन्या काम करीत असून वनीकरण केले जात आहे. अनेक स्वप्रेरित व्यक्ती घाट स्वच्छता व इतर कामात वाटा उचलत आहेत. गंगा प्रहरी अंतर्गत ते काम करीत असून नदीचा परिसर स्वच्छ राखण्यास इतरांना प्रेरित करीत आहेत. कामाचा सध्याचा वेग पाहता इ,स.२०१९पर्यंत गंगा स्वच्छतेचे काम ७०-८० टक्के पूर्ण होईल तर २०२० पर्यंत गंगास्वच्छता पूर्ण होईल.**

या प्रकल्पाला केंद्राचे शंभर टक्के अर्थसहाय्य असून त्यात राज्य व केंद्र सरकारच्या संस्थांचा सहभाग आहे. त्यातून गंगेचे त्रिभुज प्रदेश एकाच छत्राखाली आहेत. पाच वर्षांची तरतूद यात असून संचालन व निगा खर्च पंधरा वर्षांसाठी गृहित धरला आहे.

घाट, स्मशानभूमी व नदी स्वच्छतेसाठी अनेक खासगी कंपन्या काम करीत असून वनीकरण केले जात आहे. अनेक स्वप्रेरित व्यक्ती घाट स्वच्छता व इतर कामात वाटा उचलत आहेत. गंगा प्रहरी अंतर्गत ते काम करीत असून नदीचा परिसर स्वच्छ राखण्यास इतरांना प्रेरित करीत आहेत. कामाचा सध्याचा वेग पाहता इ,स.२०१९पर्यंत गंगा स्वच्छतेचे काम ७०-८० टक्के पूर्ण होईल तर २०२० पर्यंत गंगास्वच्छता पूर्ण होईल.

स्वच्छता हाही माझ्या रस्ते वाहतूक-महामार्ग तसेच जहाजबांधणी खात्यांचा एक प्रमुख कार्यक्रम आहे. त्यात स्वस्त व पर्यावरण स्नेही जलमार्ग तयार केले जात आहेत. १११ जलमार्ग हे राष्ट्रीय जलमार्ग घोषित केले असून ते वाहतुकीसाठी विकसित केले जात आहेत. गंगा व ब्रह्मपुत्रेशी निगडित असे १० मार्ग विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. इथॅनॉल, मेथॅनॉल, जैव डिझेल, जैव सीएनजी, वीज यावर आधारित वाहने आणली जात आहेत. पेट्रोल व डिझेल या हायड्रोकार्बन इंधनांना पर्याय शोधले आहेत त्यातून खनिज तेलावरचा खर्च वाचला आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सगळीकडे टोलप्लाझाच्या ठिकाणी महिला व पुरूष यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध केली आहेत. यात मार्च २०१९ अखेर सर्व ३७२ टोल प्लाझाच्या ठिकाणी ही सुविधा पूर्ण झालेली असेल. अनेक ठिकाणी कचरापेट्या ठेवल्या आहेत.


स्वच्छता संदेशाचे फलक लावले असून थुंकण्याला प्रतिबंध केला आहे. रस्ते मंत्रालय कमीत कमी कचरा निर्मितीसाठी प्रयत्नशील आहे. महामार्ग बांधकामासाठी फ्लायअॅश, ऑइल स्लॅग, शहरी कचरा वापरला जात आहे. जहाज मंत्रालय व त्याअंतर्गतच्या संस्थांनी २२ कलमी कार्यक्रम हाती घेताना खोल्या, प्रसाधनगृहे, शेड स्वच्छ करण्याचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. जी सामुग्री वापरात नाही त्याची विल्हेवाट लावली जात आहे. उद्यानांचे सुशोभीकरण सुरू केले असून स्वच्छतेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये जागृती केली जात आहे. शाश्वत, पर्यावरणस्नेही बंदरांचा विकास केला जात असून ही हरित बंदरे आहेत. अलिकडेच विशाखापट्टनम बंदराला उर्जेचा शाश्वत वापर करण्यासाठी पुरस्कार मिळाला आहे, इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जीने केलेला हा गौरव सार्थच आहे. या बंदरात वर्षाला १.२ एमयू वीज वापरली जाते. ती सर्व हरित ऊर्जा आहे.

प्रत्येक पावलावर केंद्र व राज्य संस्थांच्या समन्वयातून या प्रयत्नात सकारात्मक फलनिष्पत्ती होते आहे. स्वयंसेवी संस्था, स्वच्छतेचे महत्व पटू लागलेले लोक यांचा यात वाटा आहेत. स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सगळे जण एकत्र काम करीत आहेत, २०१४ मध्ये आम्ही देशात स्वच्छता अभियान सुरू केले. पण चार वर्षात देशाने त्यात लक्षणीय प्रगती केली असून पुढील काळात आणखी चांगले परिणाम सामोरे येतील यात शंका नाही.

■■■

*लेखक भूपृष्ठ वाहतूक, बंदरे विकास, व जलस्त्रोत, नदी विकास आणि गंगा नदी स्वच्छता या खात्यांचे केंद्रीय मंत्री आहेत.*

*ई मेल: nitin.gadkari@nic.in*





## राष्ट्रपती भवन शृंखलेअंतर्गत दोन नवीन पुस्तके

प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्यावतीने मा. राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांच्या हिंदी आणि इंग्रजीमधील निवडक भाषणांचा संग्रह दोन स्वतंत्र पुस्तकांद्वारे लवकरच प्रसिद्ध केला जाणार आहे. २५ जुलै २०१७ रोजी राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्यानंतर पहिल्या वर्षाच्या कार्यकाळात श्री कोविंद यांनी विविध ठिकाणी आणि अनेक महत्वपूर्ण विषयांवर केलेल्या एकूण २४३ भाषणांपैकी हिंदीतील निवडक १०९ आणि इंग्रजीमधील निवडक ९५ भाषणांचा या दोन पुस्तकांमध्ये समावेश आहे. 'लोकतंत्र के स्वर' आणि 'दि रिपब्लिकन एथिक' या नावाने ही पुस्तके प्रकाशित होणार आहेत. 'लोकतंत्र के स्वर' या ४७२ पानी हिंदी पुस्तकाच्या पेपर बॅक आवृत्तीची किंमत रु. ४५० आणि हार्ड बाउंड आवृत्तीची किंमत रु. ७५० इतकी आहे. याचप्रमाणे 'दि रिपब्लिकन एथिक' या ४५६ पानी इंग्रजी पुस्तकाच्या पेपर बॅक आवृत्तीची किंमत रु. ४४० आणि हार्ड बाउंड आवृत्तीची किंमत रु. ७३० इतकी आहे.

ही पुस्तके प्रकाशन विभागाच्या नवी मुंबईतील कार्यालयात लवकरच विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत. संपर्क: विक्री भांडार, प्रकाशन विभाग, ७०१ ,"सी" विंग, केंद्रीय सदन, निर्मलादेवी मार्ग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ दूरध्वनी-०२२-२७५७०६८६, email: dpdsenavimumbai@gmail.com, वेबसाईट: www.publicationsdivision.nic.in

# स्वच्छ व निरोगी भारतासाठी वचनबद्ध

-धर्मेंद्र प्रधान




**स्वच्छ भारत अभियान हे फक्त दूरदृष्टीचे धोरण राहिले नसून तो सामाजिक बदलाचा मैलाचा दगड बनला आहे. २०१४ मध्ये मैला व सांडपाण्याची व्यवस्था ३८ टक्के प्रमाणातही नव्हती ती २०१८ मध्ये ९० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. एकूण ९ कोटी प्रसाधनगृहे बांधण्यात आली असून साडेचार लाख खेडी हागणदारी मुक्त झाली आहेत. लाखो लोकांना प्रसाधनगृह बांधल्यामुळे स्वच्छतेची संधी मिळाली आहे. स्वच्छ पेयजल , स्वच्छ पर्यावरण यामुळे आरोग्य सुधारते हे वेगळे सांगायची गरज नाही.**

स्वच्छतेचे उद्दिष्ट हे शंभर महात्मा गांधी, हजार नरेंद्र मोदी , सगळ्या राज्यांचे मुख्यमंत्री व सगळी सरकारे एकत्र आली तरी साकार होणार नाही. जर देशातील १२५ कोटी लोकांनी ठरवले तर स्वच्छ भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. – माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी

जेव्हा २ ऑक्टोबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले तेव्हा त्यांनी आपल्या देशात एक मोठी एतिहासिक सामाजिक चळवळ किंवा मोहीम सुरू केली असे म्हणायला हरकत नाही. यापूर्वी कधीही देशातील एक अब्ज लोक एका समान उद्दिष्टासाठी असे एकत्र आले नव्हते. इतक्या कमी काळात समान उद्दिष्टासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची ही पहिलीच वेळ होती. आता चार वर्षे उलटून गेली आहेत. स्वच्छ भारत अभियान हे फक्त दूरदृष्टीचे धोरण राहिले नसून तो सामाजिक बदलाचा मैलाचा दगड बनला आहे. २०१४ मध्ये मैला व सांडपाण्याची व्यवस्था ३८ टक्के प्रमाणातही नव्हती ती २०१८ मध्ये ९० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. एकूण ९ कोटी प्रसाधनगृहे बांधण्यात आली असून साडेचार लाख खेडी हागणदारी मुक्त झाली आहेत. लाखो लोकांना प्रसाधनगृह बांधल्यामुळे स्वच्छतेची संधी मिळाली आहे. स्वच्छ पेयजल, स्वच्छ पर्यावरण यामुळे आरोग्य सुधारते हे वेगळे सांगायची गरज नाही. स्वच्छता कृती कार्यक्रमा अंतर्गत आंतरमंत्री कृती योजना तयार केली आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाला या योजनेत वार्षिक अर्थसंकल्पात चौथ्या क्रमांकाची जास्त तरतूद मिळाली असून ती ३३५.६८ कोटी रूपये आहे. यात स्वच्छता अभियानात १२० टक्के सफलता नोंदवली असून ४०२ कोटी रूपये खर्च करण्यात आले आहे. तेल व नैसर्गिक वायू सार्वजनिक क्षेत्र आस्थापने व संयुक्त प्रकल्प यांनी कंपनी सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून स्वच्छता मोहिमेसाठी, प्रसाधनगृहे म्हणजे टॉयलेटस बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. ऑक्टोबर २०१४ पासून आम्ही बरीच प्रगती केली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय तसेच कौशल्य विकास खात्यातील लोकांनी यासाठी मोठा उत्साह दाखवला. स्वच्छ व स्वस्थ भारता बनवण्यासाठी त्यांचे प्रयत्न अव्याहत सुरू आहेत.

राष्ट्रीय विपणन कंपन्यांचे पेट्रोल पंप हे देशात सगळीकडे आहेत. त्यांचे देशातील जाळे मोठे आहे. दररोज अनेक लोक या पंपांवर येऊन इंधन भरतात. तेथे प्रसाधनगृहांची सोय आवश्यक होती. त्यामुळे हजारो लोकांना आम्ही ती सुविधा उपलब्ध करून दिली. स्वच्छ भारत योजनेत प्रत्येक पंपावर प्रसाधनगृहे, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन सुविधा देण्यात आल्या आहेत. एकूण ५६६०१ पेट्रोल पंपांपैकी ५५७८४ पंपांवर टॉयलेट सुविधा देण्यात आली आहे. पेट्रोलियम




व नैसर्गिक वायू मंत्रालयाने महिला सुरक्षा व सभ्यता या गोष्टींना प्राधान्य दिले असून राष्ट्रीय व राज्य मार्गांवर पुरूष व महिला यांच्यासाठी वेगळी स्वच्छतागृहे उपलब्ध केली आहेत. या मार्गांवरील ९० टक्के पंपांवर ही सुविधा दिली आहे. स्वच्छता ॲट पेट्रोलपंप या ॲपवर या प्रसाधनगृहांची स्वच्छता केली आहे की नाही हेही कळते. त्यावर लोकच लक्ष ठेवू शकतात. आता वापरकर्त्यांना सोयीची अशी प्रसाधनगृहे महिला व पुरूष यांच्यासाठी सुरू करण्यात येत असून सगळ्या भारतातील पेट्रोल पंपांवर त्या सुविधा दिल्या जात आहेत.

गेली अनेक वर्षे भारतातील विशेष करून ग्रामीण भागातील महिला चुलीच्या धुरामुळे त्रासल्या होत्या. त्यांना सरपण, कोळसा, गोवऱ्या चुलीत जाळल्याने होणाऱ्या धुराचा फटका बसत होता. प्रदूषणही होत असे. महिला व मुलांना श्वसनाचे व डोळ्याचे आजार धुरामुळे होत असत. चुलींमुळे या महिला

**उत्तर भारतात पिकांचे अवशेष काढणीनंतर जाळले जातात. त्यामुळे धूर होतो व तो धुक्यात मिसळून काळे धुके हिवाळ्यात तयार होते, ते घातक आहे. पर्यावरण प्रदूषणाच्या या समस्येवर उपाय करणे आवश्यक होते. त्यामुळे सरकारने २०१८ मध्ये जैवइंधन धोरण मंजूर केले असून त्यात कृषी कचऱ्यापासून इंधने तयार केली जात आहेत. त्यातून शेतकऱ्यांनाही कृषी कचरा विकून उत्पन्न मिळत आहे.**

स्वयंपाकाच्या कामातच अडकून पडत त्यांना रोजीरोटी कमावण्याची संधी नव्हती आता त्या चटकन स्वयंपाक उरकून अर्थार्जनासाठी वेगळी कामे करू शकतात. त्यामुळे त्यांची सामाजिक समानताही आता वाढत आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे आम्ही ज्या योजना राबवल्या त्यातून हे शक्य झाले. अनेक कुटुंबे व महिला यांना स्वयंपाकाचा गॅस परवडत नव्हता पण पंतप्रधानांनी गॅसच्या निळ्या ज्योतीने त्यांच्या जीवनात क्रांती आणली. १ मे २०१६ रोजी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना सुरू करण्यात आली. वंचित व अनुसूचित जाती जमाती गटातील महिलांना ५.५१ कोटी गॅस जोड देण्यात आले. या योजनेने महिलांचे व त्यांच्या कुटुंबाचे जीवन उजळून गेले. २०२० पर्यंत असे ८ कोटी गॅस जोड देण्याचे उद्दिष्ट माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठेवले आहे. याचा पर्यावरणावर चांगला परिणाम होत आहे कारण एलपीजी गॅस जोडांची उपलब्धता स्वातंत्र्यापासून २०१४ पर्यंत केवळ ५४ टक्के होती. ती हा लेख लिहित असतानापर्यंत २०१८ मध्ये ८८ टक्के आहे.

देशाचा आर्थिक विकास होत असताना पेट्रोलियम इंधनांचा खप वाढत आहे. त्यामुळे प्रदूषण वाढत आहे. भारतात हवामान बदल सीओपी २१ या पॅरिसमधील कराराची उद्दिष्टे

साध्य करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सरकार त्यासाठी अनेक धोरणात्मक उपाय करीत असून वाहनांच्या इंधनाचा धूर कमी करून इंधनाची कार्यक्षमता वाढवत आहे. भारतात नियमनासाठी भारत स्टेज प्रमाणकांची व्यवस्था केली असून देशातील सर्व पेट्रोल पंपांवर एप्रिल २०१७ अखेर भारत स्टेज ४ मानके राबवण्यात आले आहेत. सरकारने भारत स्टेज ४ कडून भारत स्टेज ६ कडे झेप घेतली आहे. बीएस ६ इंधन मानकांमुळे खूप कमी प्रदूषण होते. जागतिक युरो ६ मानकांपेक्षाही भारत स्टेज ६ मानके जास्त लाभदायी आहेत. एप्रिल २०१८ मध्ये दिल्लीतील पेट्रोल पंपावर बीएस ६ (भारत स्टेज ६) मानकांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. एप्रिल २०२० पर्यंत सगळ्या भारतात त्याची अंमलबजावणी सुरू होईल. आर्थिक वाढ साध्य करतानाच हवामान बदलांचा सामना करण्यासाठी जैवइंधनांचा वापर केला जात आहे. आपली अर्थव्यवस्था कृषी प्रधान आहे. लाखो लोक अजूनही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. उत्तर भारतात पिकांचे अवशेष काढणीनंतर जाळले जातात. त्यामुळे धूर होतो व तो धुक्यात मिसळून काळे धुके हिवाळ्यात तयार होते, ते घातक आहे. पर्यावरण प्रदूषणाच्या या समस्येवर उपाय करणे आवश्यक होते. त्यामुळे सरकारने २०१८ मध्ये जैवइंधन धोरण मंजूर केले असून त्यात कृषी कचऱ्यापासून इंधने तयार केली जात आहेत. त्यातून शेतकऱ्यांनाही कृषी कचरा विकून उत्पन्न मिळत आहे. जैवइंधन शुद्धीकरण कारखान्यांची सुधारित आवृत्ती तयार होत असून त्यात कृषी कचऱ्यापासून जैव इथेनॉल तयार करण्यात येईल. आतापर्यंत पेट्रोलमध्ये ४ टक्के इथेनॉल मिसळण्यास परवानगी दिल्याने हरितगृहवायू उत्सर्जनात ७८लाख मेट्रिक टन घट झालीआहे. इंधन आयातीवर होणारा खर्च कमी होऊन १५२० दशलक्ष डॉलर्सचे परकीय चलन वाचले आहे. आमचे उद्दीष्ट पेट्रोलमध्ये १० टक्के इथेनॉल मिसळण्याचे आहे. वापरलेल्या खाद्यतेलापासूनही जैव डिझेल तयार करता येते. त्यामुळे इंधन उत्पादन वाढते शिवाय वापरलेले खाद्यतेल पुन्हा पुन्हा वापरण्याचा धोकाही टळतो. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने सौर व पवन उर्जेला प्राधान्य दिले असून तेल व नैसर्गिक वायू मंत्रालयाने सुरू केलेल्या पवन उर्जा प्रकल्पात २०१४-१८ या काळात ३६९.८० मेगावॅट वीज उत्पादन सुरू झाले. हे प्रमाण

**स्वच्छता कार्यक्रम हा केवळ एक सरकारी कार्यक्रम नाही तर लोकांचा जीवनमार्ग बदलण्याची चळवळ आहे. स्वच्छता पंधरवडा, स्वच्छता ही सेवा यासारख्या कार्यक्रमातून स्वच्छता अभियानाचा संदेश लाखो भारतीयांपर्यंत पोहोचला आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, कौशल्य विकास व रोजगार मंत्रालय यांनी सार्वजनिक ठिकाणी श्रमदानातून, वॉकॅथॉन तसेच सायक्लोथॉन यासारख्या उपक्रमातून जागृती केली आहे.**

२०१०-१४ दरम्यान २९९.६० मेगावॅट होते. सौर ऊर्जा प्रकल्पात मंत्रालयाने अशीच क्षमता वाढवली आहे. २०१०-१४ मध्ये मंत्रालयाच्या सौर प्रकल्पांची वीज क्षमता १५.६३ मेगावॅट होती. ती २०१४-१८ या काळात ७०.८७ मेगावॅट झाली. तेल व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सरकारी तेल कंपन्यांनी नफाच मिळवला आहे व त्यातून ३३ टक्के खर्च कंपनी सामाजिक जबाबदारीतून स्वच्छ भारत अभियानात केला जात आहे. स्वच्छ भारत अभियानाचा त्यामुळे प्रभाव वाढला आहे. स्वच्छ भारत योजनेच्या उपप्रकल्पात सरकारी तेल कंपन्या तसेच तेल मंत्रालयाने २१७५० शाळात प्रसाधनगृहे उभारली असून त्यातील ९५ टक्के ग्रामीण भागात आहेत. त्यांचा वापर पाच लाख मुली करीत आहेत. मुलींची शाळेतून गळती कमी झाली आहे. स्वच्छ भारत योजनेमुळे सक्षमीकरणही वाढले आहे. आपल्या देशात अनेक ऐतिहासिक महत्वाची पर्यटन स्थळे आहेत तेथे हजारो पर्यटक रोज येतात. त्यामुळे कचऱ्याचे ढीग साचतात. त्यामुळे तेल व वायू मंत्रालयाने १० धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे निगा राखण्यासाठी दत्तक घेतली आहेत. त्यात तिरूमला तिरूपती देवस्थानम-तिरूपती, कामाख्य मंदिर-गुवाहाटी, ताजमहाल-आग्रा, वैष्णोदेवी-कटरा, मीनाक्षी मंदिर-मदुराई, सुवर्ण मंदिर- अमृतसर, गंगोत्री, यमुनोत्री व गया तसेच काळदी यांचा समावेश आहे.

तामिळनाडूत तंजावर येथील इंडियन ऑइल कार्पोरेशनने बंडीकूट रोबोटिक मॅनहोल क्लीनर म्हणजे गटारीसाफ करणारा यंत्रमानवर वापरात आणला आहे. तेल व नैसर्गिक वायू महामंडळाने गुजरात व राजस्थान येथे ग्रामीण महिलांनी वापरेलेले सॅनिटरी पॅड जाळण्यासाठी पर्यावरणस्नेही भट्ट्या (इनसिनिरेटर्स) उपलब्ध केले आहेत. आसाम, झारखंड व त्रिपुरामध्ये पाण्याचे एटीएम तसेच सौर जलशुद्धीकारक यंत्रे उपलब्ध केली आहेत. त्यांचा वापर लाखो लोक करीत आहेत. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड म्हणजे बीपीसीएलने तामिळनाडूत आवडी व पुनामाली येथे रोज १७४ मेट्रिक टन कंपोस्ट खत तयार करणारी ३३ केंद्रे सुरू केली आहेत. हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीने टाटा ट्रस्टच्या मदतीने चार राज्यात ३०० शाळांमध्ये पन्नास हजार मुलांसाठी

स्वच्छता सुविधा दिल्या आहेत. कौशल्य विकास मंत्रालयाने पेयजल व स्वच्छता मंत्रालयाशी जुलै २०१८ मध्ये करार केला असून त्यात पन्नास हजार गवंड्यांना दोन खड्ड्यांची स्वच्छता गृहे बांधण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. कचरा व्यवस्थापनासाठी कौशल्य विकासाचा वापर यात केला जात आहे. कचरा व्यवस्थापन , कृषी कचरा व्यवस्थापन यातही कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जात आहे.

या सगळ्या योजनांमध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीचा मोठा वाटा असून स्वच्छता कार्यक्रम हा केवळ एक सरकारी कार्यक्रम नाही तर लोकांचा जीवनमार्ग बदलण्याची चळवळ आहे. स्वच्छता पंधरवडा, स्वच्छता ही सेवा यासारख्या कार्यक्रमातून स्वच्छता अभियानाचा संदेश लाखो भारतीयांपर्यंत पोहोचला आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, कौशल्य विकास व रोजगार मंत्रालय यांनी सार्वजनिक ठिकाणी श्रमदानातून, वॉकॅथॉन तसेच सायक्लोथॉन यासारख्या उपक्रमातून जागृती केली आहे. २०१७ मध्ये आमच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाला स्वच्छ भारत अभियानत आंतरमंत्रालयीन पहिला पुरस्कार मिळाला होता याचा आम्हाला अभिमानाच वाटतो. स्वच्छ भारत योजना हे आता जनआंदोलन झाले आहे. अनेक लोक त्यात सहभागी झाले असून समाजाला स्वच्छतेची जबाबदारी कळली आहे. अजून बरीच वाटचाल बाकी आहे. पुढील २ ऑक्टोबर २०१९ रोजी आपण महात्मा गांधी यांची दीडशेवी जयंती साजरी करणार आहोत. शंभर टक्के हागणदारी मुक्त भारत साकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय व कौशल्य विकास मंत्रालय यांच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियानासाठी काम केले जाईल, स्वच्छ –हरित-आरोग्यपूर्ण, शाश्वत व सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक भारतासाठी आम्ही वचनबद्ध राहू याची मी ग्वाही देतो. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या मोहिमेत तुम्ही सर्वांनी सर्व ताकदीनिशी सहभागी होऊन स्वच्छ व स्वस्थ भारताचे बापूंचे स्वप्न साकार करावे अशी मी तुम्हा सर्वांना विनंती करतो.

जोपर्यंत तुम्ही हातात झाडू व टोपली घेत नाही तोपर्यंत गावे व शहरे स्वच्छ होणार नाहीत – महात्मा गांधी

! जयहिंद !

■■■

*लेखक पेट्रोलियम- नैसर्गिक वायू व कौशल्य विकास-रोजगार या खात्यांचे केंद्रीय मंत्री आहेत.*

*ई मेल: min.png@nic.in*



# स्वच्छ आणि निरोगी गावांसाठी

**- नरेंद्र सिंह तोमर**



**गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास घडवून आणण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे आणि स्वच्छता ही या प्रयत्नांचा सर्वात महत्वाचा घटक आहे. जर गावे स्वच्छ नसतील तर गावांचा विकास अपूर्ण राहील. ग्रामीण जनतेच्या जीवनशैलीत अमुलाग्र बदल घडवून आणणारा एक उपक्रम म्हणजे स्वच्छ भारत अभियान.**

आपला देश हा त्याच्या गावांमध्ये वसतो आणि जेव्हा गावांचा विकास होतो तेव्हा देशाचा सर्वांगीण आणि सर्वसमावेशक विकास शक्य आहे. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली, ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी सरकार वचनबद्ध आहे. मात्र, ग्रामीण भारताची स्वच्छता न केल्यास, विकासाचे हे स्वप्न अपूर्ण राहील. गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास घडवून आणण्यासाठी सरकार सर्व प्रयत्न करीत आहे आणि स्वच्छता ही या प्रयत्नांचा सर्वात महत्वाचा घटक आहे. जर गावे स्वच्छ नसतील तर गावांचा विकास अपूर्ण राहील. ग्रामीण भागात राहणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी अनेक नाविन्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले आहेत किंवा अनेक नवीन प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण जनतेच्या जीवनशैलीत अमुलाग्र बदल घडवून आणणारा एक उपक्रम म्हणजे स्वच्छ भारत अभियान.

२ ऑक्टोबर २०१४ ला शुभारंभ करण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानाची उद्दिष्टे मानवी जीवन स्वच्छ, स्वस्थ आणि सन्मानित करणे ही आहे. स्वच्छता केवळ जीवनशैलीच नव्हे तर मानवी विकासाचा आधारस्तंभ आहे. कोणताही समाज किंवा समुदाय जोपर्यंत स्वच्छतेचे पालन करत नाही तोपर्यंत तो यशस्वी होऊ शकत नाही. स्वच्छतेच्या अनुपस्थितीत शिक्षण, आरोग्य, दारिद्र्य निर्मूलन, मानव विकास ही उद्दिष्टे साध्य होऊ शकत नाही.

देशाच्या आर्थिक विकासात देखील स्वच्छतेचे लक्षणीय योगदान आहे. पंतप्रधानांनी लाल किल्यावरुन केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या त्यांच्या पहिल्या भाषणात स्वच्छ भारत निर्मितीसाठी स्पष्ट भूमिका मांडली होती. त्यांनी स्वच्छतेला राष्ट्रीय स्तरावर प्राधान्य दिले. नवी दिल्ली येथे स्वच्छ भारत अभियान सुरु करताना पंतप्रधानांनी सांगितले होते की, गांधीजींचे स्वच्छ भारताचे स्वप्न, वर्ष २०१९ मध्ये त्यांच्या १५० व्या जयंतीपर्यंत पूर्ण करणे ही भारताचे नागरिक म्हणून आपली सामाजिक जबाबदारी आहे. आज संपूर्ण देश ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी एकत्र आला आहे. समाजाच्या विविध घटकातील लोकांनी स्वच्छतेच्या या आंदोलनास प्रोत्साहन दिले आहे आणि अजूनही ते पूर्ण उत्साहात सुरु आहे. दररोज कोट्यवधी भारतीय स्वच्छ भारत उपक्रमात सामील होत आहेत. आज २२ राज्ये, ४६८ जिल्हे आणि देशातील ४ लाख ६८ हजारांहून अधिक गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. २ ऑक्टोबर २०१४ पासून ८.५९ लाख वैयक्तिक घरगुती शौचालये बांधण्यात आली आहेत. २ ऑक्टोबर २०१४ रोजी देशात स्वच्छतेचे प्रमाण ३८.७० टक्के होते आणि सध्या ते ९३.९० टक्के आहे. आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात जगात कुठेही इतकी मोठी प्रगती झालेली दिसून येत नाही. भारताने त्याच्या महान प्रयत्नांनी, एखाद्या सामाजिक आस्थेच्या विषयावर देश कशाप्रकारे उत्साह आणि

एकत्र काम करण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो याचे, जगासमोर एक अद्वितीय उदाहरण सादर केले आहे. आज, भारताच्या या कार्यक्रमापासून प्रेरणा घेऊन, जगातील अनेक देश त्यांच्या स्वच्छतेच्या परिस्थिती सुधारणा करण्यासाठी या आराखड्यानुसार नियोजन करीत आहेत.

### आमच्या गावांचे नशीब बदलत आहे

स्वच्छ भारत अभियानाने आज गावाचा चेहरा आणि भाग्य बदलले आहे. एका अभ्यासानुसार हे निष्पन्न झाले आहे की, हागणदारीमुक्त गावातील प्रत्येक घरात ५०००० रुपयांची बचत होते. नाहीतर याआधी या कुटुंबांचे हे पैसे विविध प्रकारच्या आजारांच्या उपचारावर खर्च व्हायचे. ग्रामीण कुटुंबे आता या बचतींचा वापर नवीन सुविधा मिळविण्यासाठी, मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी आणि त्यांची जीवनशैली सुधारण्यासाठी करत आहेत. जनतेचे आरोग्याशी निगडीत खर्च कमी झाले आहेत आणि ते आता अधिक दिवस काम करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अभ्यासानुसार, देशात स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी झाल्यापासून ग्रामीण भागात घातक आजारांमुळे बळी पडत असलेल्या मुलांच्या संख्येत मोठ्या प्रमाणत घट झाली आहे आणि ही परिस्थिती सतत सुधारत आहे.

**दररोज कोट्यवधी भारतीय स्वच्छ भारत उपक्रमात सामील होत आहेत. आज २२ राज्ये, ४६८ जिल्हे आणि देशातील ४ लाख ६८ हजारांहून अधिक गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. २ ऑक्टोबर २०१४ पासून ८.५९ लाख वैयक्तिक घरगुती शौचालये बांधण्यात आली आहेत. २ ऑक्टोबर २०१४ रोजी देशात स्वच्छतेचे प्रमाण ३८.७० टक्के होते आणि सध्या ते ९३.९० टक्के आहे.**

### अद्वितीय उपक्रम

स्वच्छ भारत अभियानाने ग्रामीण भागात असे काही अद्वितीय उपक्रम सुरु केले जे याआधी कधीही झाले नव्हते. स्वयं-सहाय्यता गटाशी संबंधित महिलांनी स्वच्छता अभियानात प्रशंसनीय योगदान दिले आहे. त्यांनी त्यांची बचत स्वच्छतेशी निगडीत कार्यात गुंतवली आणि अशाप्रकारे वातावरण आणि परिसर सुंदर आणि स्वच्छ करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. स्वयं-सहाय्यता गटांच्या महिला सदस्यांनी आर्थिक संकटांत अडकलेल्या अनेक कुटुंबांना आर्थिक मदत केली. स्वयं-सहाय्यता गटांनी


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

Phone No. / email : ________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

परस्पर सहकार्याने केलेल्या अनेक प्रयत्नांमधून सामाजिक सौहार्द मजबूत करण्यास मदत केली आहे. आमच्या पंचायत प्रतिनिधींनी देखील स्वच्छ भारत अभियानामध्ये प्रशंसनीय रूची दर्शविली आहे. त्यांनी त्यांच्या पंचायती हागणदारीमुक्त करण्यासाठी प्रभावी योजना आखल्या, त्यांची उत्साहाने आणि कार्यक्षमतेने अंमलबजावणी केली आणि त्यांच्या अंमलबजावणीत लक्षणीय योगदान दिले. ग्रामपंचायतींनी केवळ जनतेला या कार्यक्रमांशी जोडण्याचा आणि सर्वांच्या सहकार्याने ग्रामपंचायत हागणदारीमुक्त करण्याचा प्रयत्न केला नाही तर त्यांनी घन आणि द्रवकचरा व्यवस्थापनाशी संबंधित कार्यक्रम करून पर्यावरणविषयक स्वच्छतेला देखील प्रोत्साहन दिले.

स्वच्छ भारत अभियानाने आता लोकचळवळीचे रूप धारण केले आहे आणि ह्याला पुढे नेण्याच्या उद्देशाने; ग्रामीण विकास मंत्रालयाने त्यांच्या महत्वाकांशी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-मनरेगा अंतर्गत अनेक उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये ग्रामीण भागात स्वच्छतेप्रती ग्रामपंचायतींमध्ये जनजागृती करणे आणि ग्रामस्थांना त्यांच्या उपजीविकेसंबंधित कार्यक्रमांविषयी प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देणे याचा समावेश आहे. मंत्रालय घरगुती वैयक्तिक शौचालये आणि शोष खड्डे बांधण्यात, घनकचरा व्यवस्थापन (गांडूळ/ एनएडीईपी खत खड्डा), घन आणि द्रवकचरा व्यवस्थापनासंबंधित कामे, गटार, द्रव जैवखत, खड्डे पुनर्भरण, शाळा आणि अंगणवाडीमध्ये शौचालये, शोष खड्डे, वापरलेले राखाडीचे पाणी (सांडपाणी) उपयुक्त करण्यासाठी गावातील नाले, जल स्थिरीकरण तलावांचे बांधकाम आणि जलसंवर्धन कार्ये करण्यात व्यग्र आहे. प्रत्येक ग्रामपंचायत स्वच्छ पंचायत बनेल यावर भर दिला जात आहे.

## सांडपाणी व्यवस्थापन

सांडपाण्याचे व्यवस्थापन हे आज संपूर्ण जगासमोरील एक मोठे आव्हान आहे. ग्रामीण भाग असो किंवा शहरी, सांडपाणी व्यवस्थापनाच्या नियोजन आणि पायाभूत सुविधांमधील त्रुटींमुळे जीवन अस्वच्छ होते. यामुळे रोग आणि संक्रमण पसरते. यासंदर्भात हे सांगताना आम्हाला आनंद होत आहे की, तेलंगणा राज्यात सांडपाणी व्यवस्थापनासाठी कौटुंबिक आणि सामुदायिक पातळीवर मनरेगा अंतर्गत शोषखड्डे बांधण्यात आले. त्याचप्रमाणे, महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात मनरेगा निधीचा वापर शोषखड्डे बांधण्यासाठी केला गेला ज्यामुळे गावे डासांपासून मुक्त होण्यात मदत झाली. सुमारे ३० गावांमध्ये ही योजना राबविली गेली. शोषखड्डे बांधल्यामुळे मच्छरांचे प्रजनन नियंत्रित होते. जेणेकरून गावातील लोक शांततेने झोपू शकतील आणि डासांमुळे होणाऱ्या रोगांपासून लोकांचे संरक्षण

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

होईल . मनरेगा अंतर्गत एक अभिनव उपक्रम म्हणून मिझोराम येथील आयझोल जिल्ह्यातील ट्लंगलम आर जी ब्लॉकच्या लिंगपुई वॉटर टँकचे बांधकाम करण्यात आले. ही पाण्याची टाकी विमानाच्या आकाराची असून आयझोल जिल्ह्यातील विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावर बांधण्यात आली आहे. टाकीच्या परिसरात सार्वजनिक नळ देखील आहेत जे सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवतात. टाकीच्या परिसरात सुलभ शौचालये देखील बांधण्यात आली आहेत. या ठिकाणी करण्यात आलेल्या या सुविधा आणि व्यवस्थांमुळे ही बहुद्देशीय इमारत झाली आहे. ग्रामपंचायतीसाठी देखील हे उत्पन्नाचे साधन झाले आहे. हरयाणा सरकारने मनरेगा अंतर्गत सांडपाण्याचे स्थिरीकरण करण्यासाठी ग्रामीण भागात पाच तलावांची प्रणाली विकसित केली आहे. ग्रामीण भागात सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि चांगली जीवनशैली सुनिश्चित करून गावातील वातावरण स्वच्छ करणे हे या प्रणालीचे मुख्य उद्दीष्ट आहे. केरळच्या त्रिशूर जिल्ह्यातील मतीलाकाम ब्लॉक मधील अरिड ग्रामपंचायतीने बांधकाम साहित्याची निर्मिती करण्यासाठी एक प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत बनवलेल्या सिमेंट कॉंक्रीट ब्लॉकचा वापर वैयक्तिक घरगुती शौचालये तयार करण्यासारख्या मनरेगाच्या कामासाठी करण्यात आला. मनरेगा योजनेअंतर्गत गांडूळखत प्रकल्प देखील उभारण्यात आले आहेत.

### वैयक्तिक स्वच्छता

ग्रामीण स्वच्छतेशी संबंधित कामांवर मनरेगा निधीची प्रचंड रक्कम खर्च केली जात आहे आणि अपेक्षित परिणाम देखील दिसून येत आहेत. या योजनेद्वारे आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान ९२,४३५ लाख रुपये वैयक्तिक




**आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या २९३८ लाख रुपयांच्या तुलनेत गेल्या आर्थिक वर्षात शोष खड्डे बांधण्यासाठी १५५९८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान गांडूळ/एनएडीईपी खत खड्यांच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनासाठी १६७६ लाख रुपये खर्च करण्यात आले, तर याच कामासाठी गेल्यावर्षी ५४८५३ लाख रुपये खर्च करण्यात आले.**

घरगुती शौचालयांच्या बांधकामावर खर्च करण्यात आले आहेत. गेल्या आर्थिक वर्षामध्ये १३,९३५ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला होता. आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या २९३८ लाख रुपयांच्या तुलनेत गेल्या आर्थिक वर्षात शोष खड्डे बांधण्यासाठी १५५९८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान गांडूळ/एनएडीईपी खत खड्यांच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनासाठी १६७६ लाख रुपये खर्च करण्यात आले, तर याच कामासाठी गेल्यावर्षी ५४८५३ लाख रुपये खर्च करण्यात आले. २०१४-१५ या आर्थिक वर्षादरम्यान, गटारांचे नाले, द्रव जैव खत, पुन:प्रभारित खड्डे, शाळा आणि आंगणवाडी शौचालय, शोषनाले,गावातील नाले आणि स्थिरीकरण तलाव इत्यादीसारख्या घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन कामावर ४९५१२ लाख रुपये खर्च करण्यात आले. या तुलनेत, २०१७-१८ या आर्थिक वर्षात या कामांवर ८५२२१ लाख रुपये खर्च झाले. आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये सुमारे ४७,१३० लाख रुपये जलसंधारणाच्या कार्यांवर खर्च करण्यात आले. तथापि, या रकमेच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०१७-१८ दरम्यान ६९२२१६ लाख रुपये खर्च करण्यात आले. स्वच्छतेशी संबंधित सर्व कामांवर आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये ६१७७९२ लाख रुपये, २०१५-१६ मध्ये ६९८३५७ लाख रुपये आणि २०१७-१८ मध्ये ९८७८२२ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. चालू आर्थिक वर्षात देखील स्वच्छतेशी संबंधित सर्व कामांवर आतापर्यंत सुमारे ५९,३०७० लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. अशाप्रकारे ग्रामीण भागातील एकूण स्वच्छतेसंबंधित कामांवर मोठ्या प्रमाणात मनरेगा निधी खर्च केला गेला आहे किंवा खर्च करण्यात येत आहे.

### भौतिक यश

मनरेगाद्वारे ग्रामीण स्वच्छतेच्या क्षेत्रातील भौतिक उपलब्धतेकडे आपण पाहिल्यास आपल्याला लक्षात येईल की २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात, मनरेगा निधी वापरुन १३.८८ लाख

वैयक्तिक घरगुती शौचालये बांधण्यात आली आहेत. मनरेगा निधी वापरुन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सुमारे ७ लाख शौचालये, आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये सुमारे ७.५ लाख शौचालये आणि २०१७-१८ मध्ये ९ लाख शौचालये बांधण्यात आली आहेत. २०१६-१७ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणावर शोषखड्डे बांधण्यात आले. आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील ३७००० शोषखड्डे बांधकामाच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये यात लक्षणीय वाढ होऊन हा आकडा ४२१५५३ वर गेला. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये देखील २१९,००० पेक्षा अधिक शोषखड्डे बांधण्यात आले. गांडूळ/एनएडीईपी खत खड्डे बनवून घनकचरा व्यवस्थापनात देखील महत्त्वपूर्ण प्रगती दिसून आली आहे. २०१४-१५ च्या ५००० खड्ड्यांच्या तुलनेत यात वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ते १८२००० आणि २०१७-१८ मध्ये २५४००० वर गेले आहे. गटारांचे नाले, द्रव जैव खत, पुन:प्रभारित खड्डे, शाळा आणि आंगणवाडी शौचालय, शोष नाले,गावातील नाले आणि स्थिरीकरण तलाव इत्यादीसारख्या घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन कामांमध्ये देखील लक्षणीय प्रगती दिसून आली आले. २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये अशा प्रकारच्या ८२५६४ कामांची पूर्तता झाली आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये अशा प्रकारच्या कामाची संख्या वाढून ती ३८२७२५ वर गेली. २०१७-१८ या आर्थिक वर्षात, अशा प्रकारची १८३००० पेक्षाही जास्त कामे पूर्ण करण्यात आली आहेत. जलसंधारण कार्यात मनरेगा निधीचा वापर कार्यक्षमतेने केला जात असून यात चांगली प्रगतीही दिसून येत आहे. पायाभूत विकास प्रकल्पांतर्गत आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान २७६००० कार्ये, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये २७७०००, २०१६-१७ या आर्थिक वर्षात ६००००० आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ३८४००० जलसंधारणासंबंधित कामे करण्यात आली.

**आव्हानांचा सामना**

ही सर्व तथ्ये आणि माहिती स्पष्टपणे दर्शवते की सरकारने ग्रामीण भागाच्या विकासावर आणि प्रत्येक बाबतीत गावांना स्वच्छ करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. खऱ्या अर्थाने देशाची जीवनरेषा असलेल्या गावांच्या विकासासाठी, ग्रामीण विकास मंत्रालय ग्रामीण भागात सर्वतोपरी स्वच्छतेची हमी देण्यासाठी नियोजित प्रयत्न करत आहे. हा असा पैलू आहे ज्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मनरेगा ही देशातील सर्वात महत्वाकांक्षी योजना ग्रामीण विकास मंत्रालयाने राबवली आहे, या योजनेचे महत्व सगळ्यांना समजले आहे आणि त्याच्या हजारो याशोगाथांनी हे सिद्ध केले आहे की आमच्या देशातील नागरिक गावातील स्वच्छतेच्या महत्वाबद्दल जागरुक झाले आहेत आणि गावांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी ते कटिबद्ध आहेत.

ग्रामपंचायत केवळ वैयक्तिक घरगुती शौचालयांद्वारे स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करत नसून गांडूळ खत खड्ड्यांद्वारे कचऱ्याचे निर्मूलन करण्यासाठी पावले उचलत आहेत. मनरेगाच्या अंमलबजावणी अंतर्गत गटार, द्रव जैव खत, पुन:प्रभारित खड्डे, शाळा आणि आंगनवाडी शौचालये, शोष नाले, गावातील गटारे आणि स्थिरीकरण तलावासारख्या कामांमध्ये पंचायती स्वच्छ वातावरणाच्या देखरेखीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. तथापि, देशातील गावांची विविधता लक्षात घेता, भारतातील सर्व २३८६१७ ग्राम पंचायतींसाठी स्वच्छतेचा कोणत्याही एकाच प्रकारच्या आराखड्याचा वापर केला जाऊ शकत नाही. होय, आपल्याला अशा उपाययोजनांच्या विकासावर लक्ष केंद्रित करायला हवे जे अवलंब करायला सोपे, आर्थिकदृष्ट्या परवडणारे आणि किमान तांत्रिक मर्यादा असलेले असतील. ग्रामीण भारत स्वच्छ करण्यासाठी मनरेगाचे क्रांतिकारी उपक्रम आणि सध्याच्या सरकारने केलेली त्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळे त्याचे रचनात्मक परिणाम दिसण्यास सुरुवात झाली आहे.

खरं तर, ग्रामीण विकास मंत्रालयाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल सुधारत आहे आणि देशाच्या ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळण्यास मदत होत आहे. आपल्या पंतप्रधानांनी १५ सप्टेंबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१८ पर्यंत 'स्वच्छता हि सेवा' हा कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांचा उत्साह हा खूप प्रशंसनीय आहे. या संदर्भात मी आपल्या देशातील सर्व प्रिय ग्रामस्थांना विनंती करू इच्छितो की त्यांनी हे काम केवळ ऑक्टोबरपर्यंत मर्यादित न ठेवता त्याला त्यांच्या रोजच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनवावे, त्यांनी सवय लावून घ्यावी आणि गाव,रस्ते,पर्यावरण आणि परिसर स्वच्छ करण्याचे काम नियमितपणे करावे, यामुळे ग्रामीण आयुष्य समृद्ध होईल. खरं तर, हे नवभारताच्या निर्मितीमधील त्यांचे अद्वितीय योगदान असेल.

■■■

*लेखक ग्रामविकास, पंचायती राज आणि खाण या खात्यांचे केंद्रीय मंत्री आहेत.*

*ई मेल: ns.tomar@sansad.nic.in*

# शहरी भागांतील स्वच्छता मोहीम

**- दुर्गा शंकर मिश्रा**



**जगभरात उत्तम स्वच्छता, स्वच्छतेच्या सवयी आणि हायजीन हे विविध रोगवाहक विषाणूपासून होणारे रोग, जंतूमुळे होणारे आजार आणि कुपोषणामुळे होणाऱ्या आजारांवर परिणामकारक नियंत्रण मिळवण्यास मदत करतात, हे दर्शवणारा लक्षणीय पुरावा उपलब्ध आहे. स्वच्छतेच्या सवयी आणि स्वच्छता यांचा थेट संबंध श्वसनाचे विकार, पोटाचे विकार (विशेषत: हगवण), मानसिक आजार आणि ॲलर्जीमुळे होणारे आजार यात घट होण्याशी आहे, हे सिद्ध करणारे अनेक अभ्यास अहवाल आले आहेत.**

स्वच्छ भारताच्या दिशेने प्रवास करताना आतापर्यंत सरकारने केलेल्या उपाययोजनेचे उत्कृष्ट लक्षण नियामक आणि धोरणात्मक स्तरावर बदल, शाश्वत पायाभूत रचना तयार करणे आणि नागरिकांच्या व्यापक सहभागाने लोकांमध्ये वर्तणूक आणि व्यावहारिक बदल घडवून आणण्यावर भर, या सर्वांचा समावेश असलेले बहु आयामी दृष्टीकोन हे राहिले आहे.

### दर्जाहीन स्वच्छतेमुळे मोजावी लागणारी किंमत

शाश्वत विकासाची उद्दिष्टे स्वच्छता, स्वच्छतेच्या सवयी आणि हायजीन यावर लक्षणीय जोर देतात. संपूर्ण जगभरात उत्तम स्वच्छता, स्वच्छतेच्या सवयी आणि हायजीन हे विविध रोगवाहक विषाणूपासून होणारे रोग, जंतूमुळे होणारे आजार आणि कुपोषणामुळे होणाऱ्या आजारांवर परिणामकारक नियंत्रण मिळवण्यास मदत करतात, हे दर्शवणारा लक्षणीय पुरावा उपलब्ध आहे. स्वच्छतेच्या सवयी आणि स्वच्छता यांचा थेट संबंध श्वसनाचे विकार, पोटाचे विकार (विशेषत: हगवण), मानसिक आजार आणि ॲलर्जीमुळे होणारे आजार यात घट होण्याशी आहे, हे सिद्ध करणारे अनेक अभ्यास अहवाल आले आहेत. युनिसेफच्या अहवालात (२०११), हगवणीमुळे ९० टक्के बालकांच्या होणाऱ्या मृत्यूचा थेट संबंध दूषित पाणी, स्वच्छतेचा अभाव किंवा पोषक आहाराची कमतरता यांच्याशी असल्याचे म्हटले आहे. या व्यतिरिक्त, संसर्गजन्य रोगांना आळा बसण्याबरोबरच, उत्तम स्वच्छता, पोषक आहार आणि कचरा निर्मूलनाची सुविधा यातून कमी वजनाच्या अर्भकांचा जन्म, स्वेच्छेने गर्भपात आणि बालकांमध्ये जन्मजात दोष या प्रकारांत मोठ्या प्रमाणावर घट होते. विविध अभ्यासांनी असे ठामपणे सिद्ध केले आहे की, घनकचरा व्यवस्थापनाची समस्या शहरी भागांतील लोकसंख्या वाढीचा उच्च दर आणि लोकसंख्या एकवटणे, यामुळे गंभीर झाली आहे. समुदाय आणि घरांमधून विशेषत: विष्ठा आणि इतर द्रव आणि घन स्वरूपातील कचरा यांचे अयोग्य व्यवस्थापन आरोग्याला धोकादायक असून त्याची परिणती संसर्गजन्य रोगांत होते. कचऱ्याच्या ढिगांकडे दुर्लक्ष केल्यास माशा, उंदीर आणि इतर जीवजंतू त्याकडे आकर्षिले जातात आणि या बदल्यात ते रोग पसरवतात.

स्वच्छता स्थितीत केलेल्या सुधारणांमुळे आरोग्याच्या बाबतीत चांगले परिणाम दिसून येतात, असे अनेक अभ्यासांनी सिद्ध केले आहे. भारतातील आहार सुरक्षिततेवरील इंडिया हेल्थ रिपोर्टनुसार (PHFL,2015) , मिझोरम या ईशान्येकडील राज्याने उत्तम स्वच्छतेचा लाभ करून दिल्याने २००६ ते २०१४ दरम्यान, वयानुसार सामान्य उंची कमी असलेल्या केसेसमध्ये १३ टक्के तर कमी वजनाच्या (कमी वजनाचे आणि बुटके) केसेसमध्ये ५ टक्के घट झाल्याचे म्हटले आहे. विशेषत: विकसनशील

देशांत, स्वच्छतेत सुधारणा घडवून आणल्याने केवळ आरोग्यावरच चांगला परिणाम होतो असे नाही तर सामाजिक आणि आर्थिक विकासावरही महत्वपूर्ण परिणाम होतो. उदाहरणार्थ, ऑगस्ट २०१७ मध्ये युनिसेफने केलेल्या एका स्वतंत्र अभ्यासात, उघड्यावरील हागणदारी संपूर्ण बंद केली तर प्रत्येक भारतीय कुटुंब वर्षाला ५० हजार रुपयांची बचत करू शकते, असे सिद्ध केले आहे.

### स्वच्छ भारत मोहिमेची सुरुवात


दशकांपूर्वी महात्मा गांधी म्हणाले होते की, 'स्वच्छता ही राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही महत्वाची आहे.' वाढत्या आरोग्य समस्येला आळा घालण्यासाठी

**विकसनशील देशांत, स्वच्छतेत सुधारणा घडवून आणल्याने केवळ आरोग्यावरच चांगला परिणाम होतो असे नाही तर सामाजिक आणि आर्थिक विकासावरही महत्वपूर्ण परिणाम होतो. उदाहरणार्थ, ऑगस्ट २०१७ मध्ये युनिसेफने केलेल्या एका स्वतंत्र अभ्यासात, उघड्यावरील हागणदारी संपूर्ण बंद केली तर प्रत्येक भारतीय कुटुंब वर्षाला ५० हजार रुपयांची बचत करू शकते, असे सिद्ध केले आहे.**


२ ऑक्टोबर, २०१४ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते सुरु झालेली स्वच्छ भारत मोहीम हा भारतासाठी ऐतिहासिक क्षण होता- केवळ स्वच्छतेचा मुद्दा सरकारच्या विकासाच्या अजेंड्याच्या केंद्रस्थानी ठेवला म्हणून नव्हे तर लाल किल्ल्यावरून त्यांनी जो संदेश दिला होता, 'न गंदगी करेंगे, न करने देंगे (मी पर्यावरण अस्वच्छ करणार नाही आणि करूही देणार नाही,) या द्वारे प्रत्येक नागरिकाला स्वच्छतेच्या दिशेने भारताच्या प्रवासात समान भागीदार करून घेण्याच्या दृष्टीनेही दूरगामी होता. स्वच्छ भारत मोहीमेची (आकृती १ पहा) अंमलबजावणी गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार (MoHUA) मंत्रालयाकडून केली जाते आणि २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत सर्व शहरे आणि नगरे कचरा मुक्त तसेच हागणदारी मुक्त करून शहरी भारताचा कायापालट घडवून आणणे, हा त्याचा उद्देश्य आहे. गांधीजींच्या १५० व्या जयंतीला त्यांच्या स्मृतीला हीच खरी श्रद्धांजली असेल.

### आतापर्यंतचा प्रवास

मोहीम सुरु झाल्यापासून तिचा चार वर्षांतील प्रवास अनेक आनंददायक यश आणि काही आव्हानांसह रोमांचक तितकाच चढ-उतारांनी भरलेला राहिला आहे. स्वच्छ भारत मोहीम सुरु केल्यानंतर, पहिल्या दोन वर्षांत सरकारचा प्रमुख भर मोहिमेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सक्षम पर्यावरण तयार करण्यावर होता - सर्व वैधानिक शहरे हागणदारी मुक्त (ओडीएफ) करण्याबरोबर पालिकांकडून टाकल्या जाणाऱ्या घन कचऱ्याचे १०० टक्के शास्त्रीय व्यवस्थापन करणे हे उद्दिष्ट होते. एकीकडे कचऱ्याचे रुपांतर टिकाऊ उत्पादनांमध्ये करण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यास प्रोत्साहन देण्यास सुयोग्य धोरणात्मक बदल करणे आणि त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी पोषक वातावरण तयार करणे या माध्यमातून हे करण्यात आले. या




*स्वच्छ भारत अभियानाचे घटक आणि लक्ष्य (शहरी भाग)*





*स्वच्छ भारत अभियानाच्या उपलब्धींचा गोषवारा (शहरी भाग)*

प्रयत्नांना आश्वासक फळे येत असून (आकृती २ पहा) प्रत्यक्ष परिणाम झपाट्याने घडताना दिसत आहेत, ज्यामुळे मोहिमेच्या प्रगतीचा वेग वाढण्यास मदत होत आहे. स्वच्छता प्रवासाचे शेवटचे वर्ष सुरू करत असताना, आम्ही आमच्या कामगिरीत मिळवलेल्या यशामुळे समाधान आणि अभिमानाने मागे वळून पाहू शकतो, ज्या यशाने भारताला नव्या भारताच्या रोमांचक स्थित्यंतराकडे आणले आहे.

**स्वच्छता – हागणदारी मुक्ततेचा प्रवास (ओडीएफ)**

स्वच्छतेचा जिथपर्यंत संबंध आहे, तोपर्यंत शहरी भागातील मोहिमेची गाडी हागणदारी मुक्ततेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी पूर्णपणे रुळावर आहे. स्वच्छतेच्या बाबतीत सर्वात लक्षणीय यश म्हणजे शहरांत ज्या पद्धतीने एसबीएम (स्वच्छ भारत अभियान) अमलात आणले जात आहे, त्या नमुन्यात बदल घडला आहे - आता पूर्वीप्रमाणे केवळ शौचालयांची संख्या मोजण्यावर नव्हे तर हागणदारी मुक्त शहरे/नगरे मोजून ती तशी कायम राखण्यावर भर दिला जात आहे. जेव्हा मोहीम सुरु करण्यात आली, तेव्हा भारतातील एकही शहर हागणदारी मुक्त नव्हते. आज, १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील शहरी भाग हागणदारी मुक्त झाले आहेत. एखादे शहर ज्या स्वच्छतेच्या आव्हानांना सामोरे जाते, ती आव्हाने परतवून लावण्यासाठी केवळ हागणदारी मुक्त होणे पुरेसे नाही, याची आम्हाला जाणीव झाली आहे. उदाहरणार्थ, जागेच्या टंचाईमुळे एखादे कुटुंब, झोपडपट्टीचे रहिवासी, शहरात नवीन आलेला पाहुणा किंवा विस्थापित लोकसंख्या निसर्गाच्या हाकेला कशी ओ देत असतील? स्वच्छ, वापरात असलेले आणि उपयुक्त शौचालय त्यांना कुठे मिळेल? म्हणून, सामुदायिक आणि सार्वजनिक शौचालयांचे कार्यचालन आणि देखभाल, समग्र स्वच्छता, ज्यात मलाची विल्हेवाट लावण्याबाबतच्या प्रश्नांवर विचार करण्यात आला आहे, त्यासाठी आता आम्ही एसबीएम ओडीएफ + आणि ओडीएफ ++ अहवाल तयार केला आहे. यामुळे ओडीएफमध्ये आम्ही मिळवलेले यश दीर्घ काळासाठी कायम राहील. याच बरोबरीने, मंत्रालयाने (एमओएचयुए) गुगलशी भागीदारी केली असून शहरातील सर्व सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांचे नकाशे गुगल वर टाकून पाहण्यासाठी उपलब्ध केले आहेत. (आकृती ३ पहा) त्यामुळे नागरिक आणि पर्यटकांना निकटच्या सान्निध्यात उपलब्ध असलेल्या सुविधा सहजपणे शोधता येतील. आतापर्यंत देशभरात ५५० शहरे/नगरांमध्ये हे काम पूर्ण झाले असून यापैकी १७९ शहरे एक लाखाहून अधिक वस्तीची आहेत.


**पहिल्या फेरीत, २०१६ मध्ये, ७ कोटी ३० लाखाहून जास्त लोकसंख्या असलेली राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांच्या राजधान्यांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा घेण्यात आली. २०१७ मध्ये, एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या ४३४ शहरांत स्पर्धा घेण्यात आली. स्वच्छ सर्वेक्षण २०१८, ज्यात ४२०३ नागरी स्वराज्य संस्थांचा समावेश होता, आणि ४० कोटी लोकांवर परिणाम करणारे पहिलेवहिले संपूर्ण भारतभर केले गेलेले सर्वेक्षण असून बहुधा जगातील सर्वात विशाल पाहणी असावी.**




*'गुगल ॲप' वर दिसत असलेली शहरी भागातील शौचालये*

**घन कचरा व्यवस्थापन – बहु आयामी दृष्टीकोन**

एक मान्य करावे लागेल की, हागणदारी मुक्ततेचे साध्य भारतात यशस्वी होण्याच्या अंतिम टप्प्यात आहे तर घन कचरा व्यवस्थापनाची समस्या मात्र फार मोठे आव्हान आहे. भारतात, ४० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांत अंदाजे वार्षिक ६ कोटी ५० लाख टन कचरा तयार होतो (आकृती ४ पहा). असा अंदाज आहे की, २०३० पर्यंत १६ कोटी ५० लाख टन आणि २०५० पर्यंत ४५ कोटी ५० लाख टन कचऱ्याची निर्मिती होऊन सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणात्मक आव्हाने त्यातून उभी राहतील. शिवाय, पालिका क्षेत्रातील प्रक्रिया न केलेल्या घन कचऱ्याचे डम्पिंग करण्यासाठी आम्हाला अतिरिक्त १२५० हेक्टर जमीन लागणार आहे.




*शहरी भागातील कचरा/टाकाऊ पदार्थांचे वर्गीकरण*

त्याचमुळे, मंत्रालयाने भारतातील नागरी भागांत शास्त्रीय कचरा व्यवस्थापनाचा किचकट प्रश्न सोडवण्यासाठी बहु आयामी दृष्टीकोन स्वीकारला आहे. यात, एकीकडे कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे रुपांतर टिकाऊ उत्पादनांत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी धोरण आणि नियमनात बदल केले असतानाच निकोप स्पर्धेची वृत्ती वाढीस लावण्यासाठी स्वच्छ सर्वेक्षण आणि दीर्घ मुदतीची शाश्वतता राखण्यासाठी कचरा मुक्त शहरांची वर्गवारी करणे, असे उपाय सुरु केले आहेत.

स्वच्छ भारत मोहिमेचा शुभारंभ करताना, कम्पोस्टिंग, जैविक मिथेनेशन, आरडीएफ आणि कचऱ्याचे ऊर्जेच्या प्रकल्पात रुपांतर अशा कचऱ्यावरील प्रक्रियांची क्षमता वार्षिक ९५ लाख टन होती. गेल्या चार वर्षात यात चांगलीच वाढ झाली असून आज निर्माण झालेल्या एकूण कचऱ्यापैकी जवळपास ३७ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. घन कचरा व्यवस्थापनात छत्तीसगढ, केरळ आणि गोवा यासारखी राज्ये अनुकरणीय काम करत आहेत. त्याच प्रमाणे, घन कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधन आणि शाश्वत दृष्टीकोनासंदर्भात इंदूर, नवी मुंबई, अलिगढ, सासवड आणि बंगळूरू या शहरांनी पुढील दिशा दर्शन केले आहे.

**यंदाच्या २ ऑक्टोबर पूर्वी देशभरात 'स्वच्छता हीच सेवा' हे जे अभियान पंधरवडाभर राबवण्यात आले, त्या अंतर्गत शहरी भारतातील हजारो शहरे आणि नगरांत झालेल्या एकूण २५ हजार कार्यक्रमांमध्ये शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, गृहिणी, आरडब्ल्यूएज, धार्मिक नेते, उद्योग समूह आणि स्थानिक व्यापारी आणि प्रसिद्ध व्यक्तीं मिळून ४० लाख नागरिकांनी सहभाग घेतला. यापूर्वी कोणत्याही जन आंदोलनाबाबत इतकी अभूतपूर्व आपुलकीची भावना दिसली नव्हती.**


### मोहिमेवर देखरेख आणि प्रशासनासाठी साधन – स्वच्छ सर्वेक्षण

नागरी स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत, मंत्रालय विविध स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयी याच्या निकषांवर शहरांची वर्गवारी ठरवण्यासाठी वार्षिक सर्वेक्षण –स्वच्छ सर्वेक्षण राबवत आहे. उत्साही शहरांमध्ये स्वच्छतेच्या कल्पनेकडे जाणाऱ्या निकोप स्पर्धेच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन देऊन हा उपक्रम यशस्वी झाला असून मोहिमेवर देखरेख करण्याचे आणि प्रशासनाचे साधन म्हणून समोर आला आहे. पहिल्या फेरीत, २०१६ मध्ये, ७ कोटी ३० लाखाहून जास्त लोकसंख्या असलेली राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांच्या राजधान्यांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा घेण्यात आली. २०१७ मध्ये, एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या ४३४ शहरांत स्पर्धा घेण्यात आली. स्वच्छ सर्वेक्षण २०१८, ज्यात ४२०३ नागरी स्वराज्य संस्थांचा समावेश होता, आणि ४० कोटी लोकांवर परिणाम करणारे पहिलेवहिले संपूर्ण भारतभर केले गेलेले सर्वेक्षण असून बहुधा जगातील सर्वात विशाल पाहणी असावी.

स्वच्छ सर्वेक्षण २०१९, मध्ये नाविन्यपूर्ण संशोधन, शाश्वतता, नागरिक सहभाग, कचरा मुक्त स्थितीवर भर दिला असून जानेवारी २०१९ पासून सर्व शहरे आणि नगरांत हाती घेतले जाईल.

### कचरामुक्त शहरांसाठी तारांकित क्रमवारी

शहरांची कचरामुक्त स्थितीची पाहणी करून त्यांना कचरा मुक्त शहर असा स्टार प्रदान करण्यासाठी मंत्रालयाने नाविन्यपूर्ण संशोधन करून उपाययोजना केली आहे. तारांकित क्रमवारी उपाय हा १२ निकषांवर आधारित असा क्रमवारी मसुदा असून 'स्मार्ट' चौकट – एस म्हणजे सिंगल मेट्रिक, एम म्हणजे मापनयोग्य, ए म्हणजे साध्य करण्यायोग्य, आर म्हणजे काटेकोरपणे पडताळणी यंत्रणा आणि टी म्हणजे परिणामांना लक्ष्य करणे (SMART) या पद्धतीने




*स्वच्छ सर्वेक्षण - अभियानावर देखरेख आणि निगराणी ठेवण्याचे साधन*

**स्वच्छता आणि कचरा मुक्त शहरे यात केलेली लक्षणीय गुंतवणूक आमचे जीवन आणि पर्यावरणावर विविध प्रकारे परिणाम घडवू शकते- जसे की, विशेषत: आर्थिक दुर्बल घटकांसह सर्वांसाठी दर्जेदार जीवनमान पुरवता येईल, महिला आणि मुलांना प्रतिष्ठा आणि सुरक्षा हमी देता येईल, रोग वाहक विषाणूद्वारे पसरणाऱ्या रोगांच्या संख्येत घट आणली जाऊ शकते, कचरा वेचक आणि इतर असंघटीत क्षेत्रातील कामगारांना उपजीविकेच्या चांगल्या संधी पुरवता येतील**

तयार केलेली असून घन कचरा व्यवस्थापनाच्या सर्व पैलूंचा - जसे की, सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयी, दारोदार जाऊन कचरा गोळा करणे, स्त्रोतांचे विलगीकरण, प्रक्रिया, गटारे आणि पाणी संस्थांची सफाई, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, बांधकाम आणि पाडकाम यातून निर्माण झालेला कचरा व्यवस्थापन हे कचरा मुक्त शहरांसाठी अत्यंत महत्वाचे घटक आहेत. यांचाही त्यात अंतर्भाव केलेला आहे. वस्तुत:, तारांकित क्रमवारीची अचूक पद्धतीने अंमल बजावणी झाली तर ती कायापालट घडवून आणणारी (Game changer) ठरू शकते आणि भारतातील घनकचरा व्यवस्थापन पद्धतीत क्रांती आणू शकते. वस्तुत:, अधिकाधिक शहरे 'तारे' मिळवीत असताना आणि नागरिकांच्या स्वच्छतेच्या सवयी आणि उच्च जीवनमान याबाबत आकांक्षा वृद्धिंगत होत असताना, तारांकित क्रमवारीचा उपाय देशाच्या प्रशासकीय/ राजकीय चौकटीचा प्रमुख भेद दर्शवणारा ठरू शकतो. जिथे आपल्या शहराला मिळालेल्या 'स्टार'ची संख्या हा स्वच्छता हेतू साध्य करण्यासाठी प्रशासन आणि लोकनियुक्त प्रतिनिधींची कार्यक्षमता, यांचे मूल्यांकन करण्यासाठी एक निकष ठरू शकतो.

### जन आंदोलनाच्या दिशेने वाटचाल करताना

या मोहिमेचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण यश हे आहे की, मुले, युवा आणि ज्येष्ठ नागरिक यांना सारख्याच प्रमाणात मोहिमेने आकर्षून घेतले आहे. गेल्या चार वर्षांत, पायाभूत संरचना आणि नियमनात बदलांसह, ही समांतर सामाजिक चळवळ सातत्याने नागरिकांमध्ये जोर पकडत आहे. २ ऑक्टोबर, २०१७ रोजी, पंतप्रधान म्हणाले होते, "जर एक हजार महात्मा गांधी आले, एक लाख नरेंद्र मोदी आले...तरीही स्वच्छतेचे स्वप्न कधी पूर्ण होऊ शकत नाही. परंतु जर सव्वाशे कोटी देशवासी आले तर पाहता पाहता स्वप्न पूर्ण होईल.'' यावरून २ ऑक्टोबर, २०१९ ला स्वच्छतेचे जे उद्दिष्ट साध्य करायचे आहे, त्यात नागरिकांची भूमिका किती महत्वाची आहे, हेच दिसते.

मोहिमेचा शुभारंभ करताना, पंतप्रधानांनी स्वच्छतेच्या दिशेने नागरिकांनी आपले योगदान द्यावे, यासाठी रोल मॉडेल म्हणून नऊ प्रथितयश व्यक्तींची 'स्वच्छ भारताचे दूत' म्हणून नेमणूक केली होती. आज आपल्याकडे १५० असे दूत (Brand Ambassador) आहेत जे नागरिकांनी स्वच्छतेच्या दिशेने आपल्या सामूहिक प्रवासात सरकारसोबत भागीदार व्हावे, यासाठी त्यांना प्रेरणा देत आहेत.



*लहान मुले सकारात्मक बदलाचे खरे दूत*




*रेडिओवरती स्वच्छता सेल्फी*




*'स्वच्छता ही सेवा' ची काही दृश्ये*

नागरिक सहभाग वाढवणे, सामाजिक वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थी आणि स्वयं सहाय्यता गटांना सामावून घेणे (आकृती ६ पहा), देशभरात लोकांच्या वर्तणुकीत परिवर्तन करण्यासाठी 'स्वछताग्रही' नेमणे, 'स्वच्छता' संदेश, स्वच्छता सेल्फी मालिका अशी बहु माध्यमी संपर्क मोहीम राबवण्यात येत आहे. यामध्ये देशभरातील सर्वोत्कृष्ट सफाई आणि घन कचरा व्यवस्थापन पद्धती वापरणाऱ्यांना आकाशवाणीवरून प्रसिद्धी दिली जाते (आकृती ७ पहा) आणि नागरिकांनी अधिकाधिक सहभाग घ्यावा म्हणून विविध आयसीटी साधने आणि ॲप्स यांचा वापर, याद्वारे लोकांना आता स्वच्छतेच्या सवयीचे महत्व पटू लागले असून स्वच्छता ही केवळ एकट्या सरकारची जबाबदारी नाही, तर भोवतालचे वातावरण स्वच्छ ठेवण्याची आपल्या प्रत्येकाची तेवढीच जबाबदारी आहे, ही जाणीव त्यांच्यात वाढत आहे. यंदाच्या २ ऑक्टोबर पूर्वी देशभरात 'स्वच्छता हीच सेवा' (आकृती ८ पहा) हे जे अभियान पंधरवडाभर राबवण्यात आले, त्या अंतर्गत शहरी भारतातील हजारो शहरे आणि नगरांत झालेल्या एकूण २५ हजार कार्यक्रमांमध्ये शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, गृहिणी, आरडब्ल्यूएज, धार्मिक नेते, उद्योग समूह आणि स्थानिक व्यापारी आणि प्रसिद्ध व्यक्तीं मिळून ४० लाख नागरिकांनी सहभाग घेतला. यापूर्वी कोणत्याही जन आंदोलनाबाबत इतकी अभूतपूर्व आपुलकीची भावना दिसली नव्हती.

### स्वच्छ भारत मोहिमेचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम : काही उदाहरणे

इंदूर महापालिकेने नुकत्याच केलेल्या अभ्यासात (जागरण, २०१७)६ असे आढळले की, स्वच्छ भारत मोहिमे अंतर्गत केलेल्या स्वच्छता उपाय योजनेमुळे रोग वाहक आजारांच्या प्रमाणात ७० टक्क्यांनी घट झाली. वास्तवात, जून ते ऑगस्ट २०१६ मध्ये कावीळ, कॉलरा, उलट्या, हगवण, हेपॅटायटीस आणि मलेरिया या रुग्णांची संख्या १ लाख होती. २०१७ मध्ये याच काळात ती ३५ हजार इतकी खाली आली. याच्या परिणामी, इंदूर शहरात औषधांची विक्री २० कोटी रुपयांनी घसरली, म्हणजे शहरातील आरोग्य सुविधा संबंधी किंमत नियंत्रणात योगदान दिले. गेल्या दोन वर्षात छत्तीसगढ राज्यात दुषितपणा आणि हगवण सारख्या आजारांच्या प्रमाणात नाट्यपूर्ण घट झाल्याचे दिसले आहे.

स्वच्छ भारत मोहिमेतून व्यापक लाभ होत आहेत. उदाहरण म्हणून, ७४,००० अनौपचारिक कामगारांना शहरांतून कचरा व्यवस्थापनाच्या

मुख्य प्रवाहात आणले असून त्याद्वारे त्यांना स्थिर उपजीविका मिळाली आहे. अंबिकापूर घन आणि द्रव स्रोत व्यवस्थापन मॉडेलचे अनुकरण देशांतील अनेक शहरांत केले जात असून त्याने हजारो स्वयं सहाय्यता गटांच्या महिलांना रोजगार मिळाला आहे. त्यांची मासिक कमाई १०,००० ते १५,००० रुपये झाली आहे, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारले आहे. कचऱ्यापासून टिकाऊ वस्तू बनवणे (उदाहरणार्थ, फुले आणि मंदिरातील निर्माल्यापासून उदबत्त्या बनवणे, फेकून दिलेल्या टायरपासून घरातील फर्निचर बनवणे, घन कचऱ्यावर प्रक्रिया करून कलाकुसरीच्या, सजावटीच्या/शिल्प वस्तू, पॉलीथिन उत्पादनाच्या बदली आकर्षक कपड्याच्या तसेच तागाच्या पिशव्या बनवणे) तसेच घन कचरा व्यवस्थापनासाठी नाविन्यपूर्ण आणि परवडणारी उपकरणे तयार करणे किंवा कचरा गोळा करून त्यावर प्रक्रिया करून तो पुन्हा उपयोगात आणणे, अशा अनेक क्षेत्रांत नागरिक आणि स्टार्ट अप्सकडून सामाजिक व्यावसायिकता आणि नवे संशोधन सातत्याने वाढत आहे.

अनौपचारिक आकडेमोड असे दर्शवते की, घन कचऱ्यापासून तयार होणारे संभाव्य उत्पादन मूल्य २० हजार कोटी रुपये असून (एक मेट्रिक टन कचऱ्यापासून ३,००० रुपयांच्या मूल्याचे उत्पादन निर्माण होते असे गृहीत धरून) जर योग्य रित्या वापरात आणले तर त्यातून एक ट्रिलिअन रुपयांचा उद्योग तयार होईल आणि अर्थव्यवस्थेत त्याचे फार मोठे योगदान असेल.

**पुढील वाटचाल**

राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांत तसेच शहर प्रशासक आणि नागरिकांमध्ये स्वच्छता मोहिमेला जी चालना आणि गती देण्यात आली आहे, त्यावरून येणाऱ्या दिवसांकरता थोडे कार्य करायचे शिल्लक आहे. एमओएचयुए मंत्रालयातर्फे 'पुनरुत्थान आणि नागरी क्षेत्रात परिवर्तनासाठी अटल मिशन' (अमृत) योजना असून तीमध्ये जल आणि मल व्यवस्थापनाचा विचार केला आहे, स्मार्ट शहरे मोहीम आहे, ज्यात घन कचरा व्यवस्थापन हा विकासाचा एक निकष आहे, अशा इतरही योजना स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचा जनादेश प्रगती पथावर घेऊन जाण्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत मोहिमेला (नागरी) पूरक आहेत. आता ही गती शाश्वत राखण्यावरच नव्हे तर नाविन्यपूर्ण शोध, दृष्टीकोनात आमूलाग्र बदलाची भूमिका याच्या बरोबरीने अत्यंत मजबूत नियामक आणि कायदेशीर चौकट तसेच कडक अंमलबजावणी या माध्यमातून गती वाढवण्यावर भर दिला जाईल. एमओएचयुए मंत्रालयाने केलेल्या अलीकडच्या उपाययोजनेमुळे तसेच केंद्र/राज्य/स्थानिक सरकारे आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचा हस्तक्षेप या मिलाफातून ही प्रगती आणखी मजबूत आणि वेगवान होईल, अशी मला आशा आहे.

**भारतातील ५०० हून अधिक शहरांत सध्या ३० हजाराहून अधिक शौचालये एसबीएम शौचालय या नावाने गुगल मॅपवर दिसतील. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०१८ मध्ये ही संयुक्त मोहीम राबवण्यात येणार असून भारतभर सार्वजनिक शौचालयांचा शोध घेण्याबाबत जागृती करणे आणि सहजपणे शोध घेता येणे, यासाठी हा प्रयत्न आहे. भारतातील सर्व स्थानिक गाईडना यात सहभागी करून घेतले जाणार असून ते गुगल मॅपवरील सार्वजनिक शौचालयांना क्रमवारी देऊन त्यांचा आढावा घेतील**

**समारोप**

आज, स्वच्छतेच्या सवयी आणि स्वच्छता या संकल्पना नागरिकांचे सक्षमीकरण आणि उच्च जीवनमान साध्य करण्याच्या हेतूशी जोडल्या गेल्या आहेत. स्वच्छता आणि कचरा मुक्त शहरे यात केलेली लक्षणीय गुंतवणूक आमचे जीवन आणि पर्यावरणावर विविध प्रकारे परिणाम घडवू शकते- जसे की, विशेषत: आर्थिक दुर्बल घटकांसह सर्वांसाठी दर्जेदार जीवनमान पुरवता येईल, महिला आणि मुलांना प्रतिष्ठा आणि सुरक्षा हमी देता येईल, रोग वाहक विषाणूद्वारे पसरणाऱ्या रोगांच्या संख्येत घट आणली जाऊ शकते, कचरा वेचक आणि इतर असंघटीत क्षेत्रातील कामगारांना उपजीविकेच्या चांगल्या संधी पुरवता येतील आणि कचरा व्यवस्थापन क्षेत्राला व्यवसायाच्या संधी खुल्या करून तसेच पर्यटन व्यवसायाची क्षमता वाढवून त्याद्वारे परकीय चलनाचा ओघ वाढवला जाऊ शकतो. यातून देशाच्या जीडीपी वर सकारात्मक परिणाम घडवून आणता येईल आणि स्वच्छ पर्यावरण करण्यात योगदान देता येईल. स्वच्छ पर्यावरणातून 'स्वस्थ, समर्थ आणि समृद्ध भारत' निर्माण होईल आणि नवा भारत २०२२ साठी मार्ग मोकळा होईल.

**राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांतील यशोगाथा**

- छत्तीसगढ शून्य कचरा मॉडेलच्या माध्यमातून शून्य भराव राज्य बनण्याच्या दिशेने निघाले असून या मॉडेलचे अनेक शहरांत अनुकरण केले जात आहे. छत्तीसगढ मधील अंबिकापूर मध्ये मोकळ्या जागेवर डम्पिंग ग्राउंड नाही, ९० टक्के कचऱ्याचे विलगीकरण केले जाते आणि दर महिन्याला नाविन्यपूर्ण घन द्रव कचरा व्यवस्थापनातून

१३ लाख रुपये निर्माण होतात.

- विकेंद्रित कचरा व्यवस्थापनात केरळ आघाडीवर असून बहुतेक शहरांनी पाईप कम्पोस्ट आणि जैविक वायू प्रकल्प घराघरांमध्ये बसवले आहेत. वास्तवात, घन कचरा समस्या सोडवण्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रमाने दखल घेतली त्या सर्वोच्च पाच शहरांत अलापुझ्झा या केरळमधील शहराचा समावेश आहे.
- कचऱ्याचे पाच विभागांत विलगीकरण करून कचरा संपत्ती कसा बनू शकते, हे गोवा राज्याने सिद्ध केले आहे. या शहरात शंभर टक्के घरोघर जाऊन कचरा गोळा केला जात असल्याचा दावा केला जातो. बहुतेक निवासी सोसायट्यांमध्ये कम्पोस्ट युनिट्स असून उत्पादित कम्पोस्टचा वापर करण्यासाठी किचन गार्डन आहेत.
- गंगटोकमध्ये शंभर टक्के कचरा मूळ स्थानापाशी विलग केला जाऊन त्यावर प्रक्रिया केली जात आहे.
- मध्य प्रदेशातील इंदूर, भोपाळ आणि जबलपूर शहरांत कचऱ्याचे मूळ ठिकाणीच शंभर टक्के विलगीकरण केले जाते.
- नवी मुंबईत ८८ टक्के घन कचऱ्याचे विलगीकरण उगम स्थानापाशी केले जात आहे.
- बंगळूरू मध्ये विस्तृत कचरा निर्माण करणाऱ्यांना एसडब्ल्यूएम नियमांचे पालन करण्यास समर्थन देण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले आहे.
- नागपूरमध्ये नागरी स्थानिक संस्थेला आपल्या सफाई कामगारांच्या हजेरीवर नजर ठेवण्यासाठी नाविन्यपूर्ण घड्याळ सुरु केले असून कामगार काम करत असताना कुठे आहेत, ते जिओ टॅगिंगद्वारे समजू शकते.
- अलिगढमध्ये सुक्या कचऱ्यापासून बनवलेल्या 'जादूच्या विटा' इमारत बांधकामात वापरल्या जातात.
- महाराष्ट्रातील सासवडमध्ये रंग संहितेचा नवीन प्रयोग सुरु करण्यात आला असून जी घरे कचऱ्याचे विलगीकरण करत नाहीत त्यांना लाल, प्रसंगाने कधी तरी करतात त्यांना पिवळा आणि नियमित करतात त्यांना हिरवा असे रंग दिले आहेत. .
- झारखंडमध्ये असाच रंग संहितेचा प्रयोग केला गेला असून जे उघड्यावर शौचास जात नाहीत त्यांच्या घरांना हिरवा, ज्यांच्या कडे शौचालय आहे परंतु कधी तरी उघड्यावर शौचास जातात त्यांच्या घरांना पिवळा आणि जे नियमितपणे उघड्यावर बसतात त्यांच्या घरांना लाल रंग दिला आहे.

**नागरिक सहभागाच्या काही प्रेरणादायक कथा**

- चलापल्ली जिल्ह्यातील एक डॉक्टर दाम्पत्य वर्षाचा प्रत्येक दिवस सभोवतालच्या परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेत आहे.
- कर्नाटकातील रामकृष्ण मठातील संन्यासी रस्ते आणि वसाहती स्वच्छ ठेवण्यासाठी स्वयंसेवी नागरिकांसह नियमित स्वच्छता मोहिमा राबवतात
- स्वच्छ भारत अभियानाबाबत जागृती करण्यासाठी विंग कमांडर परमवीर सिंग यांनी तीन जलतरणपटू आणि सहा नाविक यांच्यासह 'गंगा आवाहन' मोहीम हाती घेतली होती ज्यात ते गंगा नदी काठाने देवप्रयाग (उत्तराखंड) ते गंगा सागर (पश्चिम बंगाल) हे २,८०० किलोमीटर अंतर पोहून गेले.
- महाराष्ट्रातील तीन उद्यमशील महिला – सिन्नर, नासिक जिल्ह्यातील सुवर्णा लोखंडे, साईखेडा – वाशीम जिल्ह्यातील संगीता अव्हाले आणि मोझर-यवतमाळ जिल्ह्यातील चैताली राठोड यांनी आपले कुटुंबीय, वैयक्तिक आणि कुटुंबाची प्रतिष्ठा राखण्यासाठी शौचालय बांधण्यात पुढाकार घेतला.
- शौचालय बांधण्यासाठी सुवर्णाने बचत गटाकडून (स्वयं सहाय्यता गट) कर्ज घेतले तर संगीताने शौचालय बांधण्यासाठी पैसा उभा करण्यासाठी आपले मंगळसूत्र विकले आणि चैतालीने आपल्या विवाहात आईवडलांकडून इतर मौल्यवान वस्तूऐवजी सासरी शौचालय बांधण्याची मागणी केली.
- सर्व वयाच्या व्यक्तींचा दुर्ग स्थित गट 'कोशिश' दररोज सकाळी ज्येष्ठ नागरिकांच्या उपयोगासाठी असलेल्या बागेची स्वच्छता करतो.
- संत निरंकारी मंडळ रस्ते, बागा, वारसा स्थळे, पाणी संस्था आणि रेल्वे स्थानके या ठिकाणी नियमित स्वच्छता मोहिमा राबवतात.
- आग्रा स्थित इंडिया रायझिंग ही संस्था नागरिक स्वयंसेवकांच्या सहाय्याने साप्ताहिक शहरातील विविध वसाहतींत स्वच्छता मोहिमा हाती घेते.

**यशोगाथा प्लास्टिक मुक्त सीतामढी**

१७ जुलै, २०१८ रोजी बिहारमधील सीतामढी हा पहिला जिल्हा हागणदारी मुक्त झाला आणि आता बहुचर्चित प्लास्टिक बंदीकडे अग्रेसर आहे, जी टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. स्वच्छ भारत अभियान-ग्रामीण/ लोहिया स्वच्छ योजने अंतर्गत हा पुढाकार घेतला असून स्वच्छ सीतामढी-सुंदर सीतामढी हा दृष्टीकोन यामागे आहे. या अंतर्गत, सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्या (कडी असलेल्या आणि नसलेल्या), सर्व प्लास्टिक किंवा थर्माकोल वस्तू जशा की, चमचे आणि प्लेट्स, न विणलेल्या पॉलीप्रोपीन पिशव्या, अन्नाचे डबे, प्लास्टिक पॅकेज आणि सर्व पेय बाटल्या यांचा समावेश करण्यात येणार आहे. आतापर्यंत, जीविका या प्रकल्पाच्या विविध स्वयं सहाय्यता गटाच्या ग्रामीण महिलांनी बनवलेल्या दहा लाख कापडी पिशव्या वितरणासाठी जिल्हा प्रशासनाने अधिग्रहित केल्या आहेत. प्लास्टिक मुक्त सीतामढी मोहिमेने अन्न साखळीतील सूक्ष्म प्लास्टिक घटकांचे प्रमाण कमी होणार आहेच, परंतु ग्रामीण उयोजक महिलांना प्रोत्साहन मिळणार आहे. ग्रामीण भागातील नव्याने सुरु केलेला उद्योजकता कार्यक्रम स्टार्ट अप जीविकाच्या धर्तीवर हा निर्णय असून सामाजिक हेतूसाठी महिला सक्षमीकरणासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल.

**गुगल मॅपवर सार्वजनिक शौचालय शोधा**

गृह निर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने स्वच्छ भारत मोहिमेच्या (नागरी) अंतर्गत- गुगलशी भागीदारी करून स्वच्छतागृह आढावा मोहीम सुरु केली असून भारतातील सर्व स्थानिक गाईडना गुगल मॅपवर सार्वजनिक शौचालयांचा आढावा घेऊन रेटिंग देण्यास प्रोत्साहन देते.

ही मोहीम गुगल मॅपवर असलेल्या फिचरचा भाग असून नागरिकांना आपल्या शहरातील सार्वजनिक शौचालयांचा शोध घेता येतो आणि तपास करून फीडबॅक देता येतो. भारतातील ५०० हून अधिक शहरांत सध्या ३० हजाराहून अधिक शौचालये एसबीएम शौचालय या नावाने गुगल मॅपवर दिसतील. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०१८ मध्ये ही संयुक्त मोहीम राबवण्यात येणार असून भारतभर सार्वजनिक शौचालयांचा शोध घेण्याबाबत जागृती करणे आणि सहजपणे शोध घेता येणे, यासाठी हा प्रयत्न आहे. भारतातील सर्व स्थानिक गाईडना यात सहभागी करून घेतले जाणार असून ते गुगल मॅपवरील सार्वजनिक शौचालयांना क्रमवारी देऊन त्यांचा आढावा घेतील आणि हॅश टॅग #LooReview याचा वापर करून गुगल स्थानिक गाईडच्या सोशल चॅनेल वर झळकण्याची संधी मिळेल. स्थानिक गाईड हे गुगल मॅपवर आपला आढावा, मते आणि छायाचित्रे देऊन लोकांना जगातील ठिकाणांचा शोध घेण्यास मदत करत असतात. कुणीही स्थानिक गाईड कम्युनिटीत सामील होऊ शकतो आणि गुगल मॅपवर स्थळांचा आढावा घेऊ शकतो. तिथे भेट देऊन आढावा घेण्याची संधी मिळवण्यासाठी Public toilet near me या नावाने शोध घ्या.

**स्थानिक गाईड कम्युनिटीत सामील होण्यासाठी**

Facebook - Google Local Guides l Twitter - @googlelocalguides l Youtube - Google Local Guides या ठिकाणी भेट द्या.

■■■

*लेखक केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयात सचिव आहेत.*

*ई मेल : secyurban@nic.in*

**लेखकांना आवाहन**

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

# स्वच्छता हाच खरा धर्म

**-अक्षय राऊत**




**व्यक्तीगत जीवन असो की सार्वजनिक जीवन स्वच्छता हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आतापर्यंतच्या अनेक अभ्यासातून नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि श्रीमंतीसाठी स्वच्छतेची गरज असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळेच व्यक्ती आणि समाजाने खासगी स्वच्छतेसोबतच सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीनुसार किंवा समुहानुसार स्वच्छते संदर्भातील मापदंड वेगळे असू शकतील. परंतु,स्वच्छतेबाबत कोणतीही तडतोड होऊ शकत नाही. स्वच्छता हा प्रत्येकाचा धर्म आहे.**

आपण सर्वच जण जाणतो साफसफाई करणे म्हणजेच स्वच्छता. आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता,शरीराची स्वच्छता यासोबतच मन आणि आत्म्याच्या स्वच्छतेपर्यंत ही संकल्पना विस्तारली आहे. व्यक्तीगत जीवन असो की सार्वजनिक जीवन स्वच्छता हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आतापर्यंतच्या अनेक अभ्यासातून नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि श्रीमंतीसाठी स्वच्छतेची गरज असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळेच व्यक्ती आणि समाजाने खासगी स्वच्छतेसोबतच सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीनुसार किंवा समुहानुसार स्वच्छते संदर्भातील मापदंड वेगळे असू शकतील. परंतु,स्वच्छतेबाबत कोणतीही तडतोड होऊ शकत नाही. स्वच्छता हा प्रत्येकाचा धर्म आहे.

### स्वच्छतेसाठी सर्व काही

राजकीय इच्छाशक्ती,शासकीय धोरण,गुंतवणूक ,भागीदारी आणि लोकसहभागातून स्वच्छतेचे स्वप्न साकार होऊ शकते. लेसोथो,कोरिया आणि मलेशिया या देशांनी यासंदर्भात केलेली अमलबजावणी कौतुकास्पद आहे.

१५ ऑगस्ट २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानांनी महात्मा




गांधींकडून प्रेरणा घेत स्वच्छ भारताची संकल्पना नागरिकांसमोर आणली आहे. लाल किल्ल्यावरील भाषणातून पंतप्रधानांनी देशातील प्रत्येक गाव, शहर, गल्ली, कॉलनी,शाळा, मंदिर, हॉस्पिटल स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले आहे. बोले तैसा चाले याप्रमाणे पंतप्रधानांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत अभियानाची घोषणा केली. २०१९ मध्ये महात्मा गांधीजींच्या १५० व्या जंयतीला भारत स्वच्छ आणि हागणदारीमुक्त करुन आदरांजली वाहण्याचे आगळेवेगळे उद्दीष्ट या अभियानात ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भाग हागणदारीमुक्त करण्यासोबतच कचरा आणि सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्रालयाने या अभियानाची जबाबदारी स्विकारली आहे. या मंत्रालयाकडूनच केंद्र आणि राज्य पातळीवर विविध मंत्रालय, विभाग,खासगी संस्था यांच्यासोबतच सहकार्य आणि संपर्क करुन स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. स्वच्छ भारताचे स्वप्न साकारण्याचे काम एका विभाग किंवा मंत्रालयाचे नाही, त्यामुळेच स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

स्वच्छता हा प्रत्येकाचा धर्म आहे, हे फक्त या अभियानातील सुंदर घोषवाक्य नाही, तर हा अभियानाचा पाया आहे. याच पायावर उभे राहून धोरण ते अमलबजावणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळेच स्वच्छता अभियानात पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्रलयासोबतच इतर मंत्रालयांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. इतर विभागही त्यांची साधनसामग्री, वेळ, पैसा यासाठी वापरत आहेत. प्रत्येक मंत्रालय आणि विभागाने यासाठी धोरणे आणि योजना आखल्या आहेत. काही मंत्रालयांनी यासंदर्भात विशेष प्रकल्पांची अमलबजावणी करुन यश संपादन केले आहे. स्वच्छ भारताचे स्वप्न हे प्रत्येकाचे ध्येय झाले आहे.

**मागील दोन वर्षात विविध विभागामार्फत राबवण्यात आलेल्या स्वच्छता पंधरवाड्याची नोंद पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने ठेवली आहे. ही नोंद वार्षिक अहवाल स्वरुपात प्रकाशित केली जाते. २०१७ या वर्षामध्ये रेल्वे मंत्रालय,जल संसाधन, नदी विकास आणि गंगा शुद्धीकरण मंत्रालय, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. २०१८ - १९ या आर्थिक वर्षात ७६ मंत्रालयाने सक्रिय सहभाग घेतला आहे.**

**स्वच्छता कृती योजना** (SAP)

१ एप्रिल २०१७ रोजी स्वच्छता कृती योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. याअंतर्गत सरकारचे विविध मंत्रालय आणि विभाग व्यवहार्य कृती योजना आखत असते. ही कृती योजना यशस्वी व्हावी यासाठी निधीची तरतूद केलेली असते. त्यामुळेच स्वच्छता अभियानात स्वच्छता ॲक्शन प्लॅन मैलाचा दगड ठरला आहे. सरकारच्या प्रत्येक मंत्रालय आणि विभागाकडून स्वच्छता अभियानासाठी २०१७-२०१८ आणि २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात भरीव तरतूद करण्यात आली आहे. २०१७ - २०१८ या आर्थिक वर्षात १८,१७९ कोटी रुपये तर २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात १७,००० रुपयांची अशी भरीव आणि कौतुकास्पद तरतूद करण्यात आली. प्रत्येक मंत्रालय आणि विभागाचा प्रस्ताव आणि निधीच्या तरतुदीनुसार दरवर्षी संयुक्त योजना तयार करण्यात येते. प्रत्येक तीन महिन्याला समितीच्या सचिवांकडून या योजनेचा आढावा घेण्यात येतो. २०१८ या वर्षात काही मंत्रालयांनी यासंदर्भात पुरस्कारही मिळवले आहेत. यात पेट्रोलिय मंत्रालय,रस्ते आणि वाहतूक मंत्रालय आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्रालय हे पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

**स्वच्छता पंधरवडा**

दान देण्याची सुरुवात स्वत:पासूनच करावी लागते. सरकारने स्वच्छता अभियानाची सुरुवात केल्यानंतर या अभियानामध्ये सर्वजण सहभागी होत आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सरकारने उदाहरणातून आघाडी घेतली आहे. पंतप्रधानांनी एप्रिल २०१६ मध्ये स्वच्छता पंधरवाड्याची घोषणा केली. याअंतर्गत चार ते पाच मंत्रालयाकडून त्यांच्या विभागात पंधरा दिवस स्वच्छता पंधरवाडा राबवण्यात येतो आहे. या पंधरा दिवसांमध्ये प्रत्येक मंत्रालय स्वच्छता अभियानातील त्यांच्या योगदानाची नोंद ऑनलाईन





पद्धतीने करण्यात येते आहे. यासाठी (https:///swachabharatmission.gov.in/SwachhSamiksha/index.aspx) साईटची निर्मिती करण्यात आली आहे.

स्वच्छता पंधरवड्यात त्या विभागाचे मंत्री आणि सचिव बैठकीचे आयोजन करतात. यासोबतच या पंधरवड्यात लागू केलेल्या उपाययोजनांचा आढावासुद्धा घेण्यात येतो. स्वच्छता पंधरवड्यात लागू केलेल्या उपाययोजनाच्या परिणामांची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येते. या पंधरा दिवसात तो विभाग स्वच्छता विभाग मंत्रालयासारखेच काम करतो. स्वच्छता पंधरवड्याच्या कामगिरीचे मूल्यांकन उच्चस्तरीय समितीकडून केले जाते. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाकडून चांगली कामगिरी करणाऱ्या विभाग, संस्था, संघटनेसाठी पुरस्कारांची घोषणाही केली आहे. स्वच्छता पंधरवाड्याची घोषणा केल्यापासून सरकारच्या प्रत्येक मंत्रालयाच्या सक्रिय सहभागामुळे शाश्वत स्वच्छेतेसंदर्भात हे एक महत्वाचे पाऊल ठरले आहे.

**१२ ऑगस्ट २०१७ रोजी उत्तर प्रदेश राज्यातील अलाहाबादमध्ये सरपंचांच्या परिषदेमध्ये गंगा ग्राम अभियानाची घोषणा करण्यात आली. यावेळी गंगेच्या काठावरील ४,४७५ गावे हागणदारीमुक्त घोषित करण्यात आली. यानंतर राज्य सरकारने निवड केलेली २४ गावे गंगा ग्राम प्रकल्पासाठी निवडण्यात आली आहेत. या प्रकल्पाअंतर्गत तलावांचं पुनरुज्जीवन, गाळ काढणे, पिकांसाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर, पर्यटनाला प्रोत्साहन, आधुनिक स्मशान भूमी, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांचा समन्वय, घनकचरा आणि मलनि:सारण व्यवस्थापन, जलसंधारण, सेंद्रीय शेती, फलोत्पादन आणि वनौषधी लागवड या कामांचा समावेश आहे.**

मागील दोन वर्षात विविध विभागामार्फत राबवण्यात आलेल्या स्वच्छता पंधरवाड्याची नोंद पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने ठेवली आहे. ही नोंद वार्षिक अहवाल स्वरुपात प्रकाशित केली जाते. २०१७ यावर्षामध्ये रेल्वे मंत्रालय,जल संसाधन, नदी विकास आणि गंगा शुद्धीकरण मंत्रालय, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. २०१८ - १९ या आर्थिक वर्षात ७६ मंत्रालयाने सक्रिय सहभाग घेतला आहे.

### स्वच्छ ऐतिहासिक स्थळे (SIP)

पंतप्रधानांच्या दूरदृष्टीनुसार ऐतिहासिक स्थळ, स्मारके, धार्मिक स्थळ ज्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात लोकं येतात ती ठिकाणे स्वच्छ करण्याचे निश्चित केले आहेत. या स्थळांसोबतच आजूबाजूचा परिसरही स्वच्छ ठेवण्याचे निर्देश पंतप्रधानांनी



वेळोवेळी दिले आहेत. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गतात स्वच्छ ऐतिहासिक स्थळ प्रकल्पाचे महत्वाचे स्थान आहे. हे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्रालयामार्फत नागरी मंत्रालय,पर्यटन मंत्रालय, तसेच विविध राज्यांमधील विभाग आणि मंत्रालय तसेच स्थानिक प्रशासन,न्यास, ट्रस्ट यांच्याशी समन्वय साधण्यात येतो. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विविध खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातून चांगले सहकार्य मिळत आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी आर्थिक, तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्य देण्यातही या संस्थांनी पुढाकार घेतला आहे. सध्या या प्रकल्पाच्या विविध पायऱ्यांवर देशभरातील ३० शहरांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत १०० ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे.

**लाखो भारतीय नागरिकांनी स्वच्छ भारत अभियानाला पाठिंबा दिला आहे. प्रत्येकांनी आपल्या कुवतीनुसार या अभियानात सक्रिय सहभाग घेतला आहे. स्वच्छतेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी बॉलीवूड,क्रीडा आणि इतर क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी विशेष प्रयत्न केले आहेत. शौलाचय बांधणी आणि वापरांसाठी दृकश्राव्य माध्यमांचा वापर करण्यात आला आहे. टॉयलेट एक प्रेमकथा, पॅडमन यासारख्या चित्रपटांचीही निर्मिती करुन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला आहे.**

### गंगा ग्राम

गंगा ग्राम अभियान हा दोन मंत्रालयातीन संयुक्त प्रकल्प आहे. स्वच्छ भारत अभियान आणि गंगा शुद्धीकरण मोहिमेअंतर्गत हे गंगा ग्राम राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाअतंर्गत गंगेच्या काठावर असणारी गावे स्वच्छ करण्यात येणार आहेत. तसेच या गावांमध्ये मूलभूत सुविधाही पुरवण्यात येणार आहेत. या अभियानामध्ये इतर विभागाचेही सहकार्य घेण्यात येत आहेत. १२ ऑगस्ट २०१७ रोजी उत्तर प्रदेश राज्यातील अलाहाबादमध्ये सरपंचांच्या परिषदेमध्ये गंगा ग्राम अभियानाची घोषणा करण्यात आली. यावेळी गंगेच्या काठावरील ४,४७५ गावे हागणदारीमुक्त घोषित करण्यात आली. यानंतर राज्य सरकारने निवड केलेली २४ गावे गंगा ग्राम प्रकल्पासाठी निवडण्यात आली आहेत. या प्रकल्पाअंतर्गत तलावांचं पुनरुज्जीवन , गाळ काढणे, पिकांसाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर, पर्यटनाला प्रोत्साहन, आधुनिक स्मशान भूमी, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांचा समन्वय, घनकचरा आणि मलनि:सारण व्यवस्थापन, जलसंधारण, सेंद्रीय शेती, फलोत्पादन आणि वनौषधी लागवड या कामांचा समावेश आहे. गंगेचे पात्र तसेच गावाचा परिसर स्वच्छ राहावा यासाठी शौचालय बांधणी, घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात ग्रामस्थांना जागरुक करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीमार्फत गंगा ग्राम प्रकल्पातील उपक्रम राबवण्यात येतो तसेच या उपक्रमात ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग असतो. लोकसहभाग हा प्रकल्पाचा मूळ पाया आहे.

### विद्यार्थी, तरुणांचा सहभाग

स्वच्छ भारत अभियानात शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयामधील तरुणांचा सहभाग महत्वाचा आहे. शाळा, महाविद्यालयासोबतच आजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. स्वच्छता ऑलिपिंक,स्वच्छतेसाठी निवडणूक आणि रॅली यामधून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला आहे. याअतंर्गत शालेय विद्यार्थ्यांनी निबंध, चित्र, पत्रे तसेच लघुचित्रपटाचा वापर केला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या घरात शौचालयाच्या वापरावरही जोर दिला आहे. शालेय विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयातील तरुणांनीह मोठा सहभाग घेतला आहे. स्वच्छतेचा संदेश पोचवण्यासाठी भिंती चित्रे आणि सार्वजनिक ठिकाण स्वच्छ करुन संदेश देण्यात आला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ भारत उन्हाळी शिबिरही घेण्यात आले आहे. उन्हाळ्यामध्ये शिबिरातील प्रत्येक विद्यार्थ्यांने १०० तास स्वच्छता अभियानासाठी श्रमदान केले आहे. मे आणि जुलै महिन्यात मानव संसाधन मंत्रालय, क्रीडा आणि युवक मंत्रालयाने संयुक्तपणे मे आणि जुलै महिन्यातील सुट्ट्यांमध्ये हा उपक्रम राबवला आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात जाऊन स्वच्छतेचे धडे गिरवले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. सुमारे चार लाख विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला आहे. सहभागी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणांकनही देण्यात आले आहे.

**खासगी कंपन्यांचा सहभाग**

स्वच्छ भारत अभियानात खासगी संस्थांनी मोठे सहकार्य केले आहे. अनेक संस्थांनी आर्थिक मदत केली असून यासाठी स्वच्छ भारत कोशची नर्मिती करण्यात आली आहे. मार्च २०१८ पर्यंत सुमारे ८३९.३ कोटी रुपयांचा निधी जमा झाला आहे. या निधीचा वापर करुन निवडक ठिकाणी स्वच्छतेची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत. टाटा ट्रस्ट आणि स्वच्छता मंत्रालय याबाबतचे बोलके उदाहरण आहे. या भागीदारीतून तरुणांना कौशल्य देऊन त्यांना जिल्हा स्वच्छ भारत प्रेरक करण्यात आले आहेत. टाटा ट्रस्टने ४७५ तरुणांना यासाठी प्रशिक्षण दिले आहे. हे तरुण स्वच्छ भारत अभियानात मोलाची भूमिका बजावत आहेत. टाटा ट्रस्टप्रमाणेच इतर कंपन्याही स्वच्छ भारत अभियानात सक्रिय सहभाग घेत आहेत. काही कंपन्या स्वच्छ भारत अभियान मोहिमही राबवत असून यासाठी विविध संदेशांचीही निर्मिती केली आहे.

**माध्यमांचा पाठिंबा**

स्वच्छ भारत अभियानामध्ये माध्यमांचा सहभाग महत्वाचा आहे. विशेषत: शौचालय बांधणी आणि वापरासाठी माध्यमांनी मोलाचे काम केले आहे. बातम्या, विशेष वृत्तमाला, संपादकीय, चर्चा या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचला आहे.

स्वच्छ भारत अभियानातील माध्यमांच्या सहभागाचे वेळोवेळी कौतुकही केले जात आहे.

**स्वच्छता अँम्बेसडर**

गरीब, श्रीमंत, तरुण ,वृद्ध, सामान्य नागरिक असो की सेलिब्रेटी यांच्यासारख्या लाखो भारतीय नागरिकांनी स्वच्छ भारत अभियानाला पाठिंबा दिला आहे. प्रत्येकांनी आपल्या कुवतीनुसार या अभियानात सक्रिय सहभाग घेतला आहे. स्वच्छतेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी बॉलीवूड,क्रीडा आणि इतर क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी विशेष प्रयत्न केले आहेत. शौलाचय बांधणी आणि वापरांसाठी दृकश्राव्य माध्यमांचा वापर करण्यात आला आहे. टॉयलेट एक प्रेमकथा, पॅडमन यासारख्या चित्रपटांचीही निर्मिती करुन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला आहे.

**सामान्य नागरिकांचा सहभाग**

स्वच्छतेच्या लढाईत सर्वसामान्य नागरिकांची भूमिका महत्वाची आहे. स्वच्छतेसाठी अकल्पनीय असा लोकसहभाग मिळत आहे. स्वच्छता अभियान आता स्वच्छ आणि आरोग्यदायी भारतासाठी लोक चळवळ झाली आहे. लाखो नागरिक या जनआंदोलनात सहभागी होत आहेत. स्वच्छता ही सेवा, चलो चंपारण्य, हागणदारीमुक्त आठवडा आणि पंधरवडा यासारख्या मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. सेलिब्रेटी आणि सामान्य नागरिकांनी यासाठी वेळोवेळी श्रमदान केले आहे. अनेक धार्मिक नेते आणि गुरुंनीही त्यांच्या भक्तांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहचवला आहे. स्वच्छता अभियानात महिलांनीही मोठे योगदान दिले आहे. २०१७ व २०१८ मध्ये ८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनी स्वच्छ शक्ती साजरी करण्यात आली आहे. ग्रामीण भागात स्वच्छता अभियानात काम केलेल्या अनेक महिलांना गौरवण्यात आले आहे. स्वच्छ जीविका, स्वच्छ विहार ही विशेष मोहिम यावर्षी जुलै महिन्यात सुरु करण्यात आली आहे. १० लाख शौचालयांची उभारणी जीविका बहिणींनी केली आहे.

स्वच्छता अभियानात महिला बचत गटांनाही सहभागी करुन घेण्यात आले आहे.

या सर्व उदाहरणांवरुन स्वच्छता अभियान ही भारतातील नव्हे तर जगातील वर्तणूक बदलातील सर्वात मोठी मोहीम आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक घटक प्रयत्न करत आहे. स्वच्छ आणि सुंदर भारताच्या निर्मितीसाठी शाश्वत स्वच्छतेसाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला पाहिजे, कारण स्वच्छता हाच खरा धर्म आहे.

■■■

*लेखक,केंद्र सरकारच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या स्वच्छ भारत अभियानाचे महासंचालक आहेत.*

*ई मेल: akashy.rout@gmail.com*

**विशेष लेख**

# स्वच्छता क्रांती: सर्वव्यापक अंमलबजावणी

**- परमेश्वरन अय्यर**



**पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत खुल्यावर शौच करणाऱ्या ६० कोटी जनतेपैकी ५० कोटी लोकांना गेल्या चार वर्षात त्यांच्या घराच्या आसपासच्या परिसरातच बंदिस्त शौचालयाची सोय केली आहे. सबका विकास साधण्याच्या प्रक्रियेत सार्वजनिक स्वच्छतेला अग्रस्थानी महत्व देत पंतप्रधानांनी पुकारलेल्या क्रांतिकारक अशा स्वच्छता अभियानाला गेल्या चार वर्षांत जनतेने साथ दिली आहे. त्यामुळेच ग्रामीण भारतात २०१४ मध्ये केवळ ३७ टक्के असणारा स्वच्छतेचा स्तर आज ९१ टक्के एवढा आहे.**

भारत हा २९ राज्य ७ केंद्र शासित प्रदेश यामध्ये सामावलेली सुमारे एक अब्जाहून अधिक लोकसंख्या असलेला प्रचंड प्रमाणात विविधतेने नटलेला देश आहे. देशाची सत्तर टक्के लोकसंख्या सातशे जिल्ह्यांमधील सुमारे सहा लाख गावांमध्ये वसलेली आहे.

२०१४ पर्यंत देशातील सर्व ग्रामीण भागात असे चित्र होते की जवळजवळ ६० करोड जनता कुणाचीही तमा न बाळगता नियमितपणे खुल्यावर शौच करायची. याला स्त्री-पुरुष, वृद्ध-तरुण लहान मुले अशा कोणाचाही अपवाद नव्हता. खुल्यावर शौच करण्यामुळे पसरणारे संसर्गजन्य आजार, वाढते सांडपाणी व त्यामुळे निर्माण होणारी अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य, तसेच सामाजिक दृष्ट्या लोकांच्या उत्पादक वेळेचा अपव्यय, सामाजिक हिंसेची शक्यता व त्यातून महिला व लहान मुलांच्या इभ्रतीला व जीवाला असणारा धोका या परिणामांचा विचार कोणीही केला नव्हता.

१५ ऑगस्ट २०१८ रोजी भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्रता दिवसाच्या आपल्या भाषणातून सर्व भारतीय जनतेला खुल्यावर शौच करण्याच्या वाईट सवयीचे समूळ उच्चाटन करण्याचे आवाहन केले. त्याबरोबरच जनतेला सार्वजनिक तसेच वैयक्तिक जीवनात स्वच्छतेच्या सवयींचे असलेले महत्त्व लक्षात आणून दिले. स्वतंत्र भारताच्या इतिहासात यापूर्वी राष्ट्रीय विकासाच्या धोरणात स्वच्छतेला असलेले अनन्यसाधारण महत्त्व नव्याने अधोरेखित करीत सर्वसामान्य जनतेला चुकीच्या व अस्वच्छ सवयीतून चांगल्या आरोग्यदायी सवयींची कास धरण्यास सांगणारे हे पहिलेच नेतृत्व असावे.

पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत खुल्यावर शौच करणाऱ्या ६०० कोटी जनतेपैकी ५० कोटी लोकांना गेल्या चार वर्षात त्यांच्या घराच्या आसपासच्या परिसरातच बंदिस्त शौचालयाची सोय केली आहे. सबका विकास साधण्याच्या प्रक्रियेत सार्वजनिक स्वच्छतेला अग्रस्थानी महत्व देत पंतप्रधानांनी पुकारलेल्या क्रांतिकारक अशा स्वच्छता अभियानाला गेल्या चार वर्षांत जनतेने साथ दिली आहे. त्यामुळेच ग्रामीण भारतात २०१४ मध्ये केवळ ३७ टक्के असणारा स्वच्छतेचा स्तर आज ९१ टक्के एवढा आहे. ग्रामीण जीवनाचा असा कायापालट होण्याची किमया यापूर्वी कधी साधली गेली नव्हती. आज देशभरात ८७ कोटी घरांमध्ये शौचालय उभारण्यात आले असून त्यामुळे देशातील ५.१ लाख गावे, ५२९ जिल्हे, २५ राज्ये व ९ केंद्रशासित प्रदेशांमध्ये जवळजवळ पूर्णपणे खुल्यावर शौच करण्याची वाईट प्रथा लोप पावली आहे. याशिवाय जागतिक बँकेच्या सहाय्य प्रकल्पाच्या अंतर्गत भारतात नुकत्याच करण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणावरील घरगुती सर्वेक्षणात असे आढळून आले की, सर्वेक्षणात समाविष्ट असलेल्या ९३ टक्के घरांमध्ये स्वतंत्र शौचालय

असल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक स्वच्छता विषयक वर्तणुकीत फरक झालेला आहे. याचे श्रेय जनतेने स्वच्छ भारत अभियानालाच दिले आहे.

स्वच्छ भारत मिशन ही खऱ्या अर्थाने भारतीय समाजातील सर्व स्तरातील लोकांनी यशस्वी करून दाखवलेली चळवळ ठरली आहे. कारण धर्म, पंथ, जात, वय,शारीरिक क्षमता यासारख्या सर्व भेदभावाला मागे ठेवून सर्वच क्षेत्रातील व्यक्ती मग ते विद्यार्थी असो, शिक्षक,उद्योगपती, नागरी समाज आणि सरकारी यंत्रणा इत्यादी सर्वांनीच या प्रक्रियेत योगदान देऊन देशाला स्वच्छतेतून समृद्धीकडे नेण्याची वाटचाल सुरू केली आहे.

एकेकाळी खुल्यावर शौच करण्यात जगात बदनाम असलेला आपला देश आज ही प्रथा जवळजवळ संपूर्णपणे बंद पाडण्यात यशस्वी ठरलेला आहे. गेली अनेक वर्षे सामाजिक स्तरावर जनतेत वर्तन बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक बाबींचे विश्लेषण करताना जागतिक स्तरावरील तज्ञांनी सांगितलेल्या अभ्यासपूर्ण निष्कर्षातून असे स्पष्ट झाले आहे की, मोठ्या प्रमाणावर सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी विविध सामुदायांच्या एकसामायिक सामाजिक मानसिकतेला विचारात घेऊन योजना आखली जावी जी संपूर्णपणे समुदायाच्या नेतृत्वाखाली राबवली जाईल. थोडक्यात लोकसहभागातूनच सामाजिक बदल शक्य असतो. २०१४ पर्यंत भारताच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर तयार होणारे सांडपाणी, अस्वच्छता व त्यातून पसरणारी रोगराई इत्यादींसारख्या सामाजिक समस्यांमुळे या भागांचा विकास पूर्णपणे खुंटलेला होता. यातही सर्वात मोठं आव्हान होतं ते म्हणजे या समस्यांचे सर्वव्यापक आणि प्रचंड प्रमाण. स्वच्छ भारत चळवळ राबवताना भारतीय जनतेच्या मानसिकतेबरोबरच समस्यांच्या व्यापकतेचा तसेच समस्येच्या प्रचंड प्रमाणाचाही विचार करून धोरण आखणे आवश्यक होते.

प्रमाण: देशातील सहाशे कोटी जनतेच्या वैयक्तिक तसेच सामुदायिक स्वच्छता विषयक वर्तणुकीत बदल घडवून आणण्याच्या क्रांतिकारी ठरलेल्या स्वच्छ भारत अभियानाची आखणी करताना शासकीय यंत्रणेला ज्या प्रचंड जनसमूदायापर्यंत ही मोहीम पोहोचवायची आहे त्या लोकसंख्येच्या 'प्रमाणाचा' विचार लक्षात घेणे आवश्यक होते. यासाठी राष्ट्रीय स्तरावर भारतातील सर्व क्षेत्रातील व्यक्तींचा एक गट तयार करण्यात आला. आज या गटात एकशे वीस कोटी शालेय विद्यार्थी, एक दशलक्ष कामगार ज्यामध्ये १००००० महिला कामगार, पाच लक्ष स्वच्छाग्रही, २५०,००० सरपंच, सातशे जिल्हा आयुक्त, ४०० जिल्हा स्वच्छ भारत प्रेरक, व २० राजदूत या सर्वांसह प्रमुख प्रवक्ता म्हणून या अभियानाचे नेतृत्व करणारे आपल्या देशाचे सध्याचे पंतप्रधान यांचा समावेश आहे.

**स्वच्छ भारत मिशन ही खऱ्या अर्थाने भारतीय समाजातील सर्व स्तरातील लोकांनी यशस्वी करून दाखवलेली चळवळ ठरली आहे. कारण धर्म, पंथ, जात, वय,शारीरिक क्षमता यासारख्या सर्व भेदभावाला मागे ठेवून सर्वच क्षेत्रातील व्यक्ती मग ते विद्यार्थी असो, शिक्षक,उद्योगपती, नागरी समाज आणि सरकारी यंत्रणा इत्यादी सर्वांनीच या प्रक्रियेत योगदान देऊन देशाला स्वच्छतेतून समृद्धीकडे नेण्याची वाटचाल सुरू केली आहे.**

गती: स्वच्छ भारत अभियान देशाच्या सर्व भागांपर्यंत स्वीकारण्याची, राबवण्याची तसेच रुजण्याची नितांत आवश्यकता होती. या कामी कोणताही विलंब देशाच्या संपूर्ण विकासासाठीच नुकसानदायक ठरेल. त्यामुळेच सर्वाधिक प्राथमिकता देऊन ही मोहीम तात्काळ राबवण्याची आवश्यकता होती. यासाठीच पंतप्रधानांनी या मोहिमेसाठी २०१९ एक ध्येय सुनिश्चित केले. तसेच राष्ट्रीय स्तरापासून विविध टप्प्यांत हा कार्यक्रम राबवण्यासाठी सुयोग्य व्यक्तींनी बनलेला कार्यशील गट नेमण्याचीही तात्काळ आवश्यकता होती. अगदी तळागाळातील जनतेतील प्रतिनिधींना सहभागी करून घेऊन अभियानाच्या ध्येयाने प्रेरित जनतेची देश व्याप्त साखळी तयार करण्याचीच ही प्रक्रिया होती. यामध्ये राज्यस्तरावर त्या त्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना अभियानाचे नेतृत्व सोपवण्यात आले. तर जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना मोहिमेचे व्यवस्थापक मार्गदर्शक म्हणून काम पाहण्यास सांगितले. स्वच्छताग्रही म्हणजे समाजातील काही व्यक्ती ज्या विविध लोकवस्त्यांमध्ये जाऊन तेथील रहिवाश्यांना स्वच्छतेबाबत जागरूक करतात, तर गावोगावांत स्वच्छता प्रेरक ही मोहीम राबवण्यासाठी गावकऱ्यांना सोबत घेऊन नवनवीन हा उपक्रम राबवताहेत. अशा प्रकारे पी एम सी एम डी एम व्ही एम अशा 'पाच एम' च्या नेतृत्वाखाली ही मोहीम सुरू आहे.

सामाजिक गैरसमजुती: भारतीय समाजामध्ये पिढ्यानपिढ्या रुजलेल्या काही चुकीच्या समजुती दूर केल्याशिवाय स्वच्छ भारत अभियानाचे भारतीय समाजाच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट सफल होऊ शकणार नाही. स्वच्छतेबाबत विशेषत: शौचालयसंबंधी सवयींबाबत देशाच्या

ग्रामीण भागात असलेल्या समाजात अनेक भ्रामक समजुती रुजलेल्या असून आजही लोक त्या चुकीच्या समजुतींप्रमाणेच वागतात. उदाहरणार्थ- शौचालयांची गरज फक्त महिलां लहान मुलांसाठीच आहे, राहत्या घराच्या आसपास शौचालय असणे अपवित्र असते,शौचालय साफ करण्याचे काम काही ठराविक जातीतील लोकांनीच केले पाहिजे, इत्यादी. यांसारख्या चुकीच्या समजुतींना अवलंबणे थांबवून काळानुसार योग्य प्रकारे योग्य बाबतीत सर्वांना न्याय्य ठरणारे बदल स्वीकारण्याची मानसिकता विकसित करण्यासाठी स्वच्छतेच्या सवयींबाबत सर्वच स्तरातून जागरुकता मोहीम हाती घेण्यात आली. मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमांतूनही स्वच्छतेच्या चांगल्या सवयी किती आवश्यक आहेत हे सार्वजनिक ठिकाणी, वर्तमानपत्रांतून शाळा, ग्रामपंचायती सार्वजनिक आरोग्य केंद्रे तसेच रेडिओ व दूरचित्रवाणीवरील जाहिरातींतून प्रभावीपणे सांगण्यात आले. अमिताभ बच्चन, अनुष्का शर्मा यांसारख्या लोकप्रिय सिनेकलाकारांना ‘दरवाजा बंद’ अभियानाचे सदिच्छादूत म्हणून पाचारण करण्यात आले. या जाहिरातींतून केवळ महिला व लहान मुलांनाच नव्हे तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने बंदिस्त शौचालयाचा वापर करणे वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने कसे आवश्यक आहे, हे अतिशय प्रभावी दाखवण्यात आले. तसेच या जाहिराती सर्व लोकांपर्यंत पोहचण्यात या दृष्टीने त्याचे वारंवार प्रक्षेपणही करण्यात येते. ग्रामीण जीवनातील स्वच्छतेच्या संदर्भात विशेषत: घराच्या परिसरातच स्वतंत्र शौचालय नसल्यामुळे पिढ्यानपिढ्या महिलांचा होणारा कोंडमारा, वरवर भोळ्याभाबड्या वाटणाऱ्या कल्पनांना अतिशय चुकीच्या पद्धतीने पिढ्या-दर-पिढ्या परंपरा म्हणून पाळणाऱ्या ग्रामीण भारतातील समाजावर आधारित गोष्टीवर बेतलेला टॉयलेट: एक प्रेम कथा या हिंदी चित्रपटातून अभिनेता अक्षय कुमार याने भारत अभियानातील स्वच्छताग्रही व स्वच्छता प्रेरक ही भूमिका अतिशय सुंदरपणे साकारली. चंदेरी पडद्यावर शासनाच्या उपक्रमावर आधारित सिनेमा प्रदर्शित होण व तो तितकाच लोकप्रिय होणे हे यापूर्वी कधीही झाले नव्हते. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानाला एक वेगळेच वलय मिळाले असून परिणामी ग्रामीण जनतेतही या अभियानातील उपक्रमांना आनंदाने पाठिंबा दिला आहे.

**भारतीय समाजामध्ये पिढ्यानपिढ्या रुजलेल्या काही चुकीच्या समजुती दूर केल्याशिवाय स्वच्छ भारत अभियानाचे भारतीय समाजाच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट सफल होऊ शकणार नाही. स्वच्छतेबाबत विशेषत: शौचालयसंबंधी सवयींबाबत देशाच्या ग्रामीण भागात असलेल्या समाजात अनेक भ्रामक समजुती रुजलेल्या असून आजही लोक त्या चुकीच्या समजुतींप्रमाणेच वागतात.**

अभियानाची निरंतर वाटचाल: आजच्या घडीला स्वच्छता मोहीम व खुल्यावर शौच मुक्त भारत या उपक्रमांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छ भारत अभियान एक लोक चळवळ म्हणून नावारूपाला येत आहे. ही चळवळ निरंतर चालू रहावी म्हणून काही उपाय सरकार राबवत आहे.

दर्जा: खुल्यावर शौच मुक्त भारत या कार्यक्रमाअंतर्गत बांधण्यात येणारे प्रत्येक शौचालयात सांडपाणी व मलाचा पर्यावरणपूरक पद्धतीने निचरा करण्याची सोय केलेली आहे. यामुळे शौचालयाच्या स्वच्छतेचा दर्जा राखला जातो. तसेच या उपक्रमात अंतर्भूत होणाऱ्या प्रत्येक गावाला दुहेरी सत्यापन प्रणालीतून जावे लागते. तसेच ठराविक कालावधीनंतर गावातील स्वच्छतेच्या दर्जाची पडताळणी करायला सरकारद्वारा नियुक्त प्रतिनिधी येऊन मूल्यांकन करतात. आणि गुणवत्तेचा अहवाल राज्य सरकारला सोपवला जातो. त्या गावाच्या स्वच्छतेच्या दर्जाची प्रत्यक्ष जबाबदारी ही राज्य सरकारची असते.

निरंतरता: खुल्यावर शौच मुक्त भारत चळवळ व लोकांमधील वर्तणूक बदल निरंतर टिकून राहावा यासाठी लोकांना सातत्याने जागृत करण्याचे कार्य शासनातर्फे केले जात आहे. प्रक्रिया आणि डागडुजी याद्वारे या कार्यक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या शौचालयांचा निरंतर वापर शक्य आहे. याशिवाय स्वच्छता प्रेरक व स्वच्छता ग्रही म्हणून काम करणाऱ्या प्रतिनिधींना योग्य वेळी त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत राहिला तर ते आपले कामही चोखपणे बजावू शकतात. याशिवाय पेयजल मंत्रालय गावोगावी स्वच्छतेचे धोरण राबवले जावे यासाठी दहा वर्षांच्या एका स्वच्छता कार्यक्रमाची आखणी करीत आहे.

इतर ध्येय धोरणे: केवळ शौचालय उभारणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट नव्हते तर त्याबरोबरच गावातल्या सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता सांडपाणी व मलमूत्राची योग्य विल्हेवाट लावणे तसेच गावाला योग्य प्रमाणात नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे इत्यादी इतर काही बाबतीतही शासन पुढाकार घेत आहे.

गेल्या चार वर्षात शासनातर्फे सर्व सरकारी यंत्रणा, सर्व राज्यांचे शासन, स्वयंसेवी संघटना, प्रसार माध्यमे, उद्योग संस्था, शासकीय निमशासकीय एजन्सिज, स्थानिक स्वराज्य



शौचालय बांधा आणि कुटुंबाप्रतीची जबाबदारी पूर्ण करा

संस्था यांच्याशी संलग्न राहण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण शासन धोरणानुसार स्वच्छता ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. हा विचार तळागाळापर्यंत रूजवण्यासाठी देशातील सर्व घटकांना यात समाविष्ट करून घेणे आवश्यक आहे. याकरिता केंद्र सरकारतर्फे काही विशेष उपक्रमही राबवण्यात येतात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे स्वच्छता पंधरवडा. सर्व मंत्रालय व त्या मंत्रालयांशी संलग्न विभाग दर पंधरा दिवसांनी स्वच्छतेसंबंधी काही उपक्रम हाती घेतात. उदाहरणार्थ, देशभरातील १०० प्रसिध्द सार्वजनिक ठिकाणांचा सौंदर्यस्थळं म्हणून कायापालट करणे, स्वच्छता उपक्रमाच्या कार्यरत योजनेसाठी ७६ मंत्रालयांमार्फत ५२४८ कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला असून या कार्यक्रमाअंतर्गत गंगानदीच्या काठालगतच्या परिसरातील सर्व गावे खुलेशौचमुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. या उपक्रमांपैकी नुकताच राबविण्यात आलेला कार्यक्रम म्हणजे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ या सर्वेक्षणा अंतर्गत भारतातील ६९८ जिल्ह्यांमधील सुमारे ६९८० गावांमध्ये

**शासन धोरणानुसार स्वच्छता ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. हा विचार तळागाळापर्यंत रूजवण्यासाठी देशातील सर्व घटकांना यात समाविष्ट करून घेणे आवश्यक आहे. याकरिता केंद्र सरकारतर्फे काही विशेष उपक्रमही राबवण्यात येतात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे स्वच्छता पंधरवडा. सर्व मंत्रालय व त्या मंत्रालयांशी संलग्न विभाग दर पंधरा दिवसांनी स्वच्छतेसंबंधी काही उपक्रम हाती घेतात.**

स्वच्छतेच्या सर्व निकषांचे स्वतंत्रपणे सर्वेक्षण करण्यात आले.

भारतात राबवले जात असलेले हे स्वच्छता अभियान जागतिक स्तरावरील सर्वात मोठे स्वच्छता अभियान आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण गेल्या चार वर्षात विविध उपक्रमांतून स्वच्छतेचा प्रसार व प्रचार करून शासन यंत्रणांनी ही सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवली व आजच्या घडीला देशाच्या सर्व स्तरांतील जनताच या चळवळीला पुढे नेत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही एक लोकचळवळ झाली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या कार्यात महिलांचे योगदान वाखाणण्याजोगे आहे. खऱ्या अर्थाने विषयातील महिलांनीच देशात अशा प्रकारचा उपक्रम राबवला जावा, खुल्यावर शौच करण्याची वाइट प्रथा बंद होउन यांना स्वतंत्र शौचालये उपलब्ध असावी त्यातून त्यांची सामाजिक प्रतिष्ठा व सुरक्षितता जपली जावी पण त्याहून अधिक महत्त्वाचे त्यांच्या कुटुंब व समूदायासाठी आसपासचा परिसर व गाव स्वच्छ, सुरक्षित आरोग्यदायी असावे असा हा आग्रह धरला होता. जेव्हा स्वच्छ भारत अभियानाची घोषणा करण्यात आली तेव्हा देशातील महिलांनी या कार्यक्रमाचे मनापासून स्वागत केले तसेच कार्यक्रमाअंतर्गत सर्व उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. अनेकदा आपल्या स्वत:च्या कुटुंबाच्या विरोधात जाऊनही महिला आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्या. दैनंदिन कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून फावल्या वेळेत या उपक्रमात सहभाग घेत पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे राहून पारंपारिकरित्या पुरुषांनी करावयाची कामे जसे शौचालयांचे बांधकाम करण्याच्या कामी नेहमी महिलाच अग्रेसर राहिल्या आहेत.

भारताला खुल्यावर शौच करण्याच्या वाईट सामाजिक प्रथेपासून मुक्त करण्याच्या गेल्या चार वर्षांच्या वाटचालीत लोकांमध्ये घडून आलेला, लोकांनी स्वीकारलेला वर्तणूकीतील बदल हा या उपक्रमाचा मानबिंदू ठरला आहे. लोकांनी स्वत:हून स्वतंत्र शौचालय असणे हा प्राथमिक हक्क आहे अशी मागणी केल्याची काही विशेष उदाहरणे इथे नमूद करावी लागतील:

★ शौचालय उभारणी संबंधित गवंडी कामाचे प्रशिक्षण घेण्यासाठी

पुढे आलेल्या सुनिता देवी यांनी अल्पावधीतच छोट्या जागेत दोन शौचालय उभारण्याचे तंत्र अवगत केले. त्यांचे कौशल्य वाखाणत त्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुनिता देवींना जिल्ह्यातील इतर महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रमुख म्हणून नेमले. गेल्या चार वर्षात सुनितादेवींनी १६०० महिलांना प्रशिक्षित केले आहे.

★ आपल्या आठ सदस्यांच्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळत राजस्थान मधील बंस्वरा जिल्ह्यातील कारजी पंचायतीमधील शाकरी मावी या महिलेने घरात उपलब्ध असलेल्या अवजारांच्या मदतीने रात्रंदिवस खपून कुणाची मदत न घेता स्वत: आपल्या घरी शौचालय बांधले. दिवाबत्तीची सोय नसलेल्या गावात रात्रीच्या अंधारात मोबाईल टॉर्चच्या मदतीने बांधकामाचे काम चालू ठेवले. तर दिवसा घराची व शेतीच्या कामाची जबाबदारी सांभाळत शौचालय उभारण्याचे कामही चालू ठेवले.

★ स्वच्छ भारत चळवळीच्या या गावातील सक्रिय कार्यकर्त्या असलेल्या शमशाल बेगम यांच्या घरी त्यांच्या विवाहाची बोलणी सुरू होती. मुर्शिदाबादच्या तौसेफ राजा अहमद यांच्याकडून आलेल्या मागणीला होकार देताना बेगम यांनी अहमद यांना त्यांच्या घरी स्वतंत्र शौचालय उभारण्याची अट पूर्ण केल्यावरच लग्न करणार असल्याचे ठामपणे सांगितले.

जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या अहवालानुसार स्वच्छ भारत चळवळीमुळे विशेषत: खुल्यावर शौच करण्याविरोधात सुरू केलेल्या उपक्रमांमुळे २०१४ ते २०१९ या काळात भारतात डायरिया व प्रथिनांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या कुपोषण आणि अन्य आजारांमुळे होणारी तीन लाख लोकांची जीवितहानी टाळता येणे शक्य होणार आहे. युनिसेफ द्वारा प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार खुल्यावर शौच करण्यापासून मुक्त झालेल्या समाजात एकूणच लहान मोठ्या संसर्गजन्य आजारांवरील वैद्यकीय खर्च कमी होऊन पैशांची वेळेची तसेच कार्यक्षमतेची बचत होते. मृत्युदरात घट होते तसेच प्रत्येक घर ५००० पर्यंत वार्षिक बचत करू शकते. तळागाळातील विशेषत: गरीब जनतेला हे लाभ विशेष करून मिळू शकतात.

याशिवाय, या मोहिमेला मिळालेल्या यशस्वीतेमुळे जनता तसेच सरकारी यंत्रणांसमोर एखादी योजना यशस्वीपणे कशी राबवावी, प्रचंड प्रमाणात असलेल्या विविध जाती संस्कृतींच्या लोकांच्या मानसिकतेत व वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी कशा पद्धतीने धोरणं राबवावी लागतात याचे उत्तम उदाहरण स्वच्छ भारत अभियानाद्वारा समोर आले. यातील चतुसूत्रींचा अवलंब करून येणाऱ्या काळात इतरही समाजोपयोगी योजना यशस्वीपणे राबवता येतील.

राजकीय नेतृत्व: कोणतीही सरकारी योजना यशस्वी करण्यासाठी खंबीर राजकीय नेतृत्व असणे ही प्राथमिक आवश्यकता आहे.

लोकनिधी- स्वच्छ भारत अभियानासाठी सुमारे १ लक्ष कोटी रूपयांचा निधी केंद्र व राज्य सरकारांनी मंजूर केला आहे.

भागीदारी- सातत्याने सामाजिक संस्था, खाजगी क्षेत्रातील कंपन्या, उद्योग समूह, नागरी समाज व प्रसार माध्यमे यांच्याशी समन्वय ठेवत व त्यांना या उपक्रमात भागीदार बनवून घेत अनेकदा आर्थिक बाबतीत तसेच तळागाळांतील लोकांपर्यंत पोहोचण्यास प्रभावी साथीदार म्हणून या घटकांशी संलग्नता ठेवण्यात आली.

सहभाग: स्वच्छता अभियान ही सरकारी योजना नसून एक जनआंदोलन आहे. ही योजना लोकांनी पुढे नेली नाही तर कधीच बंद पडेल.

२ ऑक्टोबर २०१९ पर्यंत निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करण्याचे दायित्व पेलताना ग्रामीण भारताने स्वत:हून आपल्या परिसरात स्वच्छता टिकवून ठेवण्याचा वसा घेतला आहे. जगासमोर स्वच्छ भारत अभियानातून स्वच्छतेची सवय सर्वांसाठी असा संदेश देणारे एक उत्तम उदाहरण समोर आले आहे. लोक वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी प्रभावी जनसंवादाच्या वापरातून संयुक्त राष्ट्राने निश्चित केलेल्या सहा निरंतर विकास उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल सुलभ होऊ शकेल. स्वच्छतेबाबत जनसंवाद व लोकजागृती या दोन बाबी प्रभावी ठरल्या असल्याचे मत सध्याच्या सरकारच्या ५९ मंत्र्यांनीही मान्य केले आहे. यासाठी २९ सप्टेंबर सर्व मंत्रमंडळ २ ऑक्टोबर २०१८ दरम्यान नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय स्वच्छता परिषदेत सहभागी होते. स्वच्छ भारत अभियानातून आपण जगासमोर स्वच्छता क्रांतीचे एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे याचे पडसाद हळूहळू जगभरात दिसून येत आहेत.

■■■

*लेखक केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: param.ayer@gov.in*

# स्वच्छ भारत -निरोगी भारत

**- प्रिती सुदान**



**स्वच्छता आणि आरोग्यसुविधांच्या अभावाच्या वाढत्या आव्हानाचा सामना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने बहुपदरी धोरण आखले असून स्वच्छता सुधारणा करण्यासाठी अनेक उपक्रमही हाती घेतले आहेत. जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि लोकांच्या कल्याणासाठी, मंत्रालयाने सार्वजनिक स्वच्छता हा विषय सर्व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी ठेवला आहे.**

प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ आणि उत्तम परिसरात राहण्याची आणि काम करण्याची नैसर्गिक इच्छा असते. अशा स्वच्छ आणि निरोगी परिसरात आजार लवकर बरे होतात किंवा झालेल्या जखमा लवकर भरुन निघतात. प्राचीन काळी, कुठलीही शस्त्रक्रिया करायची झाल्यास, ती सकाळच्या वेळी आणि नदीकिनारी केली जात असे, जेणेकरून स्वच्छ वाहते पाणी आणि हवेचा लाभ रुग्णाला मिळावा. मात्र जसजसा काळ पुढे गेला, तसतसे, शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे आपले नैसर्गिक स्त्रोत अधिकाधिक वापरले जाऊ लागले, अति आणि अविचारी वापरामुळे हे स्त्रोत प्रदूषित होऊ लागले. याचा मानवी आरोग्यावर आणि पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो आहे. लिक्सील ग्रुप कॉर्पोरेशन, वाटर, एअर अँड ऑक्सफोर्ड इकोनॉमिक्स यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात असे म्हंटले आहे, कि २०१५ साली आरोग्य आणि स्वच्छता सुविधांच्या अभावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला २२२.९ अब्ज डॉलर्सचा फटका बसला. २०१० साली यासाठी जेवढा खर्च आला होता त्यापेक्षा १.२ प्रमाणात अधिक म्हणजे ४० अब्ज डॉलर्सचा अतिरिक्त खर्च केवळ पाच वर्षात करावा लागला असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

स्वच्छता आणि आरोग्यसुविधांच्या अभावाच्या वाढत्या आव्हानाचा सामना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने बहुपदरी धोरण आखले असून स्वच्छता सुधारणा करण्यासाठी अनेक उपक्रमही हाती घेतले आहेत. जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि लोकांच्या कल्याणासाठी, मंत्रालयाने सार्वजनिक स्वच्छता हा विषय सर्व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी ठेवला आहे. या उपक्रमांमुळे आरोग्य क्षेत्रात स्वच्छतेचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली आहेच, त्याशिवाय इतर संबंधित मंत्रालयाशी समन्वय साधून सामुदायिक स्तरावर स्वच्छतेचे उपक्रम राबवण्याची सर्वसमावेशक उपाययोजनाही केली जाते आहे.

आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने २०१५ साली हाती घेतलेल्या कायाकल्प अभियानाअंतर्गत, सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, तसेच देशभरातील ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशात असलेल्या केंद्र सरकारच्या संस्था आणि आरोग्य केंद्रांमध्ये जंतूसंसर्ग टाळण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. विविध निकष आणि मापदंडावर आरोग्य सुविधांचा दर्जा तपासाला जातो. आणि सर्व निकषांवर सर्वोत्तम ठरणाऱ्या आरोग्य केंद्रांना दरवर्षी कायाकल्प पुरस्कार दिला जातो. रोख रक्कम आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या योजनेमुळे, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील स्वच्छता, आरोग्य सुविधा सुधारल्या असून जंतूसंसर्ग मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आला आहे.

एवढेच नव्हे, तर या उपक्रमामुळे, स्वच्छता ही सवय बनत चालली असून आरोग्यासाठी तिचे महत्व जनतेला समजले आहे, त्यामुळे आता सार्वजनिक स्वच्छता हा भारतीय संस्कृती आणि आचाराचा भाग बनत चालला आहे. कायाकल्प योजनेच्या या यशामुळे प्रेरित होऊन, खाजगी क्षेत्रातील लोकही सार्वजनिक स्वच्छतेसाठी पुढे येत असून सरकारच्या कामात हातभार लावत आहेत. कायाकल्पच्या धर्तीवर खाजगी रूग्णालये आणि इतर खाजगी क्षेत्रांतील स्वच्छता आणि आरोग्य सुविधांचे मूल्यांकन करण्याचे रुग्णालये आणि आरोग्यसुविधा प्रदातांसाठी असलेल्या राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाने मान्य केलेले आहे.

त्याशिवाय, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत, राष्ट्रीय आरोग्य योजना आणि महिला आरोग्य समितीच्या अखत्यारीत ग्रामीण आरोग्य सुविधा आणि पोषण आहार समित्या तयार करण्यात आल्या आहेत. त्या समित्यांच्या माध्यमातून, नागरी भागातही आरोग्य आणि स्वच्छता सुविधांपासून वंचित असलेल्या समुदायांमध्ये आरोग्य सुविधांचा प्रसार केला जातो. अनेक राज्यांनी या समित्यांचा प्रभावी वापर करत सार्वजनिक स्वच्छतेच्या क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवले आहेत. या कार्यकर्त्यांही राष्ट्रीय आरोग्य योजना आणि महिला आरोग्य समितीसोबत काम करत असून समुदायांना एकत्रित करुन शौचालये बांधण्याचे आणि त्यांचा वापर करण्याचे अभियान राबवत आहेत. महिला आरोग्य समित्यांनी अलिकडेच नागरी भागातील गरीब आणि दुबळ्या समाजातील १२ ते २० महिलांचे सामुदायिक गट तयार केले असून, त्यांच्यामार्फत, स्वच्छतेसह अनेक सामुदायिक कार्यक्रम राबवले जात आहेत.

केंद्रातील इतर मंत्रालयांशी समन्वय साधून आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय सार्वजनिक स्वच्छतेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करत आहे. अशाच एका संयुक्त उपक्रमाअंतर्गत, पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयासोबत “स्वच्छ, स्वस्थ, सर्वत्र” हा उपक्रम राबविला जातो आहे. देशभरात सुरु असलेल्या स्वच्छ भारत आणि कायाकल्प अभियानाशी सांगड घालून ज्या ग्रामपंचायती हागणदारी मुक्त गावाचे उद्दिष्ट्य साध्य करतील, त्यांना विशेष निधी देण्याचा प्रयत्न केला जातो.

**स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्यासाठी, राष्ट्रीय आरोग्य अभियानाने २०१७ साली, विश्वास ही नवी चळवळ सुरु केली.- विश्वास म्हणजे- आरोग्य जल आणि स्वच्छता सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, ग्राम आधारित उपक्रम! ग्रामीण आरोग्य सुविधा आणि पोषण आहार समितीद्वारे राबवल्या जाणाऱ्या या वार्षिक कार्यक्रमात पाणी, स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्राविषयी जनजागृती केली जाणार आहे.**

स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्यासाठी, राष्ट्रीय आरोग्य अभियानाने २०१७ साली, विश्वास ही नवी चळवळ सुरु केली.- विश्वास म्हणजे- आरोग्य जल आणि स्वच्छता सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, ग्राम आधारित उपक्रम! ग्रामीण आरोग्य सुविधा आणि पोषण आहार समितीद्वारे राबवल्या जाणाऱ्या या वार्षिक कार्यक्रमात पाणी, स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्राविषयी जनजागृती केली जाणार आहे. तसेच, ही उद्दिष्टे गाठण्यासाठी स्थानिक पातळीवरच कार्यकर्ते तयार केले जातील. त्याशिवाय स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांना एकत्रित करुन त्यांच्यासाठी एक संयुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देणे. या उपक्रमाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या धोरणांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे:

आरोग्य सुविधांसाठी कायाकल्प उपक्रम: या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश, सार्वजनिक आरोग्य सुविधा एकत्रितरीत्या राबवून जनतेमध्ये स्वच्छतेची सवय आणि संस्कृती राबवणे हा आहे. स्वच्छता आणि आरोग्य याचा वारंवार आढावा घेणे, आणि उत्तम आरोग्य याची सवय समाजात कायमस्वरूपी रुजवणे, जेणेकरुन त्यातून जनतेचे आरोग्य सुधारेल.

या योजनेअंतर्गत, आरोग्य सुविधा त्यांचे मूल्यांकन स्वत:च करत असतात. आरोग्य केंद्रातील सुविधा, जैववैद्यक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधीच्या नियमांचे पालन, जंतूसंसर्ग नियंत्रण पद्धती प्रभावीपणे राबवणे, स्थानिक स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय साधून स्वच्छता आणि आरोग्यविषयक योजना राबवणे. आरोग्य केंद्राच्या आत आणि त्याच्या परिसरात तसेच आजूबाजूला “स्वच्छता” पाळण्याचे निकष आधीच तयार केले असतात. त्यानुसार, ज्या सुविधा केंद्रांमध्ये या स्वच्छता निकषांत सुधारणा होत आहेत, त्याचे तटस्थ मूल्यांकन केले जाते, त्यानंतर बाह्य मूल्यमापन केले जाऊन कायाकल्प योजनेच्या निकषांनुसार ही सुधारणा झाली आहे का,त्यासाठी काही वेगळे प्रयत्न केले गेले आहेत का? हे प्रत्येक पातळीवर तपासले जाते.

जिल्हा पातळीवरील रुग्णालये, उपजिल्हापातळीवरील रुग्णालये आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे यांची निवड करण्याचे काम राज्यपातळीवर विकेंद्रित करण्यात आले आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांची निवड, जिल्हा पातळीवर केली जाते.

या सर्व निकषांवर आधारित सर्वेक्षण झाल्यानंतर सर्वोत्तम ठरलेल्या रुग्णालयांना रोख बक्षीस आणि प्रमाणपत्र दिले जाते. त्याशिवाय कायाकल्पच्या निकषांनुसार, ७० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या सर्व रुग्णालयांना रोख रक्कम आणि प्रोत्साहनपर प्रमाणपत्र दिले जाते. या योजनेअंतर्गत, केंद्र सरकारच्या संस्थांना २.५ कोटी रुपयांपर्यंत, जिल्हा रुग्णालयांना ५०.०० लाख रुपयांपर्यंत, सामुदायिक आरोग्य केंद्रांना १५.०० लाख रुपयांपर्यंत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना २.० लाख रुपयांपर्यंत बक्षीस मिळू शकते.

२०१७-१८ या आर्थिक वर्षात देशातली सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात ही योजना सुरु झाली. त्याअंतर्गत, २८००० आरोग्य केंद्रे- ज्यात जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे , नागरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अशा सगळ्या ठिकाणी स्वच्छता आणि आरोग्य सुविधांची तपासणी करण्यात आली. यातील २९७० रुग्णालयांची बक्षिसांसाठी निवड करण्यात आली. यात केंद्र सरकारच्या अखत्यारीतील ११ संस्था, २८९ जिल्हा रुग्णालये, ७६० उपजिल्हा रुग्णालये आणि १८१ नागरी आरोग्य सुविधा केंद्रांचा समावेश होता.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत, कायाकल्प योजना लागू करण्यासाठी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांनी अतिशय मदत केली.या योजनेसाठी निधी, प्रशिक्षण, मूल्यांकन, रुग्णालय सुविधा सुधारणा आणि तांत्रिक सहकार्य पुरवले गेले. रुग्णालयांचे मूल्यमापन सात ढोबळ संकल्पनांच्या आधारावर केले गेले. या अंतर्गत, प्रत्येक पातळीवर, निकष ठरवण्यात आले होते, ते असे- अ) रुग्णालये/ आरोग्य सुविधा देखभाल ब) सार्वजनिक स्वच्छता क) कचरा व्यवस्थापन.ड) जंतुसंसर्ग नियंत्रण इ) सहायक सेवा ई) स्वच्छता-आरोग्याचा प्रसार फ) रुग्णालय परिसराचा कायाकल्प.

कायाकल्प मोहिमेंतर्गत राबवण्यात आलेले सर्व उपक्रम सोशल मिडियावर देखील उपलब्ध आहेत. - https://www.facebook.com/pages/Kayakalp/586316831510706.

कायाकल्प योजनेचा परिणाम: कायाकल्प योजनेची सुरुवात झाल्यानंतर, सार्वजनिक रूग्णालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि जंतूसंसर्ग नियंत्रण सवयी या सगळ्यांमध्ये, लक्षणीय सुधारणा झाली आहे. त्याशिवाय, या कार्यक्रमामुळे, आरोग्य, स्वच्छता आणि सार्वजनिक स्वच्छतेचे सतत मूल्यमापन आणि समव्यावसायिकांकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो आहे. समग्र आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी आवश्यक असलेला विभागीय समन्वय वाढवण्यास या योजनेमुळे संधी आणि प्रोत्साहन मिळाले.

**कायाकल्प योजनेची सुरुवात झाल्यानंतर, सार्वजनिक रूग्णालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि जंतूसंसर्ग नियंत्रण सवयी या सगळ्यांमध्ये, लक्षणीय सुधारणा झाली आहे. त्याशिवाय, या कार्यक्रमामुळे, आरोग्य, स्वच्छता आणि सार्वजनिक स्वच्छतेचे सतत मूल्यमापन आणि समव्यावसायिकांकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो आहे.**

**ब) स्वच्छ, स्वस्थ, सर्वत्र: -**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय तसेच पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय संयुक्तरीत्या स्वच्छ, स्वस्थ सर्वत्र अभियान राबवत आहेत. सार्वजनिक स्वच्छतेत सुधारणा करणे तसेच जनतेमध्ये आरोग्यविषयक जागृती करुन स्वच्छता हा त्यांच्या जीवनशैलीचा भाग बनवणे, यासाठी हा उपक्रम राबवला जातो आहे. स्वच्छ भारत अभियान आणि कायाकल्प योजना यांच्यात अधिक समन्वय साधण्यासाठी, त्यांच्यातील ऊर्जा एकत्रित करण्यासाठी या उपक्रमाचा उपयोग होतो.

या योजनेचे तीन मुख्य उद्देश आहेत: -

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना कायाकल्प पुरस्कार मिळाला आहे, अशा आरोग्य केंद्रांचे गाव हागणदारी मुक्त करण्यासाठी मदत आणि प्रोत्साहन.

हागणदारीमुक्त भागांमध्ये सामुदायिक आरोग्य केंद्रे अधिक सक्षम करणे, जेणेकरुन या आरोग्य केंद्रात कायाकल्पच्या निकषांनुसार स्वच्छतेची काळजी घेतली जाईल आणि त्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत १० लाख रुपयांचे वित्तसहाय्य मिळवून देणे.

अशा सामुदायिक आरोग्य केंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवडक कार्यकर्त्यांना पाणी, स्वच्छता आणि आरोग्य या विषयांवर प्रशिक्षण देऊन, त्यांची क्षमता वाढविणे.

या उपक्रमाअंतर्गत, सामुदायिक आरोग्य केंद्रे अधिक बळकट करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे. हागणदारीमुक्त गावांमध्ये कायाकल्प योजनेच्या निकषानुसार स्वच्छता नियमांचे पालन व्हावे आणि त्यासाठी त्यांना १० लाख रुपयांचे अर्थसहाय्य व तांत्रिक मदत दिली जाते. तसेच सामुदायिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून गावात स्वच्छता आणि आरोग्य याविषयी जनजागृती केली जावी, ज्यातून प्रेरणा घेऊन

ग्रामपंचायती हागणदारीमुक्त गावाचे उद्दिष्ट साध्य करतील.

**ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समिती**

आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने नेहमीच सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य या विषयाला प्राधान्य आणि प्रोत्साहन दिले असून, त्यांची सांगड सामुदायिक आरोग्य केंद्रांतील कार्यक्रमांशी घातली आहे. २००५ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु झाले, तेव्हापासून त्या अंतर्गत, सर्व राज्यात, ग्राम आरोग्य स्वच्छता समिती स्थापन केल्या आहेत, आरोग्याशी निगडीत प्रश्नांवर, सामुदायिक स्वरूपात मात करण्यासाठी या समित्या काम करतात. समुदायांना एकत्र आणून सार्वजनिक स्वच्छतेचे आणि पर्यायाने निरोगी समाजाचे उद्दिष्ट त्यातून साध्य केले जाते. गावपातळीवर तयार करण्यात आलेल्या या समित्यांना दरवर्षी १० हजार रुपयांचा एकात्मिक निधी दिला जातो. यातून आरोग्य आणि स्वच्छतेला पूरक ठरणाऱ्या गोष्टींच्या अंमलबजावणीसाठी मोहीम उघडली जाते. कालांतराने या समितीचे नाव ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समिती, असे करण्यात आले. त्यातून स्वच्छता आणि आरोग्यासोबत पोषण आहारावरही भर देण्यात आला. राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कार्यक्रम गावपातळीवर आणि समुदायांमध्ये प्रभावीपणे पोचवणे आणि राबवण्याचे काम या समित्या आणि 'आशा' कार्यकर्त्या अत्यंत सक्षमपणे करत आहेत. २०१३ साली या समित्यांसाठी जारी करण्यात आलेल्या सुधारित नियमावलीनुसार, ग्रामपंचायत सदस्य या समितीचा अध्यक्ष असेल. (त्याआधी ग्रामपंचायत सरपंचच अध्यक्ष होत असे.) नव्या नियमामुळे या समितीत ग्रामपंचायत सदस्यांचा आणि समुदायांचा सक्रीय सहभाग वाढण्यास मदत झाली.

सध्या देशभरात ५.२ लाख ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समित्या कार्यरत आहेत. उद्दिष्टांच्या ९२% समित्या स्थापन झाल्या असून त्यापैकी ९७% समित्यांची बँक खाती देखील आहेत. प्रत्येक राज्यातल्या या समित्या अधिक कार्यक्षम आणि सक्षम व्हाव्यात यासाठी राज्य सरकारांनी काही नवनवीन उपक्रम राबवले आहेत. उदाहरणार्थ छत्तीसगड राज्याने आशा कार्यकर्त्यांच्या मदतीने या समित्या अधिक कार्यक्षम केल्या आहेत आणि त्यांना स्वच्छ ग्राम पंचायत योजनेचा भाग बनवले आहे. या योजनेंअंतर्गत, प्रत्येक ग्रामपंचायतीचे वार्षिक मूल्यमापन केले जाते आणि आरोग्य तसेच इतर सामाजिक निकषांच्या आधारांवर उत्तम काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार दिला जातो. या समित्या स्थानिक पातळीवरील विविध महासंघांशीही संलग्न करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे गावकऱ्यांशी सल्लामसलत आणि अंमलबजावणी यासाठी मदत होते. ओदिशा येथे प्रत्येक ग्रामपंचायतीची दर तिमाहीला ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समितीशी बैठक होते. या समित्यांच्या कामांना प्रोत्साहन आणि पाठींबा देण्याचे काम ग्रामपंचायती करतात. या समित्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी इतर राज्येही अनेक उपाययोजना करत आहेत.

**सध्या देशभरात ५.२ लाख ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समित्या कार्यरत आहेत. उद्दिष्टांच्या ९२% समित्या स्थापन झाल्या असून त्यापैकी ९७% समित्यांची बँक खाती देखील आहेत. प्रत्येक राज्यातल्या या समित्या अधिक कार्यक्षम आणि सक्षम व्हाव्यात यासाठी राज्य सरकारांनी काही नवनवीन उपक्रम राबवले आहेत. उदाहरणार्थ छत्तीसगड राज्याने 'आशा' कार्यकर्त्यांच्या मदतीने या समित्या अधिक कार्यक्षम केल्या आहेत. आणि त्यांना स्वच्छ ग्राम पंचायत योजनेचा भाग बनवले आहे.**

या समित्यांना 'आशा' कार्यकर्त्या सुविधा पुरवण्यात महत्वाची भूमिका तर बजावतातच, शिवाय त्यांच्या गावात या समितीमार्फत चालणाऱ्या कार्यक्रमानांही मदत करतात. त्याशिवाय, शौचालये बांधणे आणि त्यांचा वापर. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय तसेच केंदीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय, यांच्या संयुक्त सूचना आणि सुविधा(या अंतर्गत आशा कार्यकर्त्यांना प्रत्येक शौचालय उभारणीमागे ७५ रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जातो.) यामुळे स्थानिक पातळीवरच्या प्रयत्नांना बळकटी मिळाली आहे.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे राज्यांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत असलेल्या विविध योजनांसाठी वार्षिक मंजुरी दिली जाते. त्या अंतर्गत, ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समितीची क्षमताबांधणी आणि इतर कामांसाठी सातत्याने मदत केली जाते. त्याशिवाय या समितीच्या सदस्यांसाठी, राज्यपातळीवर प्रशिक्षक तयार करण्याचे राष्ट्रीय प्रशिक्षणही दिले जाते. २०१६ आणि २०१७ मध्ये अशी राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

ड) राष्ट्रीय नागरी आरोग्य योजनेअंतर्गत महिला आरोग्य समिती

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत, देखील सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्यावर भर देण्यात

आला आहे. ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समितीच्या धर्तीवर, या अभियानाअंतर्गत, नागरी भागात महिला आरोग्य समित्या स्थापन करण्यात आल्या. या समितीमध्येही शहरातील गरीब आणि वंचित समुदायातील १२ ते २० महिलांचा समावेश असतो. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत ही समिती स्थापन केली जाते. ग्रामीण समितीप्रमाणेच या समितीलाही दरवर्षी ५००० रुपयांचा एकात्मिक निधी मिळतो. सध्या देशभरातील राज्यात एकून ७४००० महिला आरोग्य समित्या कार्यरत आहेत. मात्र ही योजना अजूनही विकसित होते आहे. महिला आरोग्य समित्या अलीकडच्या काळातच स्थापन झाल्या असल्या तरी, सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य अशा क्षेत्रात समुदायांना एकत्रित करुन योजना राबवण्यात त्यांचा सक्रीय सहभाग आहे.

ई) विश्वास- आरोग्य जल आणि स्वच्छता सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, ग्राम पातळीवरील चळवळ:

सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य सुविधांचा विस्तार आणि बळकटीकरण करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २०१७ मध्ये विश्वास ही नवी मोहीम हातात घेण्यात आली. विश्वास म्हणजे आरोग्य जल आणि स्वच्छता सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, ग्राम पातळीवरील चळवळ. ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समित्या त्यांच्या भागात ही चळवळ राबवतात.

विश्वास या वार्षिक मोहिमेअंतर्गत, जनजागृती, सामाजिक एकत्रीकरण, जल आणि आरोग्य अशा क्षेत्रात काम करण्यासाठी सामुदायिक स्तरावर स्वयंसेवक तयार करणे, आणि सार्वजनिक क्षेत्रासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध सरकारी योजनांना एकत्रित करुन त्या सगळ्यांच्या संयुक्त अंमलबजावणीसाठी एक सामाईक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे अशी कामे केली जातात. विश्वास आणि स्वच्छ भारत अभियान यांनी संयुक्तरीत्या दर महिन्यात एक असे ११ दिनविशेष निश्चित करुन त्यानुसार मोहिमा राबवणे अपेक्षित आहे. यातील प्रत्येक दिवशी एका विशिष्ट संकल्पनेवर भर दिला जाईल.

**विश्वास या वार्षिक मोहिमेअंतर्गत, जनजागृती, सामाजिक एकत्रीकरण, जल आणि आरोग्य अशा क्षेत्रात काम करण्यासाठी सामुदायिक स्तरावर स्वयंसेवक तयार करणे, आणि सार्वजनिक क्षेत्रासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध सरकारी योजनांना एकत्रित करुन त्या सगळ्यांच्या संयुक्त अंमलबजावणीसाठी एक सामाईक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे अशी कामे केली जातात.**

- विश्वास अंतर्गत राबवले जाणारे ११ मासिक अभियान
- स्वच्छता अभियानासाठी वार्षिक नियोजन दिवस
- ग्रामीण आरोग्य आणि सार्वजनिक स्वच्छता दिवस (यात ग्रामस्वच्छता आणि आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता यांची सांगड घालणे अपेक्षित).
- हागणदारीमुक्त गाव दिवस
- हात धुणे जनजागृती दिवस
- शाळा आणि अंगणवाडी स्वच्छता दिवस.
- द्रव आणि घनकचरा व्यवस्थापन दिवस
- वैयक्तिक आणि घरगुती स्वच्छता आणि आरोग्य दिवस
- आरोग्य जनजागृती दिवस/निरोगी जीवनशैली दिवस
- कीटक नियंत्रण दिवस
- स्वच्छतादूत/ स्वच्छता स्वयंसेवकांचा गौरव दिन
- स्वच्छता आणि आरोग्यासाठी ग्रामसभा.

विश्वास मोहिमेचा आराखडा आणि योजना केंद्रीय मंत्रालयाने जुलै २०१७ मध्ये सगळ्या राज्यांना दिला आहे. तसेच, ही मोहीम राबवण्यासाठी एक मार्गदर्शक पुस्तिकाही जारी केली आहे. यासाठी २०१७ मध्ये नवी दिल्ली, गुवाहाटी येथे अनुक्रमे जून आणि सप्टेंबर दरम्यान प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली होती. हा आराखडा, ग्रामीण मंत्रालयालाही दिला आहे, आणि ऑक्टोबर २०१७ मध्ये पंचायत राज संस्थांच्या राष्ट्रीय संमेलनात ५००० ग्रामपंचायत सदस्यांना हा आराखडा देण्यात आला. छत्तीसगड, ओदिशा, पंजाब, तेलंगणा, गोवा आणि महाराष्ट्र ही राज्ये आणि ईशान्य भारतातील मेघालय,मणिपूर, आसाम, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम या सर्व राज्यांनी त्यांच्या जिल्हा प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली. विभागीय स्तरावरही प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत. छत्तीसगड, ओदिशा सारख्या राज्यांत ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समितीच्या सदस्य महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत ही चळवळ राबवली जात आहे. उत्तरप्रदेशात, निवडक पाच राज्यांत विश्वास मोहीम राबवली जाते आहे. विश्वास साठी, राज्य, जिल्हा आणि विभागीय स्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे. गोरखपूर जिल्ह्यात पसरत असलेल्या

जापानी इंसेफिलायाटीस आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक सामुदायिक स्तरावरील कार्यकर्त्यांशी समन्वय साधून विश्वासअंतर्गत विशेष मोहीम राबवली जाते आहे. जम्मू-काश्मीर मध्येही, विश्वास मोहीम आणि काही राज्यांनी ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण आहार समिती यांची सांगड घालण्यात आली आहे. जुलै महिन्यात या दोन्ही मोहिमांसाठी जिल्हा स्तरावर तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले.

फ) स्वच्छता ही सेवा २०१७ मोहीम : -

केंद्र सरकारने १५ सप्टेंबर ते २ जुलै २०१७ दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' ही मोहीम राबवली.सर्व राज्यांमध्ये अत्यंत उत्साहात ही मोहीम राबवली गेली. ग्रामीण आणि नागरी भागातल्या आरोग्य आणि सामुदायिक केंद्रात स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य या विषयावर जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम राबवले गेले. आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने राज्यांच्या सहकार्याने देशभरात १.२ लाख जगजागृतीपर मोहिमा राबवल्या, स्वच्छता ही सेवा मोहीम राबवण्यात या मंत्रालयाने इतर सर्व मंत्रालयाच्या तुलनेत बाजी मारली आहे. स्वच्छता ही सेवा मोहीम २०१८ सध्या देशातील सर्व राज्यांत सुरु आहे.

**स्वच्छता पंधरवडा –**

आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे दरवर्षी आरोग्य आणि सामुदायिक केंद्रामध्ये स्वच्छता पंधरवडा हा उपक्रम साजरा केला जातो. याअंतर्गत सार्वजनिक स्वच्छतेविषयी जनजागृती केली जाते. आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने १ ते १५ एप्रिल या कालावधीत हा पंधरवडा राबवला. याकाळात सर्व राज्यांमध्ये उत्साहात स्वच्छता मोहीम राबवली गेली.

**निष्कर्ष :**

या लेखात विस्ताराने सांगितलेले अनेक उपक्रम, जे आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने यशस्वीपणे राबवले, त्यामुळे, आरोग्यसुविधांच्या दर्जावर निर्णायक परिणाम झाला आहे. त्याशिवाय, अशा मोहिमांमुळे सामुदायिक पातळीवर स्वच्छताविषयक सवयी आणि जीवनशैली सुधारण्यातही मोठी मदत झाली आहे. कायाकल्प आणि स्वच्छ, स्वस्थ, सर्वत्र अशा मोहिमांमुळे केवळ स्वच्छतेचा दर्जाच सुधारला नाही तर, त्यातून अशी समुदाय केंद्रे स्वच्छता विषयक मोहीम राबवण्याचे महत्वाचे स्थान बनली आहेत. महिलांच्या ग्रामीण आणि नागरी स्तरावरील समित्या आणि नव्यानेच सुरु झालेली विश्वास मोहीम, स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रात होत असलेल्या एकत्रित प्रयत्नांचेच द्योतक आहे. या मोहिमांमुळे सार्वजनिक स्वच्छतेचा आरोग्याशी असलेला निकटचा संबंध सर्वसामान्य जनतेला लक्षात आला, हे ही या मोहिमेचे यशच आहे. आरोग्य सुविधांशी निगडीत सर्व कार्यकर्ते समाजाच्या तळागाळात कार्यरत आहेत. याचा लाभ स्वच्छ भारत-निरोगी भारत मोहिमेला होत असून त्यांच्यामुळेच आज ही मोहीम समाजात व्यापक स्तरावर आणि खोलवर रुजली आहे.

■■■

*लेखिका केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण खात्याच्या सचिव आहेत.*

*ई मेल: secyhfvl@nic.in*

## सुवर्णसंधी!

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२

email : myojanadpd@gmail.com




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

# स्वच्छता : कल्पनेतून वास्तवाकडे

- राकेश श्रीवास्तव



**महात्मा गांधी यांनी भारतात त्यावेळी असलेली स्वच्छतेची खालावलेली स्थिती, विशेषत: ग्रामीण भागातली स्वच्छता गृहांची अपुरी संख्या याकडे स्वराज मिळवण्याइतकेच लक्ष देणे आवश्यक असल्याचे ओळखले होते.भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरच त्यांनी स्वच्छतेसाठी, सर्व प्रकारच्या कचऱ्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठीही,सार्वजनिक जीवनात सातत्याने लढ्याचे नेतृत्व केले. स्वच्छतेबाबतच्या तंत्र विषयक, सामाजिक आणि आर्थिक तसेच वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामुदायिक अशा सर्व पैलुना त्यांनी स्पर्श केला.**

समाजामधली स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षा जास्त महत्वाची आहे. आपल्यासारख्या समाजात स्वच्छता म्हणजे सामाईक आत्मिक प्रयत्न आणि स्वच्छता हा मुलभूत मानवी हक्क आहे.

**महात्मा गांधी**

गांधीजींचे हे विचार म्हणजे मानव जातीच्या अस्तित्वासाठी स्वच्छतेच्या गरजेवर ते किती भर देत होते हे यातून सिध्द होते. स्वच्छतेची संकल्पना ही सर्वंकष असून त्यात कचरा (संकलन, प्रक्रिया, विल्हेवाट, पुनर्वापर), मानवी आणि घन कचरा (जैव विघटनकारी, जैव अ विघटनकारी, कचरा) सांडपाणी, औद्योगिक क्षेत्रातून निर्माण झालेला कचरा आणि हानिकारक (रुग्णालये, रसायने, किरणोत्सारी, प्लास्टिक आणि इतर हानिकारक) कचरा व्यवस्थापन यांचा समावेश आहे.समाजातल्या स्वच्छतेच्या दर्जाचा आरोग्य आणि सार्वजनिक आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. रोग मर्यादा आणि आयुर्मानाचा अपेक्षित दर्जा यांचा यात समावेश असून समाजाच्या उत्पादक स्तराशी त्याचा संबंध आहे. धूळ, घाण, प्रदूषण यासारख्या स्वच्छतेच्या अभावामुळे, केवळ आर्थिक व्यापक परिणाम होतात असे नव्हे तर गंभीर सामाजिक परिणाम उद्भवतात. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक अशा दोनही आघाड्यावरच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो.

महात्मा गांधी यांनी भारतात त्यावेळी असलेली स्वच्छतेची खालावलेली स्थिती, विशेषत: ग्रामीण भागातली स्वच्छता गृहांची अपुरी संख्या याकडे स्वराज मिळवण्याइतकेच लक्ष देणे आवश्यक असल्याचे ओळखले होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरच त्यांनी स्वच्छतेसाठी, सर्व प्रकारच्या कचऱ्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठीही, सार्वजनिक जीवनात सातत्याने लढ्याचे नेतृत्व केले. स्वच्छतेबाबतच्या तंत्र विषयक, सामाजिक आणि आर्थिक तसेच वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामुदायिक अशा सर्व पैलुना त्यांनी स्पर्श केला. स्वातंत्र्यानंतर स्वच्छतेच्या मुद्द्याकडे सरकारने काही प्रमाणात लक्ष दिले.

महात्मा गांधी यांची विचारधारा अनुसरत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, २ ऑक्टोबर २०१४ ला देश व्यापी "स्वच्छ भारत अभियान" ही मोहीम सुरु केली.प्रत्येक भारतीयाला स्वच्छता गृहासह स्वच्छता विषयक सुविधा पुरवणे, घन आणि द्रव कचरा विल्हेवाट यंत्रणा, ग्रामीण स्वच्छता आणि पुरेसे पिण्याचे पाणी पुरवणे हा यामागचा उद्देश असून महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून, २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत हे उद्दिष्ट साध्य करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

पाणी, स्वच्छता, आरोग्य या तीन महत्वाच्या बाबींचा एक गट करण्यात आला आहे. प्रत्येक बाबीचे क्षेत्रवेगळे आहे आणि प्रत्येक बाब दुसऱ्या बाबीवर अवलंबून आहे.उदाहरणार्थ स्वच्छता

गृहाखेरीज जल स्त्रोत दुषित होतात, स्वच्छ पाण्याखेरीज स्वच्छतेबाबतच्या मुलभूत गोष्टी शक्य नाहीत. स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे आणि उत्तम आरोग्यदायी प्रथा या बालकांच्या जीवनासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहेत. सध्या सुमारे २.४ अब्ज लोक सुधारित स्वच्छता यंत्रणेचा वापर करत नाहीत, ६६३ दशलक्ष लोकांना सुधारित जल स्त्रोत सुविधा मिळत नाहीत. या मुलभूत गरजांवाचून मुलांचे आयुष्य धोक्यात आहे. पाच वर्षाखालील मुलांमध्ये पाणी आणि स्वच्छतेशी संबंधित आजार हे मृत्यूचे एक महत्वाचे कारण आहे. योग्य दर्जा नसलेले पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे उद्भवणाऱ्या आजारामुळे, दर दिवशी ८०० बालके मृत्युमुखी पडतात. सुमारे ५६४ दशलक्ष म्हणजे भारताची निम्मी लोकसंख्या उघड्यावर शौच करते. उघड्यावर शौच करणाऱ्या, दक्षिण आशियातल्या लोकांपैकी भारतात ९० टक्के आणि जगातल्या १.१ अब्ज लोकांपैकी ५९ टक्के लोक भारतातले आहेत.

स्वच्छता नव्या स्तरावर नेण्यात महिला आणि बाल विकास मंत्रालय अग्रगण्य आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाची तत्परतेने अंमलबजावणी करणाऱ्या सक्रीय मंत्रालया पैकी हे एक मंत्रालय आहे. उघड्यावर शौचापासून मुक्तीसाठी, मंत्रालय, राज्ये, जिल्हा आणि ग्राम स्तरावरच्या पथकांसमवेत काम करत आहे. घरांसाठी स्वच्छतागृहाबरोबरच आरोग्य केंद्रे, आंगणवाडी, पंचायत इमारती, बाजारपेठात स्वच्छता आणि आरोग्यदायी सुविधा त्याचबरोबर घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन याचाही यात समावेश आहे. देशाला लवकरात लवकर उघड्यावर शौचापासून मुक्त करायचे आहे,पायाभूत सुविधा, मानसिकतेत बदल आणि व्यापक सामुहिक कार्यक्रम यासारख्या शक्य त्या सर्व मार्गांने हे आव्हान पेलून उद्दिष्ट साध्य करायचे आहे.

आंगणवाडी केंद्रांवर,सार्वत्रिक स्वच्छता आणि आरोग्य राखण्यासाठी, सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांना, स्वच्छ आंगणवाडी, स्वच्छ परिसर, स्वच्छ मैदाने, वैयक्तिक स्वच्छता, स्वच्छ अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छ स्वच्छतागृह यासारख्या संकल्पनांवर आधारित कार्यक्रम, "स्वच्छ भारत अभियान" आणि "बाल स्वच्छता अभियान" यासारखे उपक्रम १४ ते १९नोव्हेंबर २०१४ दरम्यान राबवण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

**स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे आणि उत्तम आरोग्यदायी प्रथा या बालकांच्या जीवनासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहेत. सध्या सुमारे २.४ अब्ज लोक सुधारित स्वच्छता यंत्रणेचा वापर करत नाहीत, ६६३ दशलक्ष लोकांना सुधारित जल स्त्रोत सुविधा मिळत नाहीत. या मुलभूत गरजांवाचून मुलांचे आयुष्य धोक्यात आहे.पाच वर्षाखालील मुलांमध्ये पाणी आणि स्वच्छतेशी संबंधित आजार हे मृत्यूचे एक महत्वाचे कारण आहे. योग्य दर्जा नसलेले पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे उद्भवणाऱ्या आजारामुळे, दर दिवशी ८०० बालके मृत्युमुखी पडतात.**

आंगणवाडी केंद्रांवर, स्वच्छता आणि आरोग्य राखण्यासाठी आणि पिण्याचे स्वच्छ पाणी वापरण्यासंदर्भात विविध कार्यक्रम राबवण्याबाबत बाल स्वच्छता, अभियानासंदर्भात, सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांसाठी एका पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले आहे.

याचबरोबर ग्रामीण विकास आणि पंचायत राज या खात्यांबरोबर समन्वय साधत, मनरेगा अंतर्गत, ४ लाख आंगणवाडी इमारती आणि स्वच्छतागृह बांधण्याचे काम २०१६ मध्ये हाती घेण्यात आले.

२०१६ मधे मंत्रालयाने, ज्या आंगणवाड्यामध्ये स्वच्छतागृह आणि पिण्याचे स्वच्छ पाणी या सुविधांची गरज आहे अशा आंगणवाड्या निश्चित करण्याचे काम हाती घेतले.

महिला आणि बालकांमध्ये स्वच्छ भारत अभियानाविषयी जागृती करण्यासाठी आणि २०१९ पर्यंत सार्वत्रिक स्वच्छता, आरोग्य आणि उघड्यावर शौच करण्यापासून मुक्ती ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, महिला आणि बाल कल्याण मंत्रालयाने १ मार्च २०१७ ते १५ मार्च २०१७ या काळात स्वच्छता पंधरवडा साजरा केला. या पंधरवड्यात मंत्रालयातले आणि संलग्न कार्यालयातले सर्व वरिष्ठ अधिकारी आणि राज्य सरकारी अधिकारी यांनी देशाच्या विविध भागात दौरा करून मंत्रालयाशी संबंधित ठिकाणांना भेटी दिल्या.आंगणवाडी सेविका, निरीक्षक, सीडीपीओ यांच्यामध्ये या अधिकाऱ्यांनी स्वच्छतेप्रती जागृती केली. आंगणवाडी केंद्रे,चाईल्ड केअर इंस्टिट्युट, स्वाधार गृह,कार्यालयीन महिलांसाठीचे वसतिगृह यासारख्या ठिकाणी स्वच्छतेशी संबंधित कार्यक्रम राबवले गेले. स्थानिकांच्या सहभागाने आंगणवाडी केंद्रांना सफेद रंग देणे, त्यावर चित्रे रंगवणे, आंगणवाडीच्या भिंतीवर स्थानिक लोगो मोफत रंगवणे यासह आंगणवाडी केंद्रात आणि परिसरात स्वच्छता विषयक कार्यक्रम करण्यात आले. दिव्यांगासाठी स्वच्छतागृहे, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत बांधण्यात आलेली स्वच्छतागृहे यांचाही आढावा मंत्रालयाने घेतला. स्वच्छतेसाठी खाजगी उद्योग समूह सुद्धा

सामाजिक उत्तरदायित्वाखाली सहभागी झाले.मुलांमधे लहानपणापासूनच स्वच्छता आणि आरोग्य विषयक सवयी बिंबवण्यासाठी स्वच्छता या विषयावर रेखाटन स्पर्धेसारख्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

२०१७-१८ मधे आंगणवाडी केंद्रात ७०,००० स्वच्छता गृहे बांधण्यात आली आणि २०,००० आंगणवाडी केंद्रात स्वच्छ पाण्याची सोय करण्यात आली. चाईल्ड केअर इंस्टिट्युट स्वच्छ करण्यात आली आणि स्वच्छतागृहांची सोय करण्यात आली. त्याचप्रमाणे २०१८- १९ या वर्षातही ७०,००० आणखी स्वच्छतागृहे बांधण्यात आली आणि २०,००० स्वच्छ पाण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या.मंत्रालयाकडे उपलब्ध आकडेवारीनुसार, २०१८ पर्यंत ९,२९,३३९ आंगणवाडी केंद्रांना स्वच्छता गृह सुविधा उपलब्ध आहे.

स्वच्छ भारत संकल्पने अंतर्गत मुलींसाठीही कार्यक्रम आयोजित करण्यात आले.आरोग्यदायी स्वयंपाक आणि पद्धती यावरची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. देशातल्या चाईल्ड केअर इंस्टिट्यूमधल्या, मुलांमध्ये, आरोग्य आणि स्वच्छतेविषयी महत्व पटवण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम आयोजित करण्याचे उद्दिष्ट मंत्रालयाने साध्य केले आहे.

मंत्रालयाने, १५ सप्टेंबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१८ या काळात स्वच्छता ही सेवा ही मोहीम आयोजित केली असून स्वच्छता पंधरवड्यात आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता कार्यक्रमाप्रमाणेच यामध्ये कार्यक्रम राबवण्यात आले.सरकारी संस्था आणि आंगणवाडी केंद्राप्रमाणे मंत्रालयाशी संबंधित इतर घटकांमध्ये स्वच्छता राखणे आणि त्याद्वारे जास्तीत जास्त महिला आणि बालकांपर्यंत पोहोचणे हा याचा उद्देश आहे. चाईल्ड केअर इंस्टिट्युट आणि आंगणवाडी ही ग्रामीण भारतातली माता आणि बालके यांच्याशी जवळ जवळ दररोज संवाद साधला जातो अशी केंद्रे आहेत आणि म्हणूनच स्वच्छतेबाबत जागृतीचा प्रसार करण्यासाठी आणि स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी ही नोडल केंद्रे ठरली आहेत. ग्रामीण भागातल्या स्त्रिया दीर्घ काळापासून, मासिक पाळी दरम्यान अनारोग्यकारक प्रथांमुळे त्रास सोसत आहेत, हे लक्षात घेऊन या काळातल्या

**ग्रामीण भागातल्या स्त्रिया दीर्घ काळापासून, मासिक पाळी दरम्यान अनारोग्यकारक प्रथांमुळे त्रास सोसत आहेत, हे लक्षात घेऊन या काळातल्या स्वच्छतेबाबत अभियान आणि या काळासाठी आरोग्यकारक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रथांचा महिलांवर शारीरिक आणि मानसिक असा दोनही बाजूंनी प्रभाव राहतो.मासिक पाळी दरम्यानच्या स्वच्छतेबाबत महिलांमध्ये जागृती करण्यासाठी, मंत्रालयाने विशेष लक्ष पुरवले.**

स्वच्छतेबाबत अभियान आणि या काळासाठी आरोग्यकारक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रथांचा महिलांवर शारीरिक आणि मानसिक असा दोनही बाजूंनी प्रभाव राहतो. मासिक पाळी दरम्यानच्या स्वच्छतेबाबत महिलांमध्ये जागृती करण्यासाठी, मंत्रालयाने विशेष लक्ष पुरवले. स्वच्छता ही सेवा अभियानादरम्यान २०१८ मधे, आय सी डी आणि आंगण वाडी सेविका, ग्राम स्तरावरच्या श्रमदानात सहभागी झाले. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे ही बाब प्रत्येकाच्या मनावर ठसवण्यासाठी मंत्रालय प्रयत्नशील राहिले. यासाठी स्वच्छतेबाबत श्रमदानासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले. मंत्रालयाने श्रमदान या आगळ्या उपक्रमाद्वारे, मंत्री ते आंगणवाडी सेविका स्तरापर्यंत, घर आणि परिसरापासून कार्यालयापर्यंत स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात आले. जनतेने श्रमदानासाठी पुढे यावे यासाठी मंत्रालयातले अधिकारी आवाहन करण्याबरोबरच प्रोत्साहनही देत आहेत.

बालकांसाठी मनोरंजनात्मक पद्धतीने स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, भित्तीचित्रे, पथ नाट्य यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.यामुळे त्यांना या बाबत रुची निर्माण होते आणि त्यांना ते स्मरणात ठेवण्यासाठीही सोपे राहते.

उघड्यावर शौचापासून मुक्तीसाठी, सरकार, लोक प्रतिनिधी, पीआरआय, प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका बजावू शकतात, त्यामुळे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी एकत्र यायला हवे. देशातल्या स्वच्छता विषयक त्रुटींची दखल घेण्याचे, देश, राज्य आणि वैयक्तिक स्तरावर महत्व अधोरेखित करण्याचा एक स्त्रोत म्हणजे आंगणवाडी. उघड्यावर शौचापासून मुक्तीसाठी, मंत्रालय, राज्य आणि जिल्हा स्तरावरच्या पथकांशी समन्वय ठेवून काम करत आहे. ज्या ठिकाणी, भाडे भरून आंगणवाडी केंद्रे भरवली जातात अशा ठिकाणी, पक्के स्वच्छता गृह नसल्यास त्यासाठी जवळच्या शाळांचा उपयोग करण्याचा मंत्रालयाचा प्रयत्न आहे. यामुळे, आंगणवाडी केंद्रांना चांगल्या दर्जाची स्वच्छता गृहे उपलब्ध होतील. महिला आणि बालकांसाठी स्वच्छता आणि आरोग्य याबाबतची प्रात्यक्षिके आयोजित करण्यासाठी, मंत्रालयाने पुढाकार घेतला असून, जागतिक आरोग्य संघटनेच्या तंत्रानुसार हात धुण्याची प्रात्यक्षिके, पोषण महिना, स्वच्छता ही सेवा, स्वच्छता पंधरवडा यामध्ये दाखवण्यात आली.

दारिद्र्य आणि कुपोषणामुळे, शिशु आणि बालकांना, विशेषत: अपुऱ्या वजनाच्या बालकांना अतिसार आणि न्युमोनिया यांचा धोका वाढतो आणि यामुळे मृत्यू ओढवण्याची शक्यताही वाढते.कुटुंबांची हलाखीची आर्थिक स्थिती,महिलांमधली अल्प साक्षरता,मातेची पोषणविषयक सुमार स्थिती,बाल विवाह,मोठे कुटुंब आणि आरोग्य विषयक अपुऱ्या सेवा यामुळे,माता आणि बालकांच्या आरोग्याला मोठा धोका उद्भवत असल्याचे लोकसंख्या आणि आजाराबाबतच्या अभ्यासात आढळून आले आहे.माता आणि बालक यांच्या आरोग्याशी संबंधित मोठ्या प्रमाणात आर्थिक- सामाजिक तसेच आंतर राज्य असमानता आढळत असल्याचेही या पाहणीत नमूद करण्यात आले आहे. भारतात ५ वर्षाखालील बालकांमध्ये अतिसारामुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त असल्यामागे उघड्यावर शौच करण्याची प्रथा असल्याची जाणीव मोठ्या प्रमाणात झाली आहे. वारंवार अतिसाराची लागण होऊन अशक्त झालेली बालके कुपोषण, न्युमोनिया आणि वाढ खूरटणे याला बळी पडण्याची जास्त शक्यता असते. ग्रामीण भारतात, बालकांमधले विशेषत: समाजातल्या वंचित वर्गातल्या बालकांमधले कुपोषण ही साधारणपणे आढळणारी समस्या आहे. बालकांमधल्या कुपोषणाची समस्या कमी करण्यासाठी आणि पोषण संसाधनांची निर्मिती आणि चालना देण्यासाठी मंत्रालयाने पोषण अभियान सुरु केले आहे. भारतात माता आणि बालक पोषण विषयक सुधारणा घडवण्यासाठी पोषण उद्दिष्टाची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रालय तत्पर आहे. खुरटी वाढ,रक्त अल्पता,कमी वजनाची बालके, कुपोषण यांचे प्रमाण कमी करण्यासाठी मंत्रालय कसोशीने प्रयत्न करत आहे. नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, मंत्रालयाने समन्वय साधत, उत्तम देखरेख राखण्याची खातर जमा केली आहे. त्याच बरोबर वेळेत कृती करण्यासाठी जागृतही केले. आहे, राज्यांना आणि केंद्र शासित प्रदेशांना, प्रोत्साहन आणि मार्गदर्शनही केले आहे. गरोदर महिला आणि बालकांच्या पोषणाचे महत्व, आशा कार्यकर्त्या, एएनएम आणि आंगणवाडी सेविका जनतेपर्यंत पोहोचवत आहेत. तप्रधान, पेय जल आणि स्वच्छता मंत्रालयाच्या निर्देशानुसार,महिला आणि

---

**समाजात वर्तनात्मक बदल घडवून आणण्यात महिला सक्रीय भूमिका बजावू शकतात.बालकांच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांची महत्वाची भुमिका असते. संस्कृती, परंपरा आणि इतिहास एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमित करण्यात त्यांची महत्वाची भूमिका मानली जाते. बालकांच्या मनाच्या जडणघडणीला त्या आकार देतात. नवा जीव जन्माला घालण्याची सृजन क्षमता त्यांच्यात असते. त्याच बरोबर संस्कृती निर्माण क्षमताही त्यांच्याकडे असते.**

---

बाल विकास मंत्रालयाने स्वच्छता हाती घेतली असून यामध्ये सक्रीय संस्थेप्रमणे हे मंत्रालय काम करत आहे.स्वच्छता, महिला आणि बालकांच्या आरोग्याशी थेट निगडीत असून महिला आणि शिशु मृत्यूच्या समस्येशी संबंधित आहे. महिला आणि बालकांना स्वच्छता आणि सुरक्षित वातावरणाबाबत जागृत करून उत्तम आरोग्य आणि स्वच्छतेप्रती त्यांच्यात जाणीव रुजवण्यासाठी मंत्रालयाने महत्वाची भूमिका बजावली आहे.

समाजात वर्तनात्मक बदल घडवून आणण्यात महिला सक्रीय भूमिका बजावू शकतात.बालकांच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांची महत्वाची भुमिका असते. संस्कृती,परंपरा आणि इतिहास एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमित करण्यात त्यांची महत्वाची भूमिका मानली जाते. बालकांच्या मनाच्या जडणघडणीला त्या आकार देतात.नवा जीव जन्माला घालण्याची सृजन क्षमता त्यांच्यात असते. त्याच बरोबर संस्कृती निर्माण क्षमताही त्यांच्याकडे असते. म्हणूनच मंत्रालयाने माता आणि बालक या दोघांच्याही उत्तम आरोग्याची खातरजमा करण्यासाठी, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी व्यापक योगदान दिले आहे.

भारत सांस्कृतिक विविधतेचे आगळे दर्शन घडवत असून वेगवेगळ्या संस्कृती आणि विचारधारेचे लोक इथे सलोख्याने आणि शांततेने नांदतात. भारतीय समाजाच्या प्रत्येक भागात, प्रत्येक संस्कृतीत वेगवेगळ्या पुराणकथा, दंतकथा आहेत. अनेक नियम हे बऱ्याचदा महिलांसाठी असतात. त्यामुळे महिला आणि बालिका त्याचे लक्ष्य ठरतात. म्हणून भारतात खऱ्या अर्थाने धोरणात्मक उपाय योजनांची अंमलबजावणी करणे हे आव्हानात्मक आहे. विशाल लोकसंख्या, वैविध्यपूर्ण संस्कृती आणि विचार धारा त्यामुळे प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचणे हे मंत्रालयासाठी आव्हानच आहे. बाल आणि माता मृत्यू दर कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि महिला आणि बालकांना सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरण पुरवण्यासाठी, मंत्रालय, राज्य आणि जिल्हा पथकांमार्फत अथकपणे कार्य करत आहे.

■■■

*लेखक केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास मंत्रालयाचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy.wcd@nic.in*

# स्वच्छ भारत अभियान आणि केंद्रिय विद्यालये

**-संतोष कुमार माल**




**जोपर्यंत सर्वसामान्य जनता स्वच्छता मोहिमेत सहभागी होत नाही आणि स्वच्छतेला एका चळवळीच्या स्वरूपात आणत नाही तोपर्यंत सरकारने साकारलेल्या स्वच्छता मोहीमेचा अपेक्षित परिणाम दिसणार नाही. स्वच्छ भारत अभियानमध्ये प्रत्येकाने भाग घ्यावा म्हणून माननीय पंतप्रधानांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी आवाहन केले. आज खरोखरच सर्व वयोगटातून, आणि समाजाच्या सर्व थरातून स्वच्छ भारत अभियानमध्ये प्रचंड प्रमाणावर लोकसहभाग दिसून येत आहे. पंतप्रधानांनी साकारलेली कल्पना प्रत्यक्षात येताना दिसत आहे.**

मनुष्याला स्वत:चा विकास साधण्यासाठी भगवद्गीतेने ज्या मूल्यांची जपणूक करायला सांगितली आहे त्यातील एक मूल्य आहे - 'शौचम्' म्हणजे स्वच्छता. याचा उल्लेख भगवद्गीतेच्या १३व्या अध्यायात येतो. शौच राखल्यामुळे मन शुद्ध होते, समाधानाचा लाभ होतो, इंद्रीयांवर विजय मिळतो आणि आत्मसाक्षात्कारासाठी योग्यता येते. देहाला, मनाला आणि आत्म्याला सुस्थितीत राखण्यासाठी आपल्या समृद्ध संस्कृतीने आणि मूल्य संस्थेने अंतर्गत आणि बाह्य स्वच्छतेला अत्यंत महत्व दिले आहे. आपण ज्या भारतीय संस्कृतीत जन्माला आलो आणि वाढलो तिथे शुचिता हे देवत्वाचे लक्षण असल्याचे युगानुयुगे मानण्यात येते. नागरिकांच्या आरोग्यावरच देशाचे आरोग्य अवलंबून असते हे सत्य आहे. वैयक्तिक आरोग्य राखण्यासाठी स्वच्छता हा घटक सर्वात महत्वाच्या घटकांपैकी एक आहे हे ही तितकेच खरे आहे. जोपर्यंत सर्वसामान्य जनता स्वच्छता मोहिमेत सहभागी होत नाही आणि स्वच्छतेला एका चळवळीच्या स्वरूपात आणत नाही तोपर्यंत सरकारने साकारलेल्या स्वच्छता मोहीमेचा अपेक्षित परिणाम दिसणार नाही. स्वच्छ भारत अभियानमध्ये प्रत्येकाने भाग घ्यावा म्हणून माननीय पंतप्रधानांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी आवाहन केले. आज खरोखरच सर्व वयोगटातून, आणि समाजाच्या सर्व थरातून स्वच्छ भारत अभियानमध्ये प्रचंड प्रमाणावर लोकसहभाग दिसून येत आहे. पंतप्रधानांनी साकारलेली कल्पना प्रत्यक्षात येताना दिसत आहे.

काही उद्दिष्टांना भारतीय शिक्षण संस्थेमध्ये नेहमीच महत्वाचे मानण्यात आले आहे. व्यावसायिक स्थान निर्माण करण्यासोबतच मुलाच्या/मुलीच्या संपूर्ण क्षमतांचा विकास घडवून आणणे, सर्वांसोबत सुसंवाद ठेवत जीवनाकडे बघण्याचा समतोल दृष्टीकोन राखणे ही उद्दिष्टे त्यापैकी आहेत. समकालीन जगाशी जुळवून घेण्याच्या प्रक्रीयेसाठी शिक्षणाची मदत होते, इतकेच नाही तर भविष्यातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी शिक्षणामुळेच मुलाची तयारी होते. मुलाच्या जडणघडणीच्या काळात त्याला आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख करून दिली की त्याला त्याच्या मुळाशी सहज जोडता येते आणि सांस्कृतिक मूल्ये सहज आत्मसात होतात. कारण मूल्ये ही शिकवण्यासाठी नसून जगण्यासाठी असतात. कोवळ्या मनांना समाजासोबत सुदृढ आणि समतोल संबंध ठेवता आले पाहिजेत. यासाठी लहान मुलांना आजूबाजूच्या वातावरणाला विविध स्वरूपात सामोरे जाण्याचा अनुभव मिळाला पाहिजे. ही मूल्ये जिथे जगली जातात आणि जिथे ती आत्मसात करण्यासाठी उपलब्ध असतात तिथला अनुभव मुलांना मिळाला पाहिजे.

देशातल्या आणि परदेशातल्या १,१९० पेक्षा अधिक शाळा सहभागी असलेली संघटना म्हणजे केन्द्रीय विद्यालय संघटना (के.व्ही.एस्.) होय.





*१. (कार्यमग्न विद्यार्थी - केंद्रिय विद्यालय एफ्. आर्.आय्. डेहराडून)*

*२. श्री. संतोष कुमार माल, आयुक्त, के.व्ही.एस्. आणि श्रीमती चारू शर्मा, मुख्याध्यापिका केंद्रिय विद्यालय एफ्. आर्.आय्. डेहराडून – माननीय पंतप्रधानांकडून पुरस्कार स्विकारताना, सोबत उपस्थित – श्री. वेंकय्या नायडू, तत्कालीन शहर विकास मंत्री, भारत सरकार.)*

मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण यंत्रणेला ही संघटना गती देते. यामध्ये १ ली ते १२ वी पर्यंतच्या सर्व थरातल्या मुलांचा सहभाग आहे. यामध्ये मुलांचा सुदृढ आणि समतोल विकास व्हावा म्हणून त्यांना आपल्या समृद्ध मूल्य यंत्रणेशी जोडण्यावर भर देण्यात येतो. पदयात्रा, स्पर्धा, भारत स्काऊट आणि गाईड यासारख्या विविध कार्यक्रमांद्वारे लोक जागृती निर्माण करून समाजातल्या सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम के.व्ही.एस्. द्वारे राबविण्यात येतात. यामुळे स्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छता याविषयी लोकांमध्ये जाणीव जागृत करण्यात येते. स्वच्छ भारत चळवळीत विविध कार्यक्रमांद्वारे आणि विविध व्यासपीठावरून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि पालकांना के.व्ही. एस्. ने सहभागी करून घेतल्यामुळे मुलेच सामाजिक स्वच्छतेची दूत ठरली आहेत.

स्वच्छता अभियानाला के.व्ही. एस्. ने शालेय उपक्रमांचाच एक भाग बनविल्यामुळे मुलांसाठी स्वच्छता अभियान ही एक शैक्षणिक घटना बनली आहे.

- शालेय मानसिकतेमध्ये आता स्वच्छता रूजली आहे.

**पदयात्रा, स्पर्धा, भारत स्काऊट आणि गाईड यासारख्या विविध कार्यक्रमांद्वारे जन जागृती करून समाजातल्या सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम के.व्ही.एस्. द्वारे राबविण्यात येतात. यामुळे स्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छता याविषयी लोकांमध्ये जाणीव जागृत करण्यात येते. स्वच्छ भारत चळवळीत विविध कार्यक्रमांद्वारे आणि विविध व्यासपीठावरून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि पालकांना के.व्ही. एस्. ने सहभागी करून घेतल्यामुळे मुलेच सामाजिक स्वच्छतेची दूत ठरली आहेत.**

- अभ्यासक्रमाशी जोडल्यामुळे हा शाळेच्या दैनंदिन कार्यातलाच एक भाग झाला आहे. चित्रपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, नाटके, विविध अभियाने इत्यादी कार्यक्रम हे एकाच दिवसापुरते नाही तर नियमीत स्वरूपात शाळांमध्ये सुरू असतात.
- स्वच्छतेची कल्पना विद्यार्थी त्यांच्या कुटुंबापर्यंत आणि शेजाऱ्यांपर्यंत पोहोचवतात. यामुळे शाळेच्या अशा कार्यक्रमात समाजातल्या सर्वांची उपस्थिती दिसून येते. स्वच्छता अभियानातले विद्यार्थी फक्त त्यांच्या कुटुंबापुरतीच स्वच्छतेची जाणीव निर्माण करतात असे नसून ते समाजातही स्वच्छता दूत म्हणून काम करतात.
- केंद्रिय विद्यालय एफ्. आर्.आय्. डेहराडून या शाळेला वर्ष २०१६ चा सर्वाधिक स्वच्छ सरकारी शाळेसाठीचा 'राष्ट्रीय स्वच्छता पुरस्कार' माननीय पंतप्रधानांच्या हस्ते प्राप्त झाला.

केंद्रिय विद्यालयामध्ये 'स्वच्छ भारत' अभियान संपूर्ण बांधिलकीने चालविण्यात येत आहे. वर्ष २०१४ पूर्वी आमच्या शाळा जशा होत्या त्याच्या तुलनेत त्या आता जास्त स्वच्छ झाल्या आहेत, इतकेच नाही तर जास्त हिरव्यागारही झाल्या आहेत.

पर्यावरण साक्षरता वाढावी म्हणून साक्षरतेसोबतच वृक्ष लागवडीवरही के.व्ही.एस्. भर देत आहे.

- सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्वायरमेंट (सी. एस्. ई.) यांचा हरीत शाळा

कार्यक्रम (ग्रीन स्कूल प्रोग्रॅम, जी. एस्. पी.) आहे. सिद्धांत आणि पाठ्यपुस्तके यांच्या पलीकडे जाऊन शाळांनी 'प्रत्यक्ष कार्य' करण्यावर भर द्यावा म्हणून हा शैक्षणिक कार्यक्रम आखण्यात आला आहे.

- या कार्यक्रमांमध्ये शाळांना नैसर्गिक साधनसंपत्तीचा लेखाजोखा घेता येतो, पर्यावरण व्यवस्थापक म्हणून स्वत:ची भूमिका तपासण्यासाठी कार्यपद्धती पुरविण्यात येते आणि या लेखा परिक्षणातून ज्या कमतरता आढळतील त्या भरून काढायला मदत होते.
- ज्या शाळा अहवाल सादर करतात त्यांचे मानांकन करून कामगिरीनुसार त्यांना प्रमाणित करण्यात येते. शाळांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे प्रतिसाद देण्यात येतो.
- २०१५ पासून ऑनलाईन लेखापरिक्षणाला सुरवात झाली. तेव्हापासून यामध्ये नोंदणी करणाऱ्या शाळांच्या संख्येत सतत वाढ होत आहे.
- वर्ष २०१५ मध्ये ३२९ शाळांनी या कार्यक्रमासाठी नोंदणी केली, २०१६ मध्ये ७३६ शाळांनी आणि २०१७ मध्ये ८५८ शाळांनी नोंदणी केली.
- संपूर्ण भारतात एकूण ५४ हरीत शाळा आहेत. त्यामध्ये १८% केंद्रीय विद्यालये आहेत.
- दरवर्षी किमान एक तरी जी. एस. पी. पारितोषिक केन्द्रीय विद्यालयाला मिळते.
- के.व्ही. ओट्टापलम् आणि के.व्ही. पानगोडे या शाळांनी 'बदल घडवणारे' या श्रेणीत स्थान मिळवले आहे. (ही नवी आणि प्रतिष्ठीत श्रेणी असून भारतातल्या फक्त ४ शाळांना यात स्थान मिळाले आहे, त्यातील २ के.व्ही. आहेत.) पर्यावरणामध्ये आपला ठसा उमटवून महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्याचे निदर्शनाला आले की शाळांना या श्रेणीत स्थान मिळते. वर्ष २०१७-१८ साठी हरीत पुरस्कार मिळालेल्या या दोन शाळांचे योगदान याप्रमाणे आहे –

**केंद्रीय विद्यालय, आर्मी कॅन्टोनमेंट, पानगोडे, केरळ –**

- हरीत वेष्टन – शाळेचे ५० टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्रफळ हिरवेगार झाले आहे.
- हवा – शाळेच्या एकूण लोकसंख्येपैकी ७१ टक्के लोक वाहतुकीसाठी टिकाऊ पर्यायांचा वापर करतात. ८ टक्के लोक पायी चालणे, सायकलचा वापर करणे असे प्रदूषणरहीत पर्याय वापरतात.
- कचरा – शाळेतला कचरा शाळेच्या जैवइंधन प्रकल्पासाठी उपयोगात आणला जातो. यामुळे इंधनवायूचा पुरवठा नियमीत होण्याची खात्री होते. शाळेने आपल्या आवारात प्लॅस्टीकवर संपूर्ण बंदी आणली आहे.
- पाणी – विविध ठिकाणी चर खणून पावसाचे पाणी जमिनीत मुरवले जाते. काही पाणी शेजारच्या जंगलात वाहून जाऊ दिले जाते, तिथून ते करमणा नदीला मिळते.

**केंद्रीय विद्यालय ओट्टापलम्, केरळ –**

- ऊर्जा – एक वर्षाच्या कालावधीतल्या उर्जा बचतीची शाळेने नोंद केली आहे. शाळेच्या प्रशासकीय विभागासाठी सौर उर्जेचा वापर केला जातो. शाळेत जैव इंधन प्रकल्प उभारला आहे. ५० किलो कचरा साठवण्याची क्षमता असलेला हा प्रकल्प साधारणपणे १० किलो इंधनवायू निर्माण करतो.
- हवा – शाळेतील लोकसंख्येच्या फक्त १ टक्का लोक खाजगी वाहने वापरतात.
- कचरा – 'कमीत कमी कचरा करणे' या तत्वाचा शाळेत अवलंब केला जातो. प्राथमिक शाळेत कचऱ्यासाठी दोन वेगवेगळे डबे वापरण्याची पद्धत अवलंबली जाते. कचऱ्याचे वर्गीकरण करून जमा करण्यासाठी दररोज शेवटच्या तासातील पाच मिनीटे दिली जातात.
- पाणी – पावसाचे पाणी साठवण्यासाठीच्या जुन्या यंत्रणेचे नूतनीकरण केले आहे. जमिनीखाली टाकी बांधून त्यात पागोळ्यांचे पाणी जमा केले जाते. असे साठवलेले पाणी शाळेच्या शौचालयाच्या वापरासाठी, फरशी पुसण्यासाठी आणि बागकामासाठी वापरले जाते.

**आय्. जी.बी. सी. यांची हरीत शाळा स्पर्धा –**

- भारतीय हरीत रचना परिषदेतर्फे (इंडीयन ग्रीन बिल्डींग कौन्सिल - आय्. जी.बी. सी.) आयोजित स्पर्धांमध्ये के.व्ही.एस्. भाग घेतात. या स्पर्धेतल्या विजेत्यांना रोख पारितोषिके दिली जातात. प्रथम विजेत्याला ३.५ लाख रूपये, द्वितीय विजेत्याला २.५ लाख रूपये तर तृतीय विजेत्याला २ लाख रूपये देऊन पुरस्कृत केले जाते.

- के. व्ही. ए. एफ्. एस्. बेगमपेट या शाळेला वर्ष २०१५ मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले.
- वर्ष २०१६ मध्ये के. व्ही. सेक्टर - २ आर्. के. पुरम् या शाळेने देशातल्या ३०७ प्रतिस्पर्धी शाळांतून प्रथम क्रमांक पटकावला.
- के. व्ही. आय. आय. टी. कानपूरला वर्ष २०१७ मध्ये प्रथम पुरस्कार मिळाला.

स्वच्छता, शुद्धता, वैयक्तिक स्वच्छता आणि पर्यावरणाचे आरोग्य याबाबत व्यापक दृष्टीकोन यावा म्हणून के.व्ही.एस्. ने अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. हे कार्यक्रम शाळेच्या आवारात आणि शाळेबाहेर अशा दोन्ही ठिकाणी चालतात. सर्वांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी या कार्यक्रमांना शाळेच्या नियमीत कार्यक्रमांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. यातील काही महत्वाचे पुढाकार असे आहेत –

- कचरा टाकण्याच्या बाबतीत प्रत्येक शाळेमध्ये जाणीव निर्माण केली आहे. जो कचरा विघटनशील असेल तो शाळेच्याच आवारात खड्डे खणून जैव विघटनासाठी ठेवला जातो आणि त्यातून खत तयार करून शाळेच्या बागेसाठी वापरले जाते.
- अन्न वाया जाऊ नये याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण केली आहे. उरलेले अन्नपदार्थ निश्चित केलेल्या जागीच टाकले जातात.
- मुलींच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबत विशेष काळजी घेतली जाते. स्वच्छता आणि आरोग्य याविषयी सर्वांसाठी तज्ज्ञांची सत्रे आयोजित केली जातात.
- प्लॅस्टीकचा वापर कमीतकमी केला जातो. काही शाळा प्लॅस्टीकमुक्तही झाल्या आहेत.
- ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी वापरून झालेली पुस्तके कनिष्ठ विद्यार्थ्यांना भेट द्यावीत म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले जाते. यामुळे दोन लाभ होतात. आपले पुस्तक दुसरा वापरणार आहे हे लक्षात आल्यावर पुस्तके व्यवस्थित वापरली जातात आणि स्वच्छ ठेवली जातात. पुस्तकांची मागणी कमी झाल्याने झाडे वाचतात.

**पारंपारीक उर्जेवरचे अवलंबन कमी करून ऊर्जा वाचवली जाते. या कामाच्या पहिल्या टप्प्यात २७३ के.व्ही. एस्. मध्ये सौर यंत्रणा बसविण्यात आली आहे. दिल्ली, बिहार, आसाम, त्रिपुरा, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. दिल्लीमधील १२ के.व्ही. मध्ये सौर पॅनल बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. के.व्ही.एस्. मध्ये आतापर्यंत ५४,४१९ पारंपारीक बल्ब / ट्यूब लाईट बदलून एल्. ई. डी. लाईट लावले आहेत. तसेच ९४८ सौर दिवे बसविण्यात आले आहेत.**

- वर्ष २०१६-१७ मध्ये ज्येष्ठ वर्गातल्या विद्यार्थ्यांनी २,५८,३८५ पुस्तके कनिष्ठ वर्गातल्या विद्यार्थ्यांना आणि ग्रंथालयाला दिली. यामुळे जवळपास ५१.६७७ टन कागद वाचला आणि पर्यायाने ८७४ झाडे वाचली.
- वर्ष २०१७-१८ मध्येही हे अभियान चालू राहिले. यावर्षी विद्यार्थ्यांनी ५,०४,६७९ पुस्तके भेट दिली. त्यामुळे १००.९३५ टन कागद वाचला आणि १७१६ झाडे वाचली.
- वाढदिवसाला वृक्षारोपण करण्यासाठी मुलांना प्रवृत्त केले जाते. शाळेत येणाऱ्या पाहुण्यांनाही पुष्पगुच्छ किंवा फुले भेट देण्यापेक्षा रोपे भेट दिली जातात.
- मुलांमधून उत्तम नागरीक घडावे या हेतूने त्यांनी उर्जा बचत करावी म्हणून प्रयत्न केले जातात. याही उपक्रमाला गती मिळत आहे.
- शाळेतल्या खोल्या वापरात नसतील तेव्हा दिवे आणि पंखे बंद करायची सवय मुलांना लागली आहे.
- पारंपारीक उर्जेवरचे अवलंबन कमी करून ऊर्जा वाचवली जाते. या कामाच्या पहिल्या टप्प्यात २७३ के.व्ही. एस्. मध्ये सौर यंत्रणा बसविण्यात आली आहे.. दिल्ली, बिहार, आसाम, त्रिपुरा, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. दिल्लीमधील १२ के.व्ही. मध्ये सौर पॅनल बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. के.व्ही.एस्. मध्ये आतापर्यंत ५४,४१९ पारंपारीक बल्ब / ट्यूब लाईट बदलून एल्. ई. डी. लाईट लावले आहेत. तसेच ९४८ सौर दिवे बसविण्यात आले आहेत. ही प्रक्रीया सुरूच आहे.
- पावसाचे पाणी साठविण्यासाठीची प्रक्रीया सुद्धा सध्याच्या शाळांच्या इमारतीत सुरू आहे. शाळेच्या एकूण ७५५ कायमस्वरूपी इमारतींपैकी २३१ इमारतीत ही यंत्रणा विकसित केली आहे. उरलेल्या इमारतीत हे काम सुरू आहे. नवीन बांधल्या जाणाऱ्या सर्व शाळांच्या इमारतीत पावसाचे पाणी साठविण्यासाठी आवश्यक सुविधा देण्यात येत आहे.






*(स्वच्छ शौचालय मोहीम – भिंतीवरील कलानिर्मीती – केंद्रिय विद्यालय. - ए.एफ्.एस्. बोरझार, आसाम)*

गेल्या चार वर्षात के.व्ही.एस्. ने 'स्वच्छता अभियाना' अंतर्गत आयोजित केलेले महत्त्वाचे कार्यक्रम खाली दिले आहेत –

- के.व्ही.एस्. च्या सर्व विद्यार्थ्यांना, कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना 'स्वच्छता प्रतिज्ञा' देणे.
- शाळेचे आवार आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे.
- स्वच्छतेविषयी नामांकित व्यक्तींची स्फूर्तीदायक व्याख्याने आयोजित करणे.
- सकाळच्या सभेत वैयक्तिक स्वच्छतेची तपासणी करणे, त्याबद्दल प्रोत्साहन देणे.
- शाळेतील शौचालये स्वच्छ रहावीत तसेच विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून विशेष मोहिम चालविणे.
- शाळांमध्ये, मुख्यालयात आणि आर्. ओ. मध्ये 'स्वच्छता पंधरवडा' पाळणे.
- केंद्रीय विद्यालयात स्वच्छ आणि हरीत पर्यावरणावर भर देण्यासाठी, वर्ष २०१६-१७ पासून विभागीय पातळीवर 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार' सुरू केले. यामध्ये फिरते चषक आणि रोख रक्कम देण्यात येते.
- शुद्धतेबाबत प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- धरा दिन साजरा करणे, वातावरण बदलाबाबत कार्यक्रमात सहभागी होणे.
- स्वच्छता – याविषयावर चित्रे काढण्याची आणि रंगविण्याची स्पर्धा आयोजित करणे.
- 'हरीत दिवाळी, स्वच्छ दिवाळी' मोहिम राबविणे.
- १५ सप्टेंबर २०१८ पासून सुरू झालेल्या 'स्वच्छता हीच सेवा' या मोहिमेतल्या सर्व पातळ्यांवर लोक सहभाग घेणे.

के.व्ही.एस्. शी संलग्न सर्वांना बरोबर घेऊन स्वच्छता अभियानाची मोहिम के.व्ही.एस्. पुढे नेत आहे. एखादा दिवस किंवा आठवडाभर साजरा केला आणि संपला असा हा कार्यक्रम नाही. ही कायम सुरू राहणारी प्रक्रीया आहे. संपूर्ण कार्यक्रमाला शाळांच्या यंत्रणेत समाविष्ट केलेले आहे आणि आता रोजच्या व्यवहाराचा तो एक भाग झाला आहे. मुलांच्या जडण घडणीच्या काळात त्यांना विविध कार्यक्रमात / कार्यात सहभागी करून घेऊन स्वच्छतेचा गुण त्यांच्या अंगी बाणवण्यात येत आहे. यामुळे त्यांच्या मनावर कायमस्वरूपी संस्कार घडणार आहे आणि त्यामुळेच ती खऱ्या अर्थाने स्वच्छता दूत होणार आहेत.

■■■

*लेखक भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असून केंद्रिय विद्यालय संघटनेचे आयुक्त आहेत.*

*ई मेल: skmall1973@gmail.com*

# भारतीय रेल्वेच्या स्वच्छतेत सुधारणा

- आलोककुमार तिवारी



**२ ऑक्टोबर २०१९ पर्यंत स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने २ ऑक्टोबर २०१४ रोजी, महात्मा गांधीजींच्या १४५ व्या जयंतीनिमित्त "स्वच्छ भारत अभियान" या राष्ट्रीय स्तरावरील मोहिमेचा औपचारिक शुभारंभ केला. या राष्ट्रीय स्तरावरील मोहिमेला अनुसरून, रेल्वे मंत्रालयाने रेल्वे स्थानकांचा परिसर आणि रेल्वेगाड्यांमधील स्वच्छतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने "स्वच्छ रेल, स्वच्छ भारत" मोहिमेचा शुभारंभ केला.**

मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीसाठी रेल्वेने प्रवास करणे, हा एक सर्वात जास्त किफायतशीर आणि पर्यावरणस्नेही असा पर्याय आहे. सातत्याने वाढती लोकसंख्या आणि प्रादेशिक परिणाम लक्षात घेतही भारतीय रेल्वे नेहमीच पर्यावरणाला किमान हानी पोहोचविणाऱ्या उपाययोजनांप्रति वचनबद्ध राहिली आहे.

२ ऑक्टोबर २०१९ पर्यंत स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने २ ऑक्टोबर २०१४ रोजी, महात्मा गांधीजींच्या १४५ व्या जयंतीनिमित्त "स्वच्छ भारत अभियान" या राष्ट्रीय स्तरावरील मोहिमेचा औपचारिक शुभारंभ केला. या राष्ट्रीय स्तरावरील मोहिमेला अनुसरून, रेल्वे मंत्रालयाने रेल्वे स्थानकांचा परिसर आणि रेल्वेगाड्यांमधील स्वच्छतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने "स्वच्छ रेल, स्वच्छ भारत" मोहिमेचा शुभारंभ केला.

भारतीय रेल्वेची ८७०० रेल्वे स्थानके असून त्यावरून दिवसाला सरासरी १३००० रेल्वेगाड्या धावतात. सततची वर्दळ/अत्यंत गर्दी, बेसुमार वापर, रेल्वे प्रवास करणाऱ्या आणि विशेषत: महत्वाच्या स्थानकांवर दीर्घकाळ रेंगाळणाऱ्या प्रवाशांच्या सवयी अशा सर्व घटकांमुळे ही स्थानके आणि रेल्वेगाड्यांची स्वच्छता कायम राखणे आणि त्यात सुधारणा करणे, हे प्रचंड मोठे काम आहे.

"स्वच्छ रेल, स्वच्छ भारत" अभियानांतर्गत रेल्वे मंत्रालयाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत, ज्यात पुढील बाबींचा समावेश आहे, मात्र स्वच्छतेसाठीचे प्रयत्न त्यापुरते मर्यादित नाहीत. : (१) सर्व महत्वाच्या स्थानकांवर स्वच्छतेचे काम आउटसोर्स करणे; (२) यंत्राद्वारे स्वच्छता करणे शक्य व्हावे यासाठी फलाटावरील फरशीचा दर्जा सुधारणे; (३) वेगवेगळ्या प्रकारच्या कचऱ्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कचऱ्याचे डबे पुरवणे; (४) स्वच्छतेशी संबंधित कामांवर देखरेख ठेवण्यासाठी CCTV ची सोय करणे; (५) प्रवासी डब्यांमध्ये बायो-टॉयलेट्सची सोय करणे; (६) ग्राहकांचा अभिप्राय प्राप्त करण्यासाठी "ग्राहक तक्रार" निवारणार्थ वेब पोर्टल आणि मोबाइल अँप्लीकेशन विकसित करणे; (७) विविध स्थानकांवर सशुल्क प्रसाधनगृहांची सोय करणे; (८) प्रवासादरम्यान स्वच्छतेची सेवा (OBHS) प्रदान करणे , नामनिर्देशित रेल्वेगाड्यांमध्ये क्लीन माय कोच आणि कोच मित्र सेवा प्रदान करणे; (९) ट्वीटरच्या माध्यमातून पहिली २४ तास सक्रिय अशी लोक तक्रार निवारण यंत्रणा सुरू करणे आणि प्रवाशांसाठी वैद्यकीय, सुरक्षा आणि इतर आपत्कालीन सहाय्य प्रदान करण्याची तरतूद करणे.

लांब पल्ल्याच्या काही निवडक रेल्वेगाड्यांमध्ये 'Clean Train Station' (CTS) अर्थात क्लीन ट्रेन स्टेशन अंतर्गत प्रवासाच्या काही थांब्यांदरम्यान यंत्रांद्वारे साफसफाई केली




*झाशी स्थानकावरील फलाट आणि प्रवेशद्वाराचे दृश्य*

जाते. आतापर्यंत भारतीय रेल्वेमार्गावर अशा प्रकारे ३९ CTS सक्रिय आहेत.

त्याचबरोबर रेल्वे गाड्या आणि रेल्वेस्थानकांवरील स्वच्छतेच्या मानकांमध्ये महत्वपूर्ण आणि शाश्वत सुधारणा घडवून आणण्याच्या एकमेव उद्देशाने, भारतीय रेल्वेने प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वच्छता मोहिमा हाती घेतल्या.

महत्वपूर्ण स्थानकांवरील स्वच्छतेच्या प्रयत्नांचे मूल्यांकन करण्यासाठी अशा महत्वाच्या ४०७ स्थानकांवर ठराविक कालावधीनंतर स्वच्छता निर्देशकांसंदर्भात तृतीय पक्षामार्फत सर्वेक्षण केले जाते. स्वच्छतेच्या मानकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी करायच्या उपाययोजनांबाबतची मार्गदर्शक तत्वे, या सर्वेक्षण अहवालात समाविष्ट असतात.

सेवा कंत्राटांसाठीच्या प्रक्रियेत सुधारणा करताना, खुल्या, पारदर्शक, योग्य आणि स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून सक्षम संस्थेची निवड करण्याच्या यंत्रणेला प्राधान्य देण्यात आले आहे. यंत्रांमार्फत आणि दर्जेदार साहित्याचा वापर करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वाच्या स्थानकांवर एकात्मिक देखभाल सेवा कंत्राटे बहाल करण्यात आली आहेत.

**महत्वपूर्ण स्थानकांवरील स्वच्छतेच्या प्रयत्नांचे मूल्यांकन करण्यासाठी अशा महत्वाच्या ४०७ स्थानकांवर ठराविक कालावधीनंतर स्वच्छता निर्देशकांसंदर्भात तृतीय पक्षामार्फत सर्वेक्षण केले जाते. स्वच्छतेच्या मानकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी करायच्या उपाययोजनांबाबतची मार्गदर्शक तत्वे, या सर्वेक्षण अहवालात समाविष्ट असतात.**

सेवा कंत्राटांची अंमलबजावणी करताना विविध परिस्थितींमध्ये विभागिय रेल्वेला मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय रेल्वेने सेवा कंत्राटासाठीच्या General Conditions of Contracts (GCC) अर्थात कंत्राटाच्या सर्वसाधारण अटी सादर केल्या आहेत. यापूर्वीही कामाच्या कंत्राटांसाठी GCC अर्थात कंत्राटाच्या सर्वसाधारण अटी, सेवा कंत्राट करताना अस्तित्वात होत्या. मात्र मालमत्तांची निर्मिती/देखभाल करण्यासाठी त्यात वेगळ्या अटींवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते, त्यामुळे सेवा कंत्राटासमोरची आव्हाने सोडविण्यासाठी ती पुरेशी ठरत नव्हती.

स्थानकांच्या देखभालीसाठी जारी करण्यात आलेल्या नव्या प्रमाणित निविदा दस्तावेजात 'उपभोग्य वस्तू आणि यंत्रांचा वापराचा आणि दर्जाचा प्रकार' या भागाला कंत्राटदाराच्या कामगिरीच्या मूल्यमापनात १० टक्के महत्व देण्यात आले असून, ते मासिक देयकाशी जोडण्यात आले आहे.

टू पॅकेट निविदा यंत्रणेचा अवलंब केला जातो आहे. किमान पात्रतेच्या निकषांबरोबरच तांत्रिक मूल्यांकन स्तरावर किमान ७० टक्के गुण प्राप्त करणारे बोलीदारच वित्तीय निविदा उघडण्याच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरू शकतात. देखभाल कंत्राटांच्या अंमलबजावणीत मनुष्यबळाशी संबंधित उद्भवणाऱ्या नियमित समस्या सोडविण्याच्या दृष्टीने बायो-मेट्रिक उपस्थिती, वापरकर्त्यांच्या अभिप्रायाशी वेतन लिंक करणे तसेच किमान मजुरी निर्धारित करण्यासाठी दर फरकाच्या अटी अशा तरतूदी करण्यात आल्या आहेत. या प्रमाणित निविदा दस्तावेजानुसार विभागिय रेल्वेने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. सेवांची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण करण्यात आले आहे. यानंतरही स्वच्छतेसंदर्भात तक्रारी/असमाधानकारक काम आढळून आल्यास, कंत्राटाच्या अटींनुसार अशा तक्रारींची दखल घेऊन कंत्राटदाराला दंड ठोठावून आवश्यक कारवाई केली जाईल.




रेल्वे स्थानकांवर अतिरिक्त सशुल्क शौचालयेही उभारण्यात आली आहेत. भारतीय रेल्वे (रेल्वे परिसरात स्वच्छतेला बाधा आणणाऱ्या कारवायांसाठी दंड) नियम २०१२ ची अंमलबजावणी अधिक कठोर करण्यात आली. महत्वाच्या स्थानकांवर स्वच्छताविषयक कामांवर देखरेख ठेवण्यासाठी CCTV चा वापर वाढविण्यात आला.

विभागीय रेल्वेमार्फत विविध रेल्वेस्थानकांवर आलटून पालटून साप्ताहिक स्वच्छता मोहिमा हाती घेतल्या जात आहेत. रेल्वेच्या विविध कार्यक्षेत्रांशी संबंधित स्वच्छतेवर भर देण्याच्या उद्देशाने संकल्पनांवर आधारित स्वच्छता मोहिमा वेळोवेळी राबविल्या जात आहेत. स्वयंसेवी संस्थांसह धर्मादाय संस्था/सामाजिक संघटनाही स्वच्छताविषयक जनजागृती मोहिमांशी जोडलेल्या आहेत. सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया तसेच सार्वजनिक घोषणांच्या आधारे रेल्वेच्या वापरकर्त्यांमध्ये स्वच्छताविषयक जनजागृती केली जात आहे. २०१७-१८ या वर्षात बायो टॉयलेटसह स्वच्छता आणि साफसफाईसाठी २५२२ कोटी रूपयांची रक्कम खर्च करण्यात आली.

**रेल्वेच्या विविध कार्यक्षेत्रांशी संबंधित स्वच्छतेवर भर देण्याच्या उद्देशाने संकल्पनांवर आधारित स्वच्छता मोहिमा वेळोवेळी राबविल्या जात आहेत. स्वयंसेवी संस्थांसह धर्मादाय संस्था/सामाजिक संघटनाही स्वच्छताविषयक जनजागृती मोहिमांशी जोडलेल्या आहेत. सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया तसेच सार्वजनिक घोषणांच्या आधारे रेल्वेच्या वापरकर्त्यांमध्ये स्वच्छताविषयक जनजागृती केली जात आहे. २०१७-१८ या वर्षात बायो टॉयलेटसह स्वच्छता आणि साफसफाईसाठी २५२२ कोटी रूपयांची रक्कम खर्च करण्यात आली.**

या मोहिमेत ग्राहकांना प्रभावीपणे सामावून घेण्याच्या उद्देशाने भारतीय रेल्वेने @ RailMinIndia हे ट्वीटर हँडल आणि "Ministry of Railways - India" हे फेसबुक पेज तसेच सर्व विभागिय रेल्वे व्यवस्थापकांची आणि भारतीय रेल्वेच्या महाव्यवस्थापकांची ट्वीटर हँडल्स सुरू केली आहेत. या मंचांवर प्रवाशांच्या समस्या तातडीने सोडवल्या जात असल्या कारणाने ही यंत्रणा अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसत आहे.

प्रवाशांनाही सोशल मिडियाचे सामर्थ्य कळू लागले आहे आणि आता ते आपल्या समस्या सोडविण्यासाठी तसेच आपल्या विचारणांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी इमाने इतबारे ट्वीटर आणि फेसबुकचा वापर करू लागले आहेत. रेल्वेने प्रवास करणारा कोणताही प्रवासी सहाय्यासाठी तात्काळ रेल्वेशी संपर्क साधू शकतो. ही सुविधा यापूर्वी उपलब्ध नव्हती.

प्रवाशांसोबतची ही परस्पर संवाद प्रक्रिया पुढील प्रकारे काम करते -

- अधिकारी या सोशल मिडियावरील ट्वीट/पोस्ट पाहतात आणि संबंधित प्राधिकरणाला टॅग करतात. (उदा. क्षेत्र/विभाग/रेल्वे मंडळ संचालनालय).
- विभागाकडे ट्वीट/पोस्ट पोहोचल्यानंतर संबंधित शाखा अधिकारी आवश्यक मदत/सहाय्य पुरविण्याच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करतात आणि प्रवाशांची समस्या सोडवतात. समस्येचे निराकरण करण्यात आल्यानंतर अधिकारी तक्रारीच्या सद्यस्थितीबाबत ट्वीट करतात.
- रेल्वेचे डबे आणि स्थानकांवरील स्वच्छता तसेच साफसफाई संदर्भातील ट्वीट/पोस्टची दखल वरील यंत्रणेच्या माध्यमातून तातडीने घेतली जाईल.
- अशा तक्रारी ट्वीटरवरून फॉरवर्ड करण्याबरोबरच "Clean My Coach" (या यंत्रणेत प्रवासी आपल्या आसनाच्या स्वच्छतेसंदर्भातील तक्रारीची नोंदणी करण्यासाठी ५८८८८ या क्रमांकावर आपला पीएनआर क्रमांक एसएमएस द्वारे पाठवू शकतात.) या आधिपासून अस्तित्वात असलेल्या यंत्रणेबद्दल

तसेच १३८ या हेल्पलाईन क्रमांकाबद्दल माहिती दिली जाते.

याचबरोबर वापरकर्त्यांना आपल्या तक्रारींची नोंदणी करता यावी, यासाठी ऑनलाईन तक्रार व्यवस्थापन यंत्रणाही कार्यरत आहे.

२५.०९.१६ रोजी भारत सरकारने उघड्यावरील शौचाविरुद्ध सुरू केलेल्या मोहिमेमध्ये रेल्वेने सक्रिय पाठिंबा दर्शविला तसेच सहभागही नोंदवला. भारतीय रेल्वे तसेच संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने (DRDO) संयुक्तपणे बायो टॉयलेट तंत्रज्ञान विकसित केले. पर्यावरणस्नेही, कमी खर्चातील आणि अत्याधुनिक असे हे तंत्रज्ञान, जगात कोणत्याही रेल्वेमध्ये वापरले गेलेले, अशा प्रकारचे पहिलेच तंत्रज्ञान आहे. या यंत्रणेत वापरण्यात आलेल्या सुक्ष्मजंतूंचा प्रभावीपणा डीआरडीओने विपरित हवामानात आणि सियाचीन सारख्या विपरित हवामान असणाऱ्या ठिकाणीही परीक्षण करून घेतलेला आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वात महत्त्वपूर्ण भाग म्हणजे या प्रक्रियेत वापरला जाणारे सुक्ष्मजंतू मानवी मलमूत्राचे रूपांतर पाणी आणि बायोगॅसमध्ये (मुख्यत: मिथेन $CH_4$ आणि कार्बन डाय ऑक्साइड $CO_2$) केले जाते. वायू वातावरणात विरून जातात आणि सांडपाणी प्रक्रियेनंतर रेल्वेच्या रुळांवर सोडले जाते. त्यामुळे मानवी मलमूत्र रेल्वेच्या रुळांवर पडत नाही, परिणामी स्थानकांचा परिसर आणि रेल्वेचे रूळ स्वच्छ राहतात. बायो टॉयलेटचा गैरवापर टाळण्यासाठी प्रवाशांना बायो टॉयलेट कशाप्रकारे वापरावे, काय करावे आणि काय करू नये, याबाबत साक्षर करण्यासाठी विभागीय रेल्वेमार्फत सातत्याने कार्यक्रम राबविले जातात. त्याअंतर्गत रेल्वेगाड्यांच्या डब्यांच्या शौचालयात स्टिकर लावणे, श्राव्य आणि दृक् श्राव्य माध्यमांच्या वापरातून तसेच प्रतिकृतीच्या माध्यमातून बायो टॉयलेटच्या वापराबाबत जनजागृती केली जाते.

जानेवारी २०११ मध्ये ग्वाल्हेर-वाराणसी-बुंदेलखंड एक्सप्रेस या रेल्वेगाडीमध्ये पहिल्यांदा भारतीय रेल्वे तसेच संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने DRDO ने विकसित केलेल्या या बायो टॉयलेटचा पहिल्यांदा वापर करण्यात आला. सकारात्मक अभिप्राय मिळाल्यानंतर चाचणी तत्त्वावर आणखी काही रेल्वेच्या डब्यांमध्ये बायो टॉयलेट बसवण्यात आले. २०१४ सालापासून रेल्वेगाड्यांच्या डब्यांमध्ये बायो टॉयलेट लावण्याचे प्रमाण सातत्याने वाढले आहे.

**२०१४ सालापासून रेल्वेगाड्यांच्या डब्यांमध्ये बायो टॉयलेट लावण्याचे प्रमाण सातत्याने वाढले आहे. मार्च २०१९ पर्यंत लांब पल्ल्याच्या सर्व रेल्वेगाड्यांमध्ये बायो टॉयलेट लावण्याचे नियोजन आहे. भारतीय रेल्वेमार्गावरील २७ विभाग ग्रीन ट्रेन कॉरिडोर म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या मार्गावर धावणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांमध्ये १००% बायो टॉयलेटचा वापर करण्यात आल्यामुळे रेल्वे गाड्यांमधून मानवी मलमूत्रामुळे होणारी अस्वच्छता पूर्णपणे थांबली आहे.**

मार्च २०१९ पर्यंत लांब पल्ल्याच्या सर्व रेल्वेगाड्यांमध्ये बायो टॉयलेट लावण्याचे नियोजन आहे. भारतीय रेल्वेमार्गावरील २७ विभाग ग्रीन ट्रेन कॉरिडोर म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या मार्गावर धावणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांमध्ये १००% बायो टॉयलेटचा वापर करण्यात आल्यामुळे रेल्वे गाड्यांमधून मानवी मलमूत्रामुळे होणारी अस्वच्छता पूर्णपणे थांबली आहे.



स्वच्छ आणि प्रभावी शौचालये पुरविण्याबरोबरच शौचालयांमध्ये पाण्याचा अपव्यय टाळण्याच्या उद्देशाने भारतीय रेल्वे बायो व्हॅक्यूम शौचालयांचीही चाचणी घेत आहे. यात प्रवाशांसाठी विमानांच्या धर्तीवर व्हॅक्यूम शौचालयांची तरतूद करण्यात आली असून डब्याच्या खालच्या भागात बायो-डायजेस्टर टँक बसविण्यात आली आहे. प्रवासादरम्यान या बायो-डायजेस्टर टँकमधील मानवी मलमूत्राचे विघटन होते.

रेल्वे स्थानकांवर एकात्मिक यांत्रिक स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, १००० पेक्षा जास्त रेल्वेगाड्यांमध्ये प्रवासादरम्यान स्वच्छता सेवा प्रदान करण्यात आली आहे, वातानुकुलीत डब्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या कपड्यांच्या धुलाईचा दर्जा सुधारण्याच्या हेतूने यांत्रिक धुलाईची सोय करण्यात आली आहे.

घन कचरा व्यवस्थापन या आणखी एका महत्वाच्या बाबतीत दृष्यमान बदल घडवून आणले गेले. घन कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी कचऱ्याचे विघटनशील कचरा (ओला कचरा), अविघटनशील कचरा (सुका कचरा) आणि धोकादायक कचरा अशा तीन प्रकारात वर्गिकरण करणे आवश्यक होते. रेल्वेने रेल्वे टर्मिनल परिसरात जमा होणाऱ्या अशा घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचऱ्यापासून विज निर्मितीसह, पर्यावरण सुसंगत पद्धतीने प्रायोगिक तत्वावर प्रकल्प हाती घेतले. जयपूर आणि नवी दिल्लीमध्ये ही प्रायोगिक तत्वावरील संयंत्रे उभारण्यात आली जेथे बायो-मिथेनेशन प्रक्रियेच्या माध्यमातून विघटनशील कचऱ्यापासून वीजनिर्मिती केली जाईल. या संयंत्रांपासून प्राप्त विजेचा वापर नजीकच्या स्थानकांवर आवश्यक कामांसाठी केला जाईल.

२०१६ साली पहिल्यांदाच स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत रेल्वे स्थानकांच्या (A1 आणि A प्रवर्गातील ४०७ स्थानकांचे) स्वच्छतेचे परिक्षण करण्यात आले. २०१७ आणि २०१८ साली पुन्हा हे सर्वेक्षण करण्यात आले. २१० महत्वाच्या रेल्वेगाड्यांच्या स्वच्छतेच्या क्रमवारीसंदर्भातील असेच आणखी एक सर्वेक्षण लवकरच पूर्ण होईल.

स्वच्छ रेल - स्वच्छ भारत - २०१८ मूल्यांकनामुळे रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेमध्ये कमालीचा प्रगती दिसून आली आहे. हे निश्चितपणे रेल्वे अधिकारी आणि प्रवाशांच्या संयुक्त प्रयत्नांचेच फलित आहे. प्रवाशांच्या वर्तनात झालेल्या या बदलामुळेच आपण स्वच्छ भारताच्या स्वप्नपूर्तीच्या आणखी जवळ पोहोचलो आहोत. A1 आणि A प्रवर्गातील ४०७ स्थानकांच्या समग्र स्वच्छतेच्या प्रमाणात, २०१७ च्या तुलनेत १७.६% सुधारणा झाली आहे. या यशोगाथेमागील स्वच्छतेच्या कामगिरीतील महत्वाच्या क्षेत्रातील यश पुढीलप्रमाणे -

१) बॉटल क्रशिंग मशीनमुळे प्लास्टीक कचऱ्याच्या प्रमाणात घट.

२) सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीनमुळे रेल्वे स्थानकांवर वैयक्तिक स्वच्छता.

३) महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर स्वच्छतेसाठी आउटसोर्सिंग.

४) शाळा, खाजगी संस्था आणि समुदायांमार्फत जनजागृती मोहिमा.

**रेल्वेने रेल्वे टर्मिनल परिसरात जमा होणाऱ्या अशा घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचऱ्यापासून विज निर्मितीसह, पर्यावरण सुसंगत पद्धतीने प्रायोगिक तत्वावर प्रकल्प हाती घेतले. जयपूर आणि नवी दिल्लीमध्ये ही प्रायोगिक तत्वावरील संयंत्रे उभारण्यात आली जेथे बायो-मिथेनेशन प्रक्रियेच्या माध्यमातून विघटनशील कचऱ्यापासून वीजनिर्मिती केली जाईल. या संयंत्रांपासून प्राप्त विजेचा वापर नजीकच्या स्थानकांवर आवश्यक कामांसाठी केला जाईल.**

रेल्वेच्या डब्यांमधील झुरळांचे निर्मूलन करण्यासाठी प्राधिकृत आणि मान्यताप्राप्त संस्थांमार्फत खालील वेळापत्रकानुसार रेल्वेच्या डब्यांचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्यात येते:

- वातानुकुलित डबे आणि पँन्ट्री कार: १५ दिवसांतून एकदा.
- आरक्षित बिगर वातानुकुलित डबे: ३० दिवसांतून एकदा.
- अनारक्षित बिगर वातानुकुलित डबे : ६० दिवसांतून एकदा.

आपल्या प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी प्रवास उपलब्ध करून देण्याप्रति आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांची रेल्वेला पूर्ण जाणीव आहे. या कामी वापरकर्त्यांचे सक्रिय सहाय्य आवश्यक आहे. या सुविधांची अयोग्य हाताळणी आणि गैरवापर होत असल्याचे अहवालही प्राप्त झाले आहेत. सर्व सुविधा योग्य प्रकारे प्रदान करण्याचे प्रयत्न सर्वतोपरी सुरू असले तरी त्याकामी खूप प्रयास आणि पैशांची आवश्यकता असते. त्यादृष्टीने रेल्वे प्रयत्नशील असून "स्वच्छ रेल, स्वच्छ भारत" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व भागधारकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा करत आहे.

■■■

*लेखक रेल्वे बोर्डाचे मुख्य कार्यकारी संचालक (पर्यावरण आणि स्वच्छता व्यवस्थापन) आहेत.*

*इमेल: alok_tewari60@hotmail.com*

आगामी अंक

डिसेंबर २०१८

'डिजीटल भारत'

# महाराष्ट्राची ग्रामीण स्वच्छता - लोकचळवळीचे उत्तम उदाहरण

**- बबनराव लोणीकर**



**१५ सप्टेंबर, २०१७ ते २ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत 'स्वच्छता हि सेवा' हे देशव्यापी अभियान राबविले गेले. या अभियानात स्वच्छतेच्या कामाविषयी विविध उपक्रमांची स्पर्धासुद्धा आयोजित करण्यात आली होती. वैयक्तिक शौचालयांची उभारणी, अभियानामध्ये व्यापक लोकसहभाग, नाविण्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन या मुद्दयांच्या आधारे केंद्र सरकारने सर्व राज्यांचे मुल्यांकन केल्यानंतर महाराष्ट्र हे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून घोषित केले गेले होते.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने भारतात पहिल्यांदा स्वच्छता आणि उघडयावर शौचविधी प्रथा बंद या विषयाला राष्ट्रीय मिशनचे स्वरूप देण्यात आले. स्वच्छतेसारख्या विषयावर बोलणे जेथे अप्रिय आणि घृणास्पद समजले जात होते, अशा स्वच्छतेला मा. पंतप्रधानांच्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे देशस्तरावर प्रथम प्राधान्य देऊन, एक शाश्वत चळवळ निर्माण करणे शक्य झाले आहे. ऐतिहासिक लाल किल्ल्यावरून देशवासियांना केलेले आव्हान असेल किंवा न्यूयॉर्क वरून केलेले संबोधन असेल, मा. पंतप्रधानांनी एका दुर्लक्षित विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. स्वच्छतेसंबंधी मा. मोदीजींनी सुरू केलेले कार्य याबाबत आपण सर्वांनी त्यांचे आभार व्यक्त करायला हवे. मा. पंतप्रधानांनी पेटविलेल्या स्वच्छतेच्या या तेजस्वी मशालीला सकारात्मक प्रतिसाद देण्याची जबाबदारी महाराष्ट्राने प्राधान्याने स्वीकारली आहे.

महात्मा गांधी यांच्या १५० वी जयंती वर्ष सुरू होण्याच्या निमित्ताने नुकतेच स्वच्छता विषयावरचे विश्वव्यापी चर्चासत्र दिल्ली येथे पार पडले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रचे मा. मुख्यमंत्र्यांना वक्ता म्हणून निमंत्रित केले होते. हा महाराष्ट्रातील स्वच्छतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान होता. महाराष्ट्राने मा. पंतप्रधान यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत साधारण दीड वर्ष अगोदर राज्याची हागणदारीमुक्तिची घोषणा केली. राज्यात झालेले स्वच्छतेचे काम सर्व स्तरावरून पारखून घेतल्यानंतरच राज्याला विविध प्रसंगी पुरस्कार प्राप्त झाले.

### स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८

केंद्र सरकारच्या वतीने अलीकडेच स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ हा उपक्रम पार पडला. यामध्ये केंद्र सरकारने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये त्रयस्थ संस्था निवडून अगदी बारकाईने गाव स्तरावर सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात २ ऑक्टोबर २०१८ रोजी केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते मी विभागाच्या वतीने विशेष सन्मान स्वीकारला. महाराष्ट्रातील सातारा हा जिल्हा सर्वार्थाने देशातील प्रथम क्रमांकाचा स्वच्छ जिल्हा म्हणून निवडला गेला. मा. पंतप्रधंनाच्या हस्ते सातारा जिल्हा परिषदेचा याच दिवशी सन्मान झाला. याशिवाय मा. केंद्रीय मंत्री यांचे हस्ते नाशिक व सोलापूर जिल्हा परिषदेचाही नागरिकांचा प्रतिसाद या घटकात विशेष सन्मान झाला. भारतातील पहिल्या दहा जिल्ह्यात महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांनी स्थान मिळविले आहे.

### स्वच्छता ही सेवा

१५ सप्टेंबर, २०१७ ते २ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत 'स्वच्छता हि सेवा' हे देशव्यापी अभियान राबविले गेले. या अभियानात स्वच्छतेच्या कामाविषयी विविध उपक्रमांची स्पर्धासुद्धा आयोजित करण्यात आली होती. वैयक्तिक शौचालयांची उभारणी, अभियानामध्ये

व्यापक लोकसहभाग, नाविण्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन या मुद्दयांच्या आधारे केंद्र सरकारने सर्व राज्यांचे मुल्यांकन केल्यानंतर महाराष्ट्र हे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून घोषित केले गेले होते.

**स्वच्छता दर्पण**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांसाठी 'स्वच्छता दर्पण' या नावाने देशस्तरावर मुल्यांकन करुन जिल्हयांची क्रमवारी निश्चित केली गेली. यामध्ये देशस्तरावर प्रथम क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्रातील वर्धा, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्हयांचा ०२ ऑक्टोबर, २०१७ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे सन्मान करण्यात आला.

ही पुरस्काराची मालिका २०१४ ते २०१८ या काळात सुरूच राहिली आहे. अतिशय धडाडीने राज्यातील सर्व घटकांनी स्वच्छतेच्या चळवळीत सहभाग नोंदविला म्हणूनच महाराष्ट्राचा सन्मान सातत्याने होत आहे.

महाराष्ट्र हे नेहमीच पुरोगामी राज्य म्हणून ओळखले गेले आहे व समाजातून आलेल्या चांगल्या सूचनांचा येथे स्वीकार करण्यात आला आहे. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी महाराष्ट्रात स्वच्छतेविषयी मोठया प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांनी स्वच्छतेचा प्रचार व प्रसार करताना वेगवेगळया स्तरावर वेगवेगेळे प्रयोग करून, जनमानसाच्या मानसिकतेवर सकारात्मक परिणाम करून स्वच्छता रूजवण्याचा प्रयत्न केला म्हणून ते आजही प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवीत आहेत. संत तुकडोजी महाराजांनी तेव्हा गावांच्या स्वच्छतेच्या बाबतीत मांडलेले विचार चपखल आहेत

**गावचे मार्ग विष्टेने व्यापले ।**
**आड कोणे घाणीने भरले ।**

**ठायी ठायी उकिरडे साचले ।**
**गाव वेढले गोदरींनी ।**

अगदी हीच परिस्थिती मागील काही वर्षापर्यंत राज्यातही होती. हि परिस्थिती बदलण्यासाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात निश्चित काही करण्याचे ठरवले या सरकारच्या सुरवातीच्या कालावधीतच स्वच्छता हा प्राधान्याचा विषय ठरविला. प्रत्येक गावाचे नियोजन झाले पाहिजे याची काळजी घेतली. सुरक्षित, विश्वासार्ह्य आणि आरोग्य पूर्ण अशा स्वच्छता सुविधांची उपलब्धता नसल्या कारणाने आज समाजात माहिलांना शौचविधीसाठी घरापासून दूरवर जाण्यामुळे मानसिक आणि शारीरीक ताण निर्माण होतो हेही लक्षात आले होते. याचबरोबर महिलांवर अनपेक्षित अतिप्रसंग होण्याचे प्रसंगही आपण अनुभवले. नैसर्गिक विधी वेळेत पूर्ण न केल्यामुळे विविध संक्रमणाचे आजार उदभवतात याचबरोबर गर्भावस्थेत धोका निर्माण होण्याची शक्यता देखील नकारता येत नाही.मासीक पाळी दरम्यान योग्य काळजी न घेतल्याने कीशोरवयीन मुलींना विविध संक्रमण, आजारांना तोंड द्यावे लागते, तर त्यांच्या शिक्षण प्रक्रियेत देखील व्यत्यय निर्माण होतो. एकूणच परिस्थिती गंभीरच होती.

**महाराष्ट्र हे नेहमीच पुरोगामी राज्य म्हणून ओळखले गेले आहे व समाजातून आलेल्या चांगल्या सूचनांचा येथे स्वीकार करण्यात आला आहे. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी महाराष्ट्रात स्वच्छतेविषयी मोठया प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांनी स्वच्छतेचा प्रचार व प्रसार करताना वेगवेगळया स्तरावर वेगवेगेळे प्रयोग करून, जनमानसाच्या मानसिकतेवर सकारात्मक परिणाम करून स्वच्छता रूजवण्याचा प्रयत्न केला म्हणून ते आजही प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवीत आहेत.**

स्वच्छतेमध्ये कुटुंबांना वैयक्तिक शौचालय असणे महत्वाचे त्याचसोबत परिसर स्वच्छता सुद्धा तेव्हडीच महत्वाची. हागणदारी हटवायची तर पहिल्यांदा शौचालय उभारणे महत्वाचे.

**तैसेच करावे चर संडास ।**
**मळ दिसोची न द्यावा ।**

**अपुल्या मळाची आपणास ।**
**व्यवस्था लावणे सोयीचे ।**

तुकडोजी महाराज यांनी त्यावेळी तेव्हाच्या उपलब्ध तंत्रज्ञानाप्रमाणे जरी चर संडास सुचविला होता तरी आज आपण अंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारलेला, पर्यावरणपूरक असा सर्वमान्य सोपा संडास म्हणजेच दोन खड्ड्याचा शौचालय बांधण्याचा आग्रह धरला. आज राज्यभर याच प्रकारचे शौचालय आपण गावागावात पाहूही शकतो.

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने देशात तिसरे, जनसंख्या, तसेच आदिवासी जनसंख्येत देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. येथील वैविध्याचा विचार करता पर्यावरणीय, भौगोलिक विविधतेसोबत सांस्कृतिक, सामाजिक अशा सर्वच बाबी विचारात घेऊन, स्वच्छ भारत अभियान हा केवळ शौचालय बांधकामाचा विषय नाही. भारताच्या इतिहासातील वर्तणूक बदलासाठी घेतलेला सर्वात मोठा पुढाकार आहे. एवढेच नव्हे देश हागणदारी मुक्त करण्यासाठी हाती घेतलेला हा सर्वात मोठा कार्यक्रम होता आणि अशा प्रकारे संपूर्ण जगभरात अशा प्रकारे

कार्यक्रमाची अंमलबजावणी झालेली नाही.याचबरोबर शासनाने युनिसेफ सारख्या विविध संस्थांच्या सहाय्याने माहिती शिक्षण संवादाच्या विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी सुरू केली, आणि या उपक्रमांमुळे राज्यात स्वच्छता सुविधांच्या निर्मिती आणि शाश्वत वापरामध्ये एक मैलाचा दगड रोवण्यास मदत देखील झाली आहे.

लोकसहभाग आणि लोकांचे वर्तन बदल घडविण्यासाठी मागील तीन वर्षात राज्यात सातत्याने विविध प्रयोग होत आहेत. लोकसंवादाच्या नव्या प्रक्रिया सुद्धा आपण शोधल्या. समुदाय संचालित हागणदारीमुक्त गाव नियोजन प्रक्रिया तर आपल्या राज्यातल्या गावागावात राबविल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर सुद्धा पोहचली. वर्तन बदलासाठी अभ्यासानंतर आपल्या सर्वांच्याच हे लक्षात आलेले आहे की अंतरव्यक्ती संवाद हाच उपयोगी मार्ग आहे. त्यामुळेच आपण राज्यात २२ ऑगष्ट ते २ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत स्वच्छ महाराष्ट्रासाठी - अठरा लाख भेटी हा उपक्रम राबविला आणि राज्यातील शौचालय नसलेल्या १८ लाखापेक्षा जास्त कुटुंबापर्यंत पोहचलो. यामुळेच मागच्या आर्थिक वर्षात आपण १९ लाखापेक्षा जास्त शौचालय सुविधा उभ्या करून इतिहास निर्माण केला होता. वर्तनबदलासाठी आपला मनाच्या परिवर्तानावारच विश्वास आहे आणि तोच मार्ग अवलंबिला जात आहे.

मागील काही वर्षात राज्यातील ग्रामीण जनतेचा जिव्हाळ्याचा उत्सव म्हणजे आषाढी वारी. या वारीतून प्रत्येक वरकऱ्यापर्यंत पोहचण्यासाठी, स्वच्छतेच्या या यज्ञात सहभागी करून घेण्यासाठी स्वच्छता दिंडी हा उपक्रम राबवित आहोत. लाखो भाविकांपर्यंत पोहचण्याचा आणि लोककलेच्या माध्यमातून स्वच्छतेसाठी जागृती करण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. या स्वच्छता दिंडीमध्ये कळकरांच्या सोबतीने मी स्वत: सहभागी होतो. मा. मुख्यमंत्री दिंडीचा समारोप करतात आणि लोककलावंतांचा गौरवही करतात.

सन २०१२, मध्ये राज्यात स्वच्छतेची व्याप्ती केवळ ४५ टक्के होती. सद्यस्थितीस महाराष्ट्रातील ३४ ग्रामीण जिल्हे, ३५१ तालूके, २७६६७ ग्रंपंचायती आणि ४०५०० महसूल

**माहिती शिक्षण संवाद उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राज्यात केवळ ७ लाख शौचालयाचे बांधकाम करण्यासाठीचा निधी उपलब्ध असताना साधारण १९ लाख शौचालयाचे बांधकाम करण्यात राज्यास यश प्राप्त झाले आहे. याचाच अर्थ आज राज्यात लोकांना उघडयावरील हागणदारीचे दुष्परीणाम लक्षात आले असून या वाईट प्रथेतून मुक्त होण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेत राज्य हागणदारीमुक्त झाले आहे.**

गावे हागणदारीमुक्त झालेले आहेत. माहिती शिक्षण संवाद उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राज्यात केवळ ७ लाख शौचालयाचे बांधकाम करण्यासाठीचा निधी उपलब्ध असताना साधारण १९ लाख शौचालयाचे बांधकाम करण्यात राज्यास यश प्राप्त झाले आहे. याचाच अर्थ आज राज्यात लोकांना उघडयावरील हागणदारीचे दुष्परीणाम लक्षात आले असून या वाईट प्रथेतून मुक्त होण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेत राज्य हागणदारीमुक्त झाले आहे.

स्वच्छतेचा खरा प्रवास हा व्यक्ति पासून ते त्याचे घर, ते त्याचे आंगण ते त्याचे गाव आणि याचबरोबर राज्यात आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत असतो. सर्व शासकीय इमारती जसे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, शाळा आंगणवाडी कॉलेज, आणि खाजगी इमारती मध्ये कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण होणार नाही या बाबतची दखल घेतली पाहीजे. सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम आणि त्याच्या शाश्वत वापरासाठी निर्माण झालेल्या या सुविधांच्या देखभाल दुरुस्ती संबंधी योग्य पाऊले उचलावी लागतील.

राज्यातील महिला आणि बाल विकास विभाग, सार्वजनीक आरोग्य विभाग, ग्रामीण विकास विभाग, आदीवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग यांच्या सहयोगामुळे स्वच्छता समस्या संबंधी एकात्मिक दृष्टीकोन निर्माण होवून काम करण्यास एक नवी दिशा मिळाली आहे.

घटनेनुसार पिण्याचे पाणी आणि स्वच्छता हा राज्याचा स्वतंत्र विषय आहे. डिसेंबर १९९० मध्ये संयुक्त राष्ट्राच्या मार्गदर्शक सुचनांचा स्विकार करण्यात आला आणि योग्य पाणी पुरवठा आणि त्याचे व्यवस्थापन, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन करून पर्यावरणाचे जतन करण्याची जबाबदारी घेण्यात आली. सद्यस्थितीस सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासंबंधीच्या दृष्टीकोनात बदल होवून आता नविन पध्दती आणि कल्पनांचा स्विकार करण्यात आला आहे. कचरा या शब्दात बदल करून तो आता एक संसाधन म्हणून विचार करण्यात येत आहे तर विल्हेवाट या शब्दात बदल करून व्यवस्थापनावर जास्तीचा भर देण्यात येत आहे. कचरा यापुढे कुटुंबाच्या स्तरावरच ओला

आणि सुका वेगळा करण्याची सवय लागावी यासाठी प्रबोधन केले जात आहे. निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा संसाधन म्हणून वापर करून त्यापासून उर्जा आणि खत निर्माण करण्याचा स्त्रोत म्हणून वापर करण्यावर अधिकचा भर देण्यात येत आहे. कोल्हापूर, सातारा सारख्या जिल्हयात शौचालय बायोगॅस ला जोडण्यात आले आहेत. या प्लान्ट मधून निर्माण होणारा गॅस घरगुती वापरासाठी उपयोगात आणला जात आहे. महाराष्ट्र याबाबतीतही पुढे राहील, आमचे गावनिहाय नियोजन सुरू आहे. सांडपाण्याच्या व्यवस्थापणासाठी सुद्धा राज्यात विकेंद्री पद्धतीने कमी खर्चात अनेक प्रयोग सुरू आहेत. जादुई शोष खड्डा किंवा भूमिगत गटारे असे प्रयोग करून अनेक ग्रामपंचायतींनी सांडपाणी व्यवस्थापन करून डासांचा प्रादुर्भाव रोखविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

आता स्वच्छता आणि साफसफाई वर मुख्य भर देण्याची गरज आहे. राज्यात यासाठी एक लोकचळवळ निर्माण व्हावी असे मला वाटते आणि असे केल्यास महात्मा गांधी यांचे स्वच्छ आणि समृध्द देशाचे स्वप्न खऱ्या अर्थाने जमीनीवर उतरेल असा मला विश्वास आहे.

मला राज्याच्या सर्व जिल्हा परिषदा मुख्यत्वे गाव स्तरावर काम करणाऱ्या ग्रामसेवक बंधू आणि भगिनीचे मनापासून कौतुक करायला पाहिजे. त्यांनी प्रत्यक्ष गावात घराघराला मदत केली. राज्यात कार्यरत असणारे अनेक आय. ए. एस. अधिकारी भल्या पहाटे गावाच्या हागणदरीमधे गुड मॉर्निंग पथकासोबत मागील काही वर्षापासून जात आहेत. याचाच अर्थ आम्ही सर्व स्तरावर हा विषय प्राधान्याचा करू शकलो आहोत. शासन आणि गाव यांच्यामध्ये दुवा म्हणून काम केले आणि




करत आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागावर संत परंपरेचे संस्कार आहेत. त्याचमुळे मी स्वत: पंढरपूरमध्ये जाऊन कीर्तनकार, प्रवचनकार, संत, महंत यांना विनंती केली. त्यांनीही मनावर घेतले. आज राज्यातल्या कोणत्याही गावात प्रबोधनाचा कार्यक्रम असतो तेव्हा ते सर्व स्वच्छतेचा मुद्दा अगदी प्रकर्षाने मांडतात.

**व्याख्याने ,कीर्तने,कलापथक ।**
**वादविवाद, पोवाडे नाटके**
**सात्विक ।**

**ऐसी नित्य नवनवी करमणूक ।**
**गावी चालावी सर्वांनी ।**

अगदी याच शिकवणुकीवर विश्वास ठेऊन महाराष्टाला लाभलेल्या लोककलेच्या परंपरेचा आपण खूप चांगला उपयोग करून घेत आहोत. राज्यातील शेकडो लोककलावंत सातत्याने त्यांच्या लोककलेच्या माध्यमातून नियमित प्रबोधन करत आहेत. येणाऱ्या काळातही आपल्याला त्यांची मदत लागणार आहेच त्याशिवाय स्वच्छतेचा शास्वत विचार या भूमीत रुजणार नाही.

स्वच्छता हा विषय व्यक्तिगत अथवा कौटुंबिक स्तरावर विचार करण्याचा विषय नाही. तर या अस्वच्छतेमुळे व उघड्यावरील शौच प्रथेमुळे संपूर्ण सामाजिक हानी होते आहे या बाबत विचार होणे आवश्यक आहे. स्वच्छता हा शासकीय कार्यक्रम नसून, ती आपली व्यक्तिगत जबाबदारी आहे आणि ती पार पडताना प्रत्येकाने निर्माण केलेल्या कचऱ्याचे व्यवस्थापन त्याने स्वत:च करावे अशा प्रकारचे शासन स्तरावरून प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छते संबंधी वेगवेगळ्या स्तरावर जाऊन पुढे येणाऱ्या समस्यांचा विचार करता, शौचालय बांधकामासाठी वैयक्तिक लाभ म्हणून रु. १२००० प्रोत्साहन अनुदान देण्यात आले आहे. हे अनुदान केंद्र शासन हिस्सा ६० टक्के तर राज्याचा ४० टक्के हिस्सा असे प्रावधान करण्यात आले आहे.हा राष्ट्रीय कार्यक्रम राबविताना केंद्र आणि राज्य सरकारने मिळून रु.५८९९.६३

कोटी एव्हढा निधि सर्व जिल्ह्यांना उपलब्ध करून दिला. हा निधि मुख्यत्वे वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी खर्च करण्यात आलेला आहे. लाभास पात्र असणाऱ्या राज्यातील ग्रामीण जनतेला हा लाभ मिळण्यासाठी जिल्हास्तर, पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तर अशा तीनही स्तरावर स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात आली आहे. या राष्ट्रीय कार्यक्रमात शासकीय तसेच निम शासकीय कर्मचारी, कंत्राटी तज्ञ कर्मचारी, सक्षम मनुष्य बळ, यासोबत स्वयंसेवी संस्था यांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्य हागणदारीमुक्त करताना आपण मागील चार वर्षाच्या कालावधीत ६० लाख कुटुंबांना शौचालय बांधण्यासाठी मदत केली. लोकांच्या सवयीत बदल घडवून आणण्यासाठी आणि स्वच्छतेमध्ये शाश्वतता टिकवून ठेवण्यासाठी उभी राहिलेली ही चळवळ आणखी व्यापक होण्याची गरज आहे.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान**

महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे जेथे ग्रामीण स्वच्छतेसाठी प्रत्येक गावाला सहभागी करून घेणारी आणि शाश्वत स्वच्छतेची खात्री करून घेणारी स्पर्धा सुरु आहे. काहीशा बदलासह लोकासह भागाचे उत्तम उदाहरण असलेले संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राज्यात आणखी उठाव घेत आहे. गावाच्या प्रत्येक वार्डात स्पर्धा सुरु झाल्यामुळे गाव स्तरावर प्रत्येक कुटुंब स्वच्छतेचा निरंतर विचार करण्यास प्रवृत्त होईल. उत्कृष्ट ठरणाऱ्या वार्डला रु. १०,०००/ चे बक्षीस दिले जाणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद गट स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या ग्राम पंचायतीला रु. ५०,००००/ चे बक्षीस मिळेल. मग जिल्हास्तरावर प्रथम - ५ लाख, द्वितीय - ३ लाख, तृतीय - २ लाख ग्राम पंचायती मिळवू शकणार आहेत. त्यापुढची स्पर्धा विभागस्तरावर चुरस निर्माण करेल इथे प्रत्येक विभागातून प्रथम येणाऱ्या ग्राम पंचायतीला रु. १० लाख, द्वितीय - ८ लाख, तृतीय - रु.६ लाख बक्षिसे मिळणार आहेत. राज्यस्तरावर मात्र बक्षीस पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायती खऱ्या अर्थाने समृद्ध होऊ शकतील कारण प्रथम - रु. २५ लाख, द्वितीय - रु. २० लाख आणि तृतीय - रु. १५ लाख अशी भरघोस बक्षिसे मिळतील. या अभियानामुळे स्वच्छतेच्या शास्वततेला बळकटी मिळणार आहे. अशा स्वरुपाची भव्य स्पर्धा आयोजित करणारे महाराष्ट्र हे देशातले एकमेव राज्य आहे.

**काळाची पाऊले ओळखून राज्यात अनेक उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतचा शाश्वत स्वच्छता आराखडा बनविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा आराखडा लोकसहभागातून तयार करण्यात येतो. यात येणाऱ्या काही वर्षात गावातील स्वच्छतेच्या सुविधा, त्यांचा निरंतर वापर, समस्या, जबाबदाऱ्या या प्रत्येक गोष्टीचे अभ्यासातून नियोजन केले जात आहे. केंद्र सरकारच्या सुचनांप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छाग्रही नियुक्त केला जाणार आहे. जो त्या गावातील स्वचतेच्या कामात ग्रामपंचायतीला मदत करेल.**

**शाश्वतता**

स्वच्छतेच्या सुविधा उभ्या तर राहिल्या यापुढील काळात या सुविधांचा वापर निरंतरपणे सुरू राहणे, स्वच्छतेप्रती प्रत्येकाची जबाबदारीची भावना निर्माण करणे या बाबी फारच महत्वाच्या असणार आहेत. काळाची पाऊले ओळखून राज्यात अनेक उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतचा शाश्वत स्वच्छता आराखडा बनविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा आराखडा लोकसहभागातून तयार करण्यात येतो. यात येणाऱ्या काही वर्षात गावातील स्वच्छतेच्या सुविधा, त्यांचा निरंतर वापर, समस्या, जबाबदाऱ्या या प्रत्येक गोष्टीचे अभ्यासातून नियोजन केले जात आहे. केंद्र सरकारच्या सुचनांप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छाग्रही नियुक्त केला जाणार आहे. जो त्या गावातील स्वचतेच्या कामात ग्रामपंचायतीला मदत करेल. अनेक प्रकारचे संवाद उपक्रम राबविले जात आहेत. शाश्वततेसाठी राज्यभर प्रशिक्षक तयार करण्याचे काम सुरू आहे. या विषयावरची समज गावागावापर्यंत पोहचविण्यासाठी माझ्या विभागाकडून कसोशीचे प्रयत्न सुरू आहेत. शाश्वत स्वच्छता ही जबाबदारी फक्त शासनाची नाही ती प्रत्येक व्यक्तीची आहे. यासाठी माध्यमे, समाजसेवक, समाजसेवी संस्था या सर्वांनी एकाच ध्येयाने काही दिवस काम केल्यास मला खात्री आहे की आपण सर्व मिळून अभिमानाने म्हणू **माझा महाराष्ट्र! स्वच्छ महाराष्ट्र**!

■■■

*लेखक महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता या खात्याचे मंत्री आहेत.*

इमेलः min.wssd@maharashtra.gov.in

# गांधीजी आणि स्वच्छता

- सुदर्शन अय्यंगार



**२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये आपण आपल्यालाच दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे वचन पूर्ण करण्यासाठी आपल्याला अजून बरीच मजल मारावी लागेल. जर देशातल्या प्रत्येक नागरीकाला शुद्ध पिण्यायोग्य पाणी तसेच पुरेशी स्वच्छता उपलब्ध होत नसेल तर ते अन्याय्य आहे तसेच विषमता असलेल्या समाजाचे लक्षण आहे. पाणी आणि स्वच्छता (वॉटर सॅनिटेशन – डब्ल्यू ए टी एस ए एन) हे आपल्या देशातल्या प्रत्येक नागरीकासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे.**

चार वर्षांपूर्वी १५ ऑगस्ट २०१४ रोजी, देशाच्या पंधराव्या प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्याआधी लाल किल्यावरून केलेल्या भाषणात म्हटले होते –

बंधू आणि भगिनींनो, सन २०१९ ला महात्मा गांधी यांची दीडशेवी जयंती आहे... साफसफाई आणि स्वच्छता या दोन गोष्टी गांधीजींना अतिशय प्रिय होत्या, त्यामुळे मी येत्या २ ऑक्टोबर पासून 'स्वच्छ भारत' अभियानाला सुरवात करत आहे. ते पुढची ४ वर्षे सुरू राहील. आज मला एका महत्त्वाच्या गोष्टीला सुरवात करायची आहे; ती म्हणजे देशातल्या प्रत्येक शाळेमध्ये स्वच्छतागृहे असली पाहिजेत आणि त्यातही मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय असली पाहिजे. असे जर झाले तरच आपल्या मुलींवर शाळा सोडून जाण्याची वेळ येणार नाही.

२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये आपण आपल्यालाच दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य समता आणि बंधुतेचे वचन पूर्ण करण्यासाठी आपल्याला अजून बरीच मजल मारावी लागेल. जर देशातल्या प्रत्येक नागरीकाला शुद्ध पिण्यायोग्य पाणी तसेच पुरेशी स्वच्छता उपलब्ध होत नसेल तर ते अन्याय्य आहे तसेच विषमता असलेल्या समाजाचे लक्षण आहे. पाणी आणि स्वच्छता (वॉटर सॅनिटेशन – डब्ल्यू ए टी एस ए एन) हे आपल्या देशातल्या प्रत्येक नागरीकासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे. 'स्वच्छ हिंदुस्तान' कडे वाटचाल ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे.

### स्वच्छ हिंदुस्थान बाबत गांधीजींची संकल्पना

स्वच्छतागृहे बांधणे आणि देश हागणदारीमुक्त करणे ही यादृष्टीने अतिशय महत्वाची आणि पहिली पायरी असली तरी गांधीजींची स्वच्छ हिंदुस्तान बाबतची संकल्पना खूप वेगळी होती. गांधीजींना मनापासून हिंदुस्थान स्वच्छ आणि सुंदर बघायची इच्छा होती. ज्याप्रकारे आपण रहातो किंवा आपले जीवनमान आहे ते पाहून त्यांना अतिशय त्रास होत असे. मानवी विष्ठा आणि घाण साफ करणाऱ्या समाजाला मिळणारी वागणूक पाहून गांधीजींना अतिशय यातना होत असत. भारतीय समाजाच्या स्वच्छता आणि शुद्धतेच्या बाबतीत वर्षानुवर्ष असलेला अशास्त्रीय दृष्टीकोनही गांधीजींना कळला होता. समाजाच्या या दृष्टीकोनामुळेच घाण आणि विष्ठा उचलणाऱ्यांचा समाज वेगळा पडला होता. या समाजाला त्यामुळेच, मुख्य समाजापासून दूर, गावाबाहेर, गरीबीमध्ये आणि हलाखीच्या तसेच वाईट शारिरीक आणि मानसिक परिस्थितीमध्ये रहावे लागत असे. गांधीजींनी हातात झाडू उचलला आणि घरे, आश्रम, वस्त्या, रस्ते आणि स्वच्छतागृहे साफ करण्यासाठी सर्वांना सहभागी करून घेतले. ज्यावेळी त्यांनी स्वच्छता आणि शुद्धतेमध्ये सुधारणा करण्यासाठी इतरांना आवाहन केले, त्यावेळी दुर्लक्षित समाजाला अकारण, तिरस्कार न करता तसेच पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनाशिवाय आपल्या बरोबर सामावून घेण्यासाठी त्यांच्याजवळ निश्चित कार्यक्रम होता. त्यांचा झाडू हा केवळ भौतिक स्वच्छतेचे प्रतीक नव्हता. त्यांनी अंत्योदयाचे चिन्ह म्हणून झाडूची स्थापना केली. अन्त्योदयापासून सर्वोदयापर्यंतच्या प्रवासाचे त्यांनी नेतृत्व केले तसेच मार्गदर्शन केले.

स्वच्छता आणि साफसफाई हे शब्द फक्त शरीर आणि सभोवतालपुरते मर्यादीत नाहीत. गांधीजींच्या मते कोणत्याही मनुष्याच्या बाबतीत आत्म्याची स्वच्छता किंवा शुद्धता हे अंतीम ध्येय असले पाहिजे. एखाद्याचे चरित्र साकारताना अविरतपणे सत्याचा पाठपुरावा करणे हे आयुष्याचे ध्येय असले पाहिजे. अहिंसेचा वापर शक्ती प्रमाणे करणे हा आत्म्याच्या शुद्धीकरणाचा मार्ग आहे तसेच ती प्रक्रीयाही आहे. गांधीजींना हे कळले होते की आपल्या जनतेमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. हे एखाद्या संकटाप्रमाणेच आहे. ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आपण आपल्यातील मौलिकता किंवा मूलतत्व हरवून बसलो आहोत. गांधीजींनी स्वत:ला सार्वजनिक आणि सामाजिक सेवेला वाहून घेऊन त्यांचे संपूर्ण आयुष्य स्वत:च्या आणि आत्म्याच्या शुद्धीसाठी खर्च केले. अशाप्रकारे या देशाचा प्रत्येक नागरीक शारिरीक, सामाजिक दृष्ट्या तसेच ह्रदयापासून स्वच्छ आणि शुद्ध व्हावा अशा स्वच्छ हिंदुस्थानाचे स्वप्न गांधीजींनी पाहिले.

**गांधीजींच्या मते कोणत्याही मनुष्याच्या बाबतीत आत्म्याची स्वच्छता किंवा शुद्धता हे अंतीम ध्येय असले पाहिजे. एखाद्याचे चरित्र साकारताना अविरतपणे सत्याचा पाठपुरावा करणे हे आयुष्याचे ध्येय असले पाहिजे. अहिंसेचा वापर शक्ती प्रमाणे करणे हा आत्म्याच्या शुद्धीकरणाचा मार्ग आहे तसेच ती प्रक्रीयाही आहे. गांधीजींना हे कळले होते की आपल्या जनतेमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. हे एखाद्या संकटाप्रमाणेच आहे.**

### दक्षिण आफ्रीकेतील गांधीजींचे स्वच्छता आणि शुद्धीविषयी कार्य

दादा अब्दुल्ला यांच्या व्यापार उद्योगासोबत व्यापार करण्याचे काम मिळाल्याने गांधीजी दक्षिण आफ्रिकेला गेले होते. काही दिवसातच त्यांना ब्रिटीश आणि युरोपियन लोकांचा भारतीयांकडे पाहण्याच्या उर्मट आणि अपमानास्पद दृष्टीकोनाचा अनुभव आला. गांधीजींना रेल्वेच्या प्रथम दर्जाच्या डब्यातून जबरदस्तीने बाहेर काढण्याचा प्रसंग घडला त्यावेळी त्यांना आपल्या देशात अस्पृश्य समाजाला सहन कराव्या लागणाऱ्या यातनांची जाणीव झाली. गोरे लोक भारतीय समाजावर अन्याय करत असून जगासमोर दाखवून देत आहेत की भारतीय लोक हे अस्वच्छ वातावरणात रहात असून अजिबात स्वच्छता पाळत नाहीत, हे गांधीजींना जाणवले. तसेच भारतीय समाज स्वच्छतेच्या आणि शुद्धतेच्या चांगल्या सवयी लावून घेण्यासाठी प्रयत्न करत नाही असेही त्यांच्या लक्षात आले.

दक्षिण आफ्रिकेतील नगरांमध्ये आणि शहरांमध्ये भारतीय समाजासाठी स्वच्छ आणि शुद्ध वातावरणाच्या जागा शोधणे हे गांधीजींसाठी मुख्य ध्येय होते. भारतीय समाजाच्या स्वच्छतेच्या सवयींमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने गांधीजींनी व्यूहरचनात्मक कार्य केले. त्यानंतर त्यांनी हे प्रकरण नागरी प्राधिकरणाकडे नेले, आणि भौतिक पायाभूत सुविधा व देखभालीसाठी आग्रह धरला. त्या नंतर त्यांनी राज्य सरकारांना तसेच भारत आणि आफ्रिकेतील वसाहतींच्या सचिव पदाच्या कार्यालयांना पत्रे लिहून नागरी प्राधिकरण करीत असलेल्या दुर्लक्षांकडे लक्ष वेधले. सरकारी तसेच खाजगी स्वच्छतेचा प्रचार आणि प्रसार करणारे तसेच आपल्या सार्वजनिक आयुष्यातून

त्याचे प्रात्यक्षिक दाखविणारे असे गांधीजींचे विशेष व्यक्तिमत्त्व होते.

**भारतातील अस्वच्छतेबाबत गांधीजींचे निरीक्षण**

दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर गांधीजी भारतभर फिरले. त्यावेळी सगळीकडे अस्वच्छता, स्वच्छतेच्या सवयींचा अभाव, अशुद्ध वातावरण, धूळ आणि घाण यांचे साम्राज्य पसरल्याचा अनुभव त्यांना आला. सर्वप्रथम गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा गट रवींद्रनाथ टागोरांच्या शांती निकेतन मध्ये राहिला. तेथील ब्राह्मण आचारी शुद्ध आणि पवित्र वातावरणात काम करायचे. परंतु त्यांना काही अस्वच्छतेच्या सवयी होत्या. तसेच मलनिस्सारण यंत्रणा चुकीची होती. तेथील स्वच्छता तसेच स्वैपाक करण्यासाठी कैद्यांच्या सहभागाला गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरुवात केली. सामान्य माणसांबरोबर प्रवास करता यावा म्हणून गांधीजींनी रेल्वेच्या तृतीय श्रेणीतून तसेच जहाजाच्या डेकवरून प्रवास करायचे ठरविले. त्यांच्या डेकवरच्या प्रवासाबद्दल त्यांनी लिहून ठेवले आहे. 'स्नानगृहे अतिशय गलिच्छ होती तसेच शौचालये अतिशय दुर्गंधीयुक्त होती. शौचालयाचा वापर करायचा असेल तर एखाद्याला लघवी आणि विष्ठा यातून मार्ग काढत किंवा त्यावरून उड्या मारून जावे लागत असे. या अतिशय दुर्गंधी आणि घाणीमध्ये भर म्हणून प्रवाशांना असणाऱ्या घाणेरड्या सवयी! ते जिथे बसायचे तोच परिसर खराब करायचे. रेल्वे प्रवासाबद्दल गांधीजी लिहितात, 'आपल्याला स्वच्छतेचे प्राथमिक नियमही माहिती नाहीत. रेल्वेच्या डब्यात आजुबाजुची जागा झोपण्यासाठीही वापरतात हे माहिती असुनही आपण कुठेही थुंकतो. आपल्याला एखादी गोष्ट कशी वापरावी हे समजून घ्यावयाचे नाही, त्यामुळे संपूर्ण डबा, वर्णन करता येणार नाही इतका घाणीने भरलेला असतो. जरा वरच्या श्रेणीतील प्रवाशांचा थोडा दरारा असल्याने ते थोडेसे इतरांपेक्षा नशीबवान असतात. मी या बाबतीत विद्यार्थ्यांचे जगही पाहिले आहे. ब-याचदा तेही चांगले वागत नसत. ते सफाईदार इंग्रजी बोलायचे, परदेशी कपडे वापरायचे, त्यामुळे गाडीत शिरणे आणि बसायला जागा मिळविणे हा आपला अधिकार समजायचे. मी माझी शोधमोहीम सगळीकडे चालू ठेवली होती, आणि आता तुम्ही मला बोलायचे भाग्य दिल्याने मी तुमच्या समोर माझ्या मनातील गोष्टी मांडल्या आहेत. आपण स्वयंशासनाच्या दृष्टीने प्रगती करत असताना या सर्व गोष्टी आपण सुरळीत केल्या पाहिजेत.'

**विविध शैक्षणिक संस्थामध्ये तसेच परिषदांसारख्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये गांधीजींनी पहिल्यांदा स्वच्छतेचा आणि शुद्धतेचा मुद्दा उपस्थित केला. गांधीजी भारतात परतल्यानंतर ते सहभागी होणार असलेल्या प्रत्येक कार्यक्रमापूर्वी स्वच्छता समितीची स्थापना होते असे. तसेच कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नेत्याला रोजच्या स्वच्छतेमध्ये सहभागी व्हावे लागत असे, अगदी तात्पुरत्या बांधलेल्या शौचालयाच्या सफाईसह!**

जेव्हा ते देवळांमध्ये गेले त्यावेळी त्यांना अशाच प्रकारच्या गोष्टी आढळल्या. ते हरिद्वार आणि ऋषिकेश इथे गेले असताना तेथील लोकांनी गंगेचे किनारे तसेच तेथील रस्ते गलिच्छ ठेवले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. गंगेचे पवित्र पाणी खराब करायला त्यांना काहीच वाटले नाही. लोकांना हमरस्त्यावर आणि नदीकिनाऱ्यावर नैसर्गिक विधी करताना पाहून त्यांना अतिशय दु:ख झाले. मथुरेतील वृंदावन इथे, बनारसच्या विश्वनाथ मंदिरात तसेच गुजरातमधील डाकोर येथे यापेक्षा वेगळी परिस्थिती नव्हती. वेगवेगळ्या शहरात, नगरात आणि गावांमध्ये ते फिरले परंतु स्वच्छता आणि शुद्धतेच्या बाबतीत सर्वत्र सारखीच परिस्थिती होती.

वेगवेगळ्या वस्त्यांवरही काहीही फरक दिसला नाही. जेव्हा ते १९१६ मध्ये बनारसला गेले होते त्या जुन्या शहराचे रुपांतर छोट्या छोट्या किळसवाण्या वस्त्यांमध्ये झालेले त्यांना दिसले. त्या ठिकाणी स्वच्छतेचे कायदे आणि नागरी परंपरा यांना धाब्यावर बसवून अतिशय अस्वच्छता दिसून आली. त्या वस्त्यांमधून जाताना एखाद्या इमारती मधून कोणीतरी अंगावर थुंकणे हा सर्रास येणारा अनुभव होता. त्यावेळच्या मद्रास शहरातही अस्वच्छतेच्या सवयी तसेच स्वच्छता कामगारांप्रती उच्चवर्णीयांचा अपमानास्पद दृष्टिकोन दिसून आला. बिहार मधील पवित्र शहर गया इथेही स्वच्छता आणि शुद्धतेच्या अभावाचा अतिशय वाईट अनुभव आला.

विविध शैक्षणिक संस्थामध्ये तसेच परिषदांसारख्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये गांधीजींनी पहिल्यांदा स्वच्छतेचा आणि शुद्धतेचा मुद्दा उपस्थित केला. गांधीजी भारतात परतल्यानंतर ते सहभागी होणार असलेल्या प्रत्येक कार्यक्रमापूर्वी स्वच्छता समितीची स्थापना होते असे. तसेच कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नेत्याला रोजच्या स्वच्छतेमध्ये सहभागी व्हावे लागत असे, अगदी तात्पुरत्या बांधलेल्या शौचालयाच्या सफाईसह! त्यानंतर स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेसच्या प्रत्येक सत्रामध्ये, मग त्यात गांधीजी सहभागी असोत किंवा नसोत, स्वच्छता

समिती आणि त्यांची कामे कायम असायची. गांधीजी रहात असलेल्या आणि काम करीत असलेल्या प्रत्येक आश्रमात तसेच त्यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये सर्व सहभागी सदस्यांसाठी साफसफाई हा दिनक्रमाचा एक भाग बनला होता.

**स्वच्छता या मुद्द्यावर गांधीजींचे कार्य**

योग्य ते शास्त्र आणि त्याबरोबरच योग्य त्या तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असून त्याचा गांधीजींनी आणि त्यांच्या आश्रमातील सहकाऱ्यांनी कायम पाठपुरावा केला. 'स्वच्छतेची सेवा ही अतिशय गरजेची तसेच पवित्र सेवा आहे. त्या कामाला समाजात अपमानास्पद वागणूक मिळत असल्याने सर्वसाधारणपणे त्याकडे दुर्लक्ष होते, त्यामुळे सुधारणेसाठी लक्षणीय संधी आहे' असे त्यांनी अहमदाबाद येथील आश्रमाच्या नियमांमध्ये लिहिले होते. त्यामुळेच आश्रमातील स्वच्छतेसाठी बाहेरील कोणत्याही कामगाराला नेमायचे नाही यावर विशेष लक्ष दिले जात होते. त्या ऐवजी आश्रमातील सभासदच संपूर्ण सफाईची कामे स्वत:च करीत असत. आश्रमात नवीन प्रवेश घेणाऱ्याला सर्वसाधारणपणे पहिल्यांदा या विभागाला जोडले जात असे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की गांधीजी कामामध्ये अतिशय व्यग्र असायचे, त्यांच्याकडे प्रत्येक मिनिटाचा हिशोब असे तरीही ते परिसराच्या सफाईमध्ये कायम सहभागी होत असत. यातून आपल्याला बरेच काही शिकता येईल. आपण शौचालयाची आणि परिसराची प्रतिकात्मक स्वच्छता करण्यातच समाधान मानतो आणि बाकीचे काम व्यवस्थेवर सोपवितो.

सन १९३० मध्येही वर्ध्याच्या सेवाग्राम आश्रमात गांधीजींचे स्वच्छतेवरचे लक्ष कमी झाले नव्हते. त्यांनी आश्रमातील रहिवाशांसाठी खालीलप्रमाणे तपशीलवार लिहून ठेवले आहे.

प्रत्येकाने आपले ताट व्यवस्थित घासून जागेवर ठेवले पाहिजे. आश्रमात येणाऱ्या पाहुण्यांनी आणि भेट देणाऱ्या पर्यटकांनी स्वत:साठी ताट, वाटी, पाणी पिण्याचे भांडे, चमचे, कंदील, अंथरूण, मच्छरदाणी, रुमाल इत्यादी साहित्य स्वत:च आणावे. तसेच ते व्यवस्थित ठेवावे अशी विनंती आहे. सर्व प्रकारचा कचरा हा कचऱ्याच्या डब्यातच टाकावा. पाणी वाया घालवू नये. पिण्यासाठी उकळलेले पाणी वापरावे.

**राज्यानेही जास्त सर्वसमावेशकपणे प्रतिसाद द्यायला हवा. सफाई कामगारांनी मैला वाहून नेण्यावर बंदी घातलेली असतानाही सन २०१७ मध्ये मैला वाहून नेणाऱ्या देशभरातील ३०० कामगारांचा मृत्यू झाल्याची अधिकृत नोंद आहे. २०१७ मध्ये मैला वाहून नेणऱ्या कामगारांची अधिकृत नोंद १३,००० इतकी असताना आंतरमंत्रालयीन कार्यदलाच्या अहवालानुसार प्रत्यक्षात ही संख्या चारपट जास्त म्हणजे ५३,२३६ इतकी होती.**

भांडी घासून झाल्यावर उकळत्या पाण्याने धुवून घ्यावी. आश्रमातील विहिरीचे न उकळलेले पाणी पिण्यासाठी सुरक्षित नाही. रस्त्यावर थुंकू किंवा नाक शिंकरु नये.

नैसर्गिक विधींसाठी नियुक्त ठिकाणांचाच वापर करावा. नैसर्गिक विधींनंतर प्रत्येकाने स्वत:ची स्वच्छता केली पाहिजे. शौचालयांमध्ये घन पदार्थ आणि द्रव पदार्थांसाठी वेगवेगळे पात्र असावे. नैसर्गिक विधी उरकल्यानंतर स्वच्छ माती तसेच स्वच्छ पाण्याचा वापर करून हात धुवावेत व स्वच्छ रुमालाला पुसावे. रात्रीच्या मैल्यावर माश्या बसू नयेत म्हणून कोरडी माती व्यवस्थित घालून झाकून ठेवावी. शौचालयातील आसनाचा वापर करताना ते घाण होणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. काळोखाची वेळ असल्यास बरोबर कंदील घेवून जावे. ज्या ज्या गोष्टींवर माशा बसण्याची शक्यता आहे त्या गोष्टी व्यवस्थित झाकून ठेवाव्या.

भारताच्या या स्वच्छताप्रिय माणसाने आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत या विषयाचा पाठपुरावा केला हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. १९४७ च्या अखेरीस तसेच १९४८ च्या जानेवारी महिन्यात त्यांनी घेतलेल्या प्रार्थना सभांमध्ये तसेच इतर अनेक कार्यक्रमातून त्यांनी जनतेला आपला परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचे तसेच व्यक्तीगत स्वच्छतेसाठी चांगल्या सवयी लावून घेण्याचे आवाहन केले होते.

**देशातील स्वच्छतेची परिस्थिती**

देशामध्ये शौचालय बांधण्याबाबतच्या परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. देशातील शौचालयांचे प्रमाण २०१४ मध्ये ४० टक्के होते ते आता ९० टक्क्याच्या वर पोचले असल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी नुकत्याच केलेल्या घोषणेमध्ये दिली. सुमारे साडेचार लाख खेड्यांमध्ये शौचालये बांधण्यात आली आहेत. ही गोष्ट परिणामकारक असली तरीही स्वच्छता आणि शुद्धतेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये घरगुती शौचालये, ग्रामीण शाळा तसेच घनकचरा अभियानाचा समावेश आहे. यामधील इतर दोन गोष्टींबाबत कार्य करण्याची गरज आहे.

राज्यानेही जास्त सर्वसमावेशकपणे प्रतिसाद द्यायला हवा. सफाई कामगारांनी मैला वाहून नेण्यावर बंदी घातलेली असतानाही सन २०१७

मध्ये मैला वाहून नेणाऱ्या देशभरातील ३०० कामगारांचा मृत्यू झाल्याची अधिकृत नोंद आहे. २०१७ मध्ये मैला वाहून नेणऱ्या कामगारांची अधिकृत नोंद १३,००० इतकी असताना आंतरमंत्रालयीन कार्यदलाच्या अहवालानुसार प्रत्यक्षात ही संख्या चारपट जास्त म्हणजे ५३,२३६ इतकी होती. यामध्ये एकूण ६०० पैकी १२१ हून अधिक जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये रेल्वेमधील गटारे आणि सांडपाण्याच्या टाक्या साफ करणारे सफाई कामगार जे मैला वाहून नेणारे सर्वात जास्त कामगार आहेत, त्यांचा समावेश नाही. याबाबतीत देशाने ताबडतोब प्रतिसाद दिला पाहिजे आणि हाताने मैला उचलायचे काम कायमचे बंद झाले पाहिजे. संपूर्ण स्वच्छता अभियान हे राज्याचे, समाजाचे आणि प्रत्येक नागरिकाचे ध्येय असले पाहिजे.

**शोधाचा दिवा स्वत:कडे वळविणे**

गांधीजींचे स्वच्छतेबाबतचे काम तसेच अस्पृश्यता निवारण मोहिम हे सत्याग्रहाचे महत्त्वाचे घटक आहेत. सत्याग्रह म्हणजे स्वत:च्या शुद्धीची प्रक्रिया. आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात करतानाही गांधीजींसाठी स्वच्छता आणि शुद्धता अतिशय महत्त्वाची होती. सत्याचा शोध घेताना त्यांना जाणीव झाली की ते अंतीम सत्य ज्याला देव म्हणतात त्याच्यासमोर सर्व मानव प्राणी किंवा त्या बाबतीत सर्व सजीव प्राणी समान आहेत. गांधीजींसाठी स्वत:च्या शुद्धीच्या प्रक्रियेत व्यक्तिगत किंवा पर्यावरणाची स्वच्छता हे पहिले पाऊल होते. त्याचप्रमाणे स्वत:च्या शुद्धीकरण प्रक्रियेमध्ये दुसरे पाऊल म्हणजे समाजाच्या स्वच्छतेसाठी शांतपणे काम करणारे दलित कामगार आहेत. त्यांच्याबाबत वर्षानुवर्षे असलेला पूर्वग्रह काढून टाकणे. वर्षानुवर्षे दलित लोकांवर होणारा अन्याय हा हिंदू धर्मातल्या प्रत्येकाने जाणला पाहिजे असे गांधीजींना वाटत होते. त्यानंतर त्याची पुढची पायरी म्हणजे त्याचा स्वीकार आणि पश्चातापाची भावना. त्यानंतर शेवटी हिंदू जातीतल्या प्रत्येकाने ही नुकसान भरपाई केली पाहिजे. म्हणजेच अस्पृश्यता नष्ट करून त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी गांधीजींची इच्छा होती.

---

**आपण अजूनही गांधीजींना पूर्णपणे प्रतिसाद दिलेला नाही. गाधीजींनी समाजशास्त्र जाणले होते म्हणूनच स्वच्छतेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा, पर्यायाने पारंपरिक सफाई कामगार जे वर्षानुवर्षे त्यांच्या कामामुळे निंदेचे वाटेकरी होते, त्यांनाही प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्वातंत्र्यानंतर आपण व्यक्तिगत लक्ष केंद्रित केले नाही आणि व्यक्तिगत शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले. त्याऐवजी सगळी जबाबदारी राज्यांची आहे असे समजून मोहिमांचे रूपांतर योजनांमध्ये केले.**

---

व्यक्तिगत स्वच्छता तसेच खेड्यांच्या आणि शहरांच्या स्वच्छतेच्या भरीव कार्यक्रमाला गांधीजींनी सुरुवात केली. तसेच अस्पृश्यता निवारण या एका भरीव कार्यक्रमाबरोबरच प्रत्येक सत्याग्रहीला घ्यावा लागणाऱ्या ११ शपथांपैकी एक शपथही होती. भारताला स्वच्छतेच्या आणि शुद्धतेच्या क्षेत्रात अजूनही भरीव सुधारणांची गरज आहे. आपण अजूनही गांधीजींना पूर्णपणे प्रतिसाद दिलेला नाही. गाधीजींनी समाजशास्त्र जाणले होते म्हणूनच स्वच्छतेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा, पर्यायाने पारंपरिक सफाई कामगार जे वर्षानुवर्षे त्यांच्या कामामुळे निंदेचे वाटेकरी होते, त्यांनाही प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्वातंत्र्यानंतर आपण व्यक्तिगत लक्ष केंद्रित केले नाही आणि व्यक्तिगत शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले. त्याऐवजी सगळी जबाबदारी राज्यांची आहे असे समजून मोहिमांचे रूपांतर योजनांमध्ये केले. योजनांच्या ध्येय, आराखडा आणि संख्येमध्ये कपात केली. गांधीजींनी स्वच्छतेबाबतच्या शिक्षणावर भर दिला होता. आज भारतातील जवळजवळ प्रत्येकाला 'शौचालय प्रशिक्षणाची' तसेच स्वच्छतेच्या आणि शुद्धतेच्या शिक्षणाची गरज आहे.

एक नागरिक म्हणून आपण जबाबदारीने वागण्याची गरज आहे. लोकांची वृत्ती अजूनही अज्ञानी, उद्धट आणि बेजबाबदार असून सवयी घाणेरड्या आणि गलिच्छ आहेत. आपण शौचालये अस्वच्छ ठेवतो, परिसर घाणेरडा ठेवतो. तसेच बस, रेल्वे आणि जहाजांवर कचरा टाकून ही सार्वजनिक ठिकाणेही अस्वच्छ करतो. स्वच्छ हिंदुस्थान हे अजूनही आपल्यासाठी एक स्वप्नच असून त्यासाठी आपल्याला खूप प्रयत्न करणे आवश्यक आहे.

एक समाज म्हणून अजूनही आपण भेदभाव करतो तसेच सूक्ष्म पद्धतीने अस्पृश्यताही पाळतो. जातीव्यवस्थेचा शाप अजूनही गेलेला नाही. आपण आतून अजूनही स्वच्छ, निर्मळ झालेलो नाही. स्वयंनियमन आणि स्वयंशासन हे अजूनही पूर्ण समजू शकलो नाही. त्यामुळे सार्वजनिक आणि राजकीय कारकिर्दीत लोक स्वच्छ नाहीत.

हा शोधाचा दिवा आता स्वत:कडे वळवून, स्वत:मध्ये सुधारणा घडवून स्वत:प्रती तसेच समाजाप्रती जबाबदार बनणे हीच गांधीजींना खरी श्रद्धांजली असेल.

■■■

*लेखक अहमदाबाद येथील गुजरात विद्यापिठाचे माजी कुलगुरु असून गांधी हेरिटेज मिशनचे सदस्य आहेत.*

*ई मेल : sudarshan54@gmail.com*

# गांधीजी, स्वच्छता आणि स्वराज्य

- डी जॉन चेल्लादुराई



**सत्याचा शोध घेणारे या नात्याने गांधीजींनी आपली जीवनशैली अत्यंत दक्ष ठेवली होती आणि स्वच्छतेला सर्वोच्च महत्व दिले. राष्ट्रपिता म्हणून त्यांनी राष्ट्र उभारणीत स्वच्छतेचे अपरिहार्य स्थान ओळखले होते आणि `स्वच्छता हीच ईश्वरभक्तीनंतर दुसऱ्या स्थानी आहे' असे म्हटले.**

आयसीएस पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मध्य महाराष्ट्रातील एक तरुण माणूस गांधी यांना त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी सेवाग्राम आश्रमात भेटला. गांधींनी त्याला विचारले, `` तुला आयसीएस का व्हायचे आहे ?'' `भारताची सेवा करण्यासाठी' त्या तरुण माणसाने उत्तर दिले. `खेड्यात जाऊन स्वच्छता कार्य करणे ही देशाप्रती सर्वोत्कृष्ट सेवा आहे' असा सल्ला गांधीजींनी दिला. आणि आयसीएस होण्याची महत्वाकांक्षा बाळगणारे अप्पा पटवर्धन पुढे सफाईच्या कार्यात विशेषता प्राप्त करणारे सर्वात उत्तम स्वातंत्र्य सैनिक ठरले,

स्वातंत्र्य संग्रामाच्या शाळेत सफाई आणि स्वच्छता या पदवीसाठीच्या परीक्षा होत्या. विनोबा भावे, ठक्कर बाप्पा, जे सी कुमारप्पा आणि चमकदार बुध्दिमत्ता असलेल्या अगणित तरुणांनी, स्वातंत्र्य चळवळीत प्रवेश केला आणि सफाई आणि स्वच्छता या मूळ कार्याद्वारे स्वातंत्र्य प्राप्त केले.

सत्याचा शोध घेणारे या नात्याने गांधीजींनी आपली जीवनशैली अत्यंत दक्ष ठेवली होती आणि स्वच्छतेला सर्वोच्च महत्व दिले. राष्ट्रपिता म्हणून त्यांनी राष्ट्र उभारणीत स्वच्छतेचे अपरिहार्य स्थान ओळखले होते आणि `स्वच्छता हीच ईश्वरभक्तीनंतर दुसऱ्या स्थानी आहे' असे म्हटले.

### विकास पूर्वअट

विकास हा मानवी संस्कृतीचा विश्वासू साथीदार आहे. प्रागैतिहासिक काळातील शिकार गोळा करून आणणाऱ्या मानवापासून ते शहरी सुसंस्कृत मानवापर्यंत, आम्ही जीवनशैलीत प्रचंड प्रमाणावर सुधारणा केली आहे. नाविन्यपूर्ण संशोधनाने जीवनाच्या कोणत्याही पैलूत घडवून आणलेली सुधारणा या दृष्टीने विकासाकडे पाहिले जाते. मानवी विकास या संकल्पनेत व्यक्तीच्या कल्याणाच्या सर्व पैलूंचा अंतर्भाव होतो : अन्न सुरक्षा, स्वच्छ आणि ताजी हवा, शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छता, कोठेही जाण्याची सोय, या सर्वांची खात्री करून देण्यासाठी दर्जेदार शिक्षण आणि निवडीचे स्वातंत्र्य.

अब्राहम मास्लो म्हणतो त्याप्रमाणे, विकासाच्या या बहुतेक घटकांचे शारीरिक गरजांची पूर्तता या नुसार वर्गीकरण केले जाऊ शकते.

विकसित पावणारा समुदाय, म्हणून आम्ही शारीरिक गरजांची पूर्तता करण्याची काळजी घेण्यासाठी म्हणजे पुरवठ्याची बाजू, यंत्रणा उभारण्यास प्रचंड कष्ट आणि वेदना सोसल्या आहेत, तर दुसऱ्या बाजूकडे म्हणजे विल्हेवाट लावण्याकडे केवळ दुर्लक्ष केले आहे. विकासाच्या अजेंड्यात विल्हेवाट लावण्याची योजना अभावानेच आढळते.

`उत्तम सुरुवात हे अर्धे यश असते' असे म्हटले जाते. दुसऱ्या अर्ध्या भागासाठी असे म्हटले जाते की, तुम्ही कशी सुरुवात करता, हे महत्वाचे नाही तर कसा शेवट करता, हे महत्वाचे आहे.

स्वयंपाकाच्या कलेत, विकासाची साधने तयार करण्यात निष्णात असलेल्या मानवतेने, जो काही कचरा किंवा उपज तयार होतो त्याची विल्हेवाट लावण्याच्या कलेतही नैपुण्य प्राप्त केले पाहिजे.

दु:खाने असे म्हणावे लागते की, मानवी विष्ठा असो, कारखान्यांतील नको असलेले पदार्थ असोत, ग्राहकांनी केलेला कचरा असो की, विकासाच्या प्रक्रियेतील निरुपयोगी वस्तू असोत, मानवाने नेहमीच त्याच्याकडे अत्यंत कमी लक्ष दिले आहे.

**अतिक्रमण**

याचा परिणाम असा झाला आहे की, आमची रेल्वे स्थानके, बस स्थानके, बाजारपेठ, अगदी देवळांची आवारेही निरुपयोगी वस्तूंचे आगार असल्याचे भासते, जी माशा, डास आणि उंदीर, घूस अशा कुरतडणाऱ्या प्राण्यांनी बजबजलेली असतात. गांधीजींनी त्याला `दुर्गंधीचा अड्डा' असे म्हटले होते. आपण तर पवित्र गंगा नदीचेही रुपांतर सांडपाण्याच्या महागटारात केले आहे.

शहरी लोकांच्या सार्वजनिक स्वच्छतेकडे पाहण्याच्या या निष्ठुर दृष्टिकोनाबद्दल गांधी यांनी असे मत व्यक्त केले होते की, ``मुंबईत लोक बहुमजली इमारतींतील रहिवासी थुंकणार तर नाहीत ना, या चिरंतन भीतीने रस्त्यांवरून चालत असतात, हा विचार करणे क्लेशदायक आहे.'उघड्यावर शौचास बसणे याला गांधी असंस्कृत मानत असत कारण `अशा वेळी तिथून जर आपण चाललो असू तर आपण मान फिरवतो'

**सत्याची जाणीव**

गांधींसाठी, स्वच्छता ही केवळ जैविक आवश्यकता नव्हती, तर तो जगण्याचा मार्ग होता, सत्याच्या जाणीवेचा अंतर्गत घटक होता. स्वच्छतेबाबत त्यांची समजूत ही सत्याच्या सार्वत्रिक एकतेतून अंकुरली होती. गांधींनी, जे सत्याची ईश्वराप्रमाणे पूजा करत, संपूर्ण आणि सर्वांना सामावून घेणारे सत्य शुध्द मानले आणि म्हणून त्यांनी स्वच्छतेची बरोबरी ईश्वरभक्तीशी केली. त्यांनी स्वच्छतेला स्वातंत्र्याच्या दिशेने आवश्यक पायरी म्हणून दर्जा दिला आणि अठरा विधायक कार्यक्रमांमध्ये त्याचा समावेश केला.

**सत्याच्या शोधात निघालेल्या गांधीजींनी, जीवनाकडे सत्याचा सर्वात जवळचा अविष्कार म्हणून पाहिले आणि म्हणून त्यांनी जीवनाची बरोबरी सत्य किंवा ईश्वर यांच्याशी केली. जीवनाचा भाग म्हणून ज्या काही प्रक्रिया आहेत, त्या आणि त्यांचे वर्तन हेही सत्याची जाणीव होण्याचा भाग आहे. या अर्थाने, स्वच्छता, अंतर्बाह्य स्वच्छता ही ईश्वराची जाणीव करून घेणे आहे, असा गांधीजींचा विश्वास होता.**

सत्याच्या शोधात निघालेल्या गांधीजींनी, जीवनाकडे सत्याचा सर्वात जवळचा अविष्कार म्हणून पाहिले आणि म्हणून त्यांनी जीवनाची बरोबरी सत्य किंवा ईश्वर यांच्याशी केली. जीवनाचा भाग म्हणून ज्या काही प्रक्रिया आहेत, त्या आणि त्यांचे वर्तन हेही सत्याची जाणीव होण्याचा भाग आहे. या अर्थाने, स्वच्छता, अंतर्बाह्य स्वच्छता ही ईश्वराची जाणीव करून घेणे आहे, असा गांधीजींचा विश्वास होता. ``अस्वच्छ शरीर आणि त्याहीपेक्षा अस्वच्छ मनाने आपण कधीच देवाचा आशीर्वाद मिळवू शकत नाही. एक स्वच्छ शरीर अस्वच्छ शहरात कधीच राहू शकत नाही.''

**स्वराज**

भारतीय स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या समग्र दृष्टिकोनामुळे त्यांना भारताच्या स्वराज्य मिळवण्याच्या प्रयत्नांमध्ये स्वच्छतेच्या एकमेव अद्वितीय स्थानाची जाणीव झाली.

भारतीय होम रूलच्या हक्काची मागणी करताना बाळ गंगाधर टिळक यांनी गर्जना केली की, ``स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे'' गांधींसाठी मात्र स्वराज्य या संज्ञेचा अर्थ तिच्या परिणामांमध्ये अधिक ध्वनित होता. यंग इंडियामध्ये त्यांनी लिहिले होते, ``स्वराज्य हा एक पवित्र, वैदिक शब्द आहे, ज्याचा अर्थ स्वयंशासन, स्वयंमर्यादा असा आहे आणि स्वातंत्र्य या शब्दाने जो सहसा अर्थ होतो, त्यानुसार सर्व बंधनांपासून स्वातंत्र्य असा नाही.'' `` सर्व उपभोगांवर स्वत:ने घातलेली मर्यादा, सार्वजनिक ठिकाणी कचरा करण्याचा उल्लेख करण्याची गरजच नाही. ते पुढे जाऊन असेही म्हणाले की, `माझ्या स्वप्नातील स्वराज्यात गरीब माणसाचे स्वराज्य ही कल्पना असून स्वयंमर्यादा शेवटच्या माणसापर्यंत झिरपली पाहिजे.''

बनारस हिंदू विद्यापीठाचे उद्घाटन करण्याच्या प्रसंगी, समोर असलेल्या विशाल समुदायासमोर त्यांनी पवित्र शहराला गुदमरवणार्या कचर्याचा संदर्भ त्यांनी दिला. ``कितीही भाषणे केली तरी ती आपल्याला स्वयंशासनास (स्वातंत्र्य) लायक बनवू शकत नाहीत. केवळ आमचे वर्तन हेच आम्हाला त्यासाठी पात्र बनवू शकेल'' स्वच्छता हे त्यांच्यासाठी स्वराज्ययाजना होते.

वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात व्यक्तीच्या वर्तनाबाबत स्वयं मर्यादेचे त्यांनी जे आवाहन केले, ते जगण्याच्या शारीरिक आणि अनुवांशिक पैलूं संदर्भात

होते. कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्याच्या यंत्रणेबाबत गांधी यांनी म्हटले की, "प्रत्येक व्यक्तीला जोपर्यंत आयुष्यातील सामान्य सुविधा मिळण्याची हमी दिली जात नाही तोपर्यंत स्वराज्य हे पूर्ण स्वराज्य नाही."

**स्वच्छता राष्ट्र उभारणीची कृती**

स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करताना, त्यांनी स्वातंत्र्याचे आयाम स्पष्ट केले आणि 'स्वच्छ वर्तन' याच्या महत्वावर प्रकाश टाकला. या संदर्भात ते म्हणाले की, 'स्वयं शासनाचा विचार करण्यापूर्वी, आपल्याला आवश्यक काम केले पाहिजे.'

आरोग्याच्या दृष्टिकोनातून गांधी यांनी खेड्यांच्या स्थितीचे वर्णन दयनीय असे केले. 'आपल्या गरीबीच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण स्वच्छतेबाबत आवश्यक ज्ञानाची अनुपलब्धता हे आहे. या अर्थाने त्यांनी म्हटले की, भारताला केवळ इंग्लिश ताबेदारीपासून मुक्त करणे इतकाच स्वराज्याचा अर्थ नव्हे तर कोणत्याही ताबेदारीपासून मुक्त करणे आहे.'

दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी म्हटले की, स्वराज्य हे सातत्यपूर्ण परिश्रम आणि पर्यावरणाचे बुद्धिमान आकलन याचे फळ असेल.

**स्वच्छता हा उदात्त आनंद**

गांधींनी अहिंसक मार्गाने जगणे हेच ईश्वराची पूजा करण्याचे सर्वोत्कृष्ट साधन असे मानले, जीवनाची सेवा करणारी प्रत्येक कृती ईश्वराकडे नेणारा मार्ग, असे त्यांनी पाहिले. स्वच्छता हे शुद्धीकरणाचे कृत्य आहे, असे त्यांचे मत होते आणि त्यातून त्यांनी प्रचंड आनंद मानला.

गांधी यांचे चिटणीस प्यारेलाल यांनी यासंदर्भात एक मनोरंजक आठवण सांगितली. गांधी नौखालीत हिंदू आणि मुस्लीम यांच्यात सलोखा प्रस्थापित करण्यासाठी सगळीकडे फिरत होते.

प्यारेलाल लिहितात, "१९ जानेवारी १९४७ रोजी गांधी यांनी सकाळी जेव्हा अटकरा येथे जाण्यासाठी बादलकोट सोडले, तेव्हा गांधीजी ज्या मार्गाने जाणार होते तो अरुंद पदपथ अत्यंत निसरडा झाला होता आणि नौखालीतली आदली रात्र अभूतपूर्व दव असलेली होती. कर्नल जीवन सिंग दोन वेळा या अवघड

---

**आरोग्याच्या दृष्टिकोनातून गांधी यांनी खेड्यांच्या स्थितीचे वर्णन दयनीय असे केले.'आपल्या गरीबीच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण स्वच्छतेबाबत आवश्यक ज्ञानाची अनुपलब्धता हे आहे.या अर्थाने त्यांनी म्हटले की, भारताला केवळ इंग्लिश ताबेदारीपासून मुक्त करणे इतकाच स्वराज्याचा अर्थ नव्हे तर कोणत्याही ताबेदारीपासून मुक्त करणे आहे.'**

---

मार्गावरून चालताना पाय घसरून आडवे झाले. या निसरड्या उतारावरून सावरून उठण्यासाठी गांधीजीनी त्यांना हसत हसत आपली काठी देऊ केली.

हा पदपथ इतका अरुंद होता की, केवळ एकच व्यक्ती त्यावरून एका वेळेस चालत जाऊ शके. अचानक सर्वच ताफा एकदम थांबला. गांधी पदपथावरील विष्ठा काही कोरड्या पानांच्या मदतीने उचलून टाकत होते. काही खट्याळ पोरांनी लघुशंका करून पदपथ आणखी घाण करून ठेवला होता.

'तुम्ही ते मला का करू दिले नाही? आम्हाला तुम्ही लाजवले का?' असे मनुने विचारले. गांधी हसले. ``अशा गोष्टींत मला किती आनंद मिळतो, याची तुला काहीच कल्पना नाही''

ग्राम्र राज्य गाव, सर्व प्राथमिक उत्पादनांचे, उपजीविकेचे केंद्र हे भारताचे हृदय आहे. खेड्यांच्या जीवनात संपूर्ण भारताचे जीवन सामावले आहे, असा गांधीना विश्वास होता. म्हणून त्यांनी हिंद स्वराज्य - भारतीय होम रूलची बरोबरी ग्राम-राज्याशी केली.

स्वतंत्र भारतातील गावांची कल्पना करताना गांधीजींनी म्हटले की, ` गाव हे सुधारित समजले जाईल ज्यात गावाच्या गरजेनुसार उत्पादन करणारा प्रत्येक प्रकारचा ग्रामोद्योग असेल, ज्यात कुणीही निरक्षर नसेल, जिथे रस्ते स्वच्छ असतील, जिथे कचरा हलवण्यासाठी निश्चित जागा असेल, जिथे विहिरी स्वच्छ असतील...'

गांधी यांनी आदर्श गाव प्रस्ताव करताना असे म्हटले की, ``आदर्श भारतीय गावाची रचना अशी करावी की, स्वच्छतेसाठी तिथे अगदी योग्य व्यवस्था असावी. त्यात पुरेसा प्रकाश आणि हवा खेळती राहण्याची व्यवस्था असलेली अशी घरे असावीत आणि ती बांधण्यासाठी लागणारे साहित्य पाच मैलांच्या परिघात उपलब्ध असावे.'

गावांच्या सध्याच्या शोचनीय स्थितीबद्दल खेद व्यक्त करताना त्यांनी लिहिले, 'जर गावांतील स्वच्छतेत सुधारणा केली गेली तर लाखो रुपये वाचू शकतील आणि त्या प्रमाणात लोकांची स्थितीही सुधारेल. आजारी शेतकरी आरोग्यसंपन्न शेतकऱ्याप्रमाणे कधीही काम करू शकणार नाही.'

**स्वच्छतेच्या मुद्याला प्रतिसाद**

अस्वच्छतेच्या समस्येला प्रतिसाद




देताना त्यांनी असा विचार मांडला की, `प्रत्येक गावात सर्वात कमी खर्चात एका ठिकाणी बांधलेला पाणवठा असावा.'

हा संपूर्ण विषय (स्वच्छता) अद्याप उपेक्षित आहे, हा व्यवसाय गलिच्छ तर नाहीच, परंतु शुद्ध करणारा आहे, जीवनाचे संरक्षण करणारा आहे. फक्त आपणच त्याची किंमत कमी केली आहे. आपण त्याचा दर्जा वाढवून खऱ्या दर्जापर्यंत त्याला आणले पाहिजे.

गांधीजींनी सत्याग्रह आणि विधायक कार्यक्रम हे एकाच पक्ष्याचे दोन पंख मानले होते, एकावाचून दुसऱ्याला अर्थच नाही. गांधीजींनी सत्याग्रह आणि स्वच्छतेसारखा विधायक कार्यक्रम यांच्यात जो अपरिहार्य संबंध जोडला, त्याचे पुरावे संपूर्ण देशातील स्वातंत्र्य चळवळीत मिळत होते. शौचालय सफाई आणि स्वच्छतेचे कार्य हे सत्याग्रहीची अर्हता ठरली होती. प्रत्येक सार्वजनिक सभेत, मग ती ब्रिटिशांविरोधात सत्याग्रहाची हाक असो

**गांधीजींनी सत्याग्रह आणि स्वच्छतेसारखा विधायक कार्यक्रम यांच्यात जो अपरिहार्य संबंध जोडला, त्याचे पुरावे संपूर्ण देशातील स्वातंत्र्य चळवळीत मिळत होते. शौचालय सफाई आणि स्वच्छतेचे कार्य हे सत्याग्रहीची अर्हता ठरली होती. प्रत्येक सार्वजनिक सभेत, मग ती ब्रिटिशांविरोधात सत्याग्रहाची हाक असो किंवा सामाजिक सुधारणेचा पुढाकार असो, सभेत ग्राम सफाई ही अटळ सुरुवात असायची.**

किंवा सामाजिक सुधारणेचा पुढाकार असो, सभेत ग्राम सफाई ही अटळ सुरुवात असायची. जुन्या पद्धतीच्या बास्केट प्रकारच्या शौचालायांतून मैला गोळा करण्याच्या कामी भारतीयांचा एक विभाग जे भंगी या नावाने परिचित होते, अनेक पिढ्यांपासून जुंपलेले असायचे, आणि ज्यांच्याकडे उपेक्षेने पाहिले जायचे. या लोकांच्या उपेक्षेमुळे गांधी अत्यंत चिंतीत होते कारण त्यांना असे वाटे की, हे लोक जरी समाजाच्या सर्वात खालच्या स्तरावरचे आहेत असे मानले जाई, तरीही समाजाची स्वच्छता आणि आरोग्य राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम हे लोक करत आहेत. ``तो समाजातील सर्वांनी वाळीत टाकलेला तिरस्कृत व्यक्ती म्हणून असला तरीही तो अशा गटापैकी आहे, जो समाजाच्या स्वच्छतेच्या दृष्टीने

कल्याणासाठी सर्वात अपरिहार्य आहे. म्हणून त्याचे अस्तित्व अत्यंत महत्वाचे आहे.'' भंगी जमातीला त्यांच्या हातांनी मैला भरलेले टोपली उचलावी लागे आणि जीवजंतू आणि बॅक्टेरियापासून संरक्षण करण्यासाठी त्याच्याकडे काहीही साधने नव्हती. त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी सूचना केली की, आपण सर्वांनी आपापले भंगी व्हायला हवे. आणि प्रत्येक वेळी ते दिल्लीला जात तेव्हा एक तर भंगी वस्तीत उतरत किंवा त्यांच्या वस्तीला भेट देत.

गांधींच्या विचाराना प्रतिसाद देत, असंख्य संस्थांनी गांधींची हाक शिरोधार्य मानत सफाई मोहीम सुरु केली आणि सफाई विद्यालय-देहू रोड, निर्मल ग्राम निर्मल केंद्र, नाशिक या त्यापैकी काही आहेत ज्यांनी ही मोहीम अध्यात्मिक पद्धतीने राबवली.

हरिजन सेवक संघाने १९६३ मध्ये सफाई विद्यालय अहमदाबादेतील साबरमती आश्रम येथे सुरु केले. भंगी समाजाची या प्रकारच्या कामातून सुटका करणे हा त्यांचा उद्देश्य होत.१९ सफाई विद्यालयाची प्राथमिक उद्दिष्टे: सफाई कामगार आणि भंगी यांची उन्नती; ग्रामीण आणि शहरी आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थेचा दर्जा उंचावणे ही होती.

## सारांश

गांधींनी सत्याची आणि अहिंसेची ईश्वर समजून पूजा केली. तो जगण्याचा मार्ग होता. मार्ग आणि साध्य यांच्याबाबत गांधी म्हणत की, पहिला माझ्या हातात आहे. कार्यपद्धतीसंदर्भात मी साध्यापेक्षा मार्ग हा अधिक महत्वाचा मानतो. जर तुम्ही साधनांची काळजी घेतली तर साध्य स्वत:ची काळजी घेईलच, असे त्यांनी म्हटले. या अर्थाने, जागतिक क्षेत्रात वैभवाकडे वाटचाल करत असलेले राष्ट्र म्हणून भारताने देश शुद्ध आणि स्वच्छ ठेवण्याचे मार्ग अवलंबले पाहिजेत, साध्य जे वैभव आहे, ते आपोआप येईल. ``वसंताची शोभा प्रत्येक झाडावर प्रतिबिंबित होते, संपूर्ण पृथ्वी नंतर तारुण्याच्या नव्हाळीने भरून जाते. स्वराज्याची वृत्ती समाजात झिरपेल तेव्हा जीवनाच्या प्रत्येक थरात एक ऊर्जा भरून राहील,'' गांधी यांनी सांगितले.

■■■

*लेखक गांधी संशोधन प्रतिष्ठान, गांधी तीर्थ, जैन हिल्स, महाराष्ट्र, येथे सहयोगी प्रपाठक आहेत.*



# भगीरथ परिवारातील यशवंत



## निरंजन दिवाकर
**UPSC 2018 (IFS)**
**All India Rank 3**



## भुवनेश्वर पाटील
**UPSC 2018**
**All India Rank 59**



## किरण सावंदकर
**UPSC 2018**
**All India Rank 459**

**UPSC** Foundation Batch 2018-19 | Batch Starts 3 July 2018

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. NMB/137/2016-18
Published Date: 12th November, 2018
Date of Posting : 16th November, 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout**, Director General, on behalf of Published Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai - 400 001.